मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०५/०८/२०२६

मा. महासभा सुचना क्र. ०५

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ----------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा गुरुवार दि. १३/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०५ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महापौर महोदया यांच्या मान्यतेने.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

मा. महासभा दि. १३/०८/२०२६, सभा सुचना क्र. ०५

विषयपत्रिका

प्र.क्र.	विषय
--	**प्रश्नोत्तरे -**
--	**मागील सभांचे इतिवृत्तांत - निरंक**
--	**सर्व निवडणूका - निरंक**
--	**स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - निरंक**
४९	अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियामक मंडळ निवडणुकीसाठी निर्वाचण गण गठित करण्याच्या अनुषंगाने निवडून आलेल्या विद्यमान नगरसेवकांमधून दोन नगरसेवकांची नावे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेस कळविणे.
५०	रस्ते, चौक, वास्तुचे नामकरण करणे.
५१	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना भुमिगत मलजोडणी करणे या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.
५२	पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजुर कर्मचारी पुरवठा करणे या कामास मुदतवाढ व वाढीव खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
५३	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलनि:सारण केंद्र क्र. ६ए, ६बी, ६सी व ७ ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे या कामास मुदतवाढ व वाढीव खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.
५४	भाईंदर (पुर्व) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका सुचवेल तो इतर जलकुंभ येथुन मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.
५५	एकात्मिक डास निर्मुलन योजनेकरीता औषध फवारणी कामगार ठेका पध्दतीने पुरविणेकरीता द्विवार्षिक निविदा काढणेस मंजुरी मिळणेबाबत.
५६	महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय – साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मधील तरतुदीनुसार जाहिरात फी दरवाढी बाबत.
५७	मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी / कर्मचारी यांना ग्रुप वैद्यकीय विमा लागु करणेबाबत.
५८	मालमत्ता कराचा आगाऊ भरणा करणाऱ्या नागरीकांना द्यावयाच्या सवलतीस देण्यात आलेल्या मुदतवाढीस मा. महासभेची कार्योत्तर मंजूरी देणे बाबत.
५९	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता भाड्याने देण्याबाबत धोरण निश्चित करणेबाबत.
६०	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दिव्यांग, दुध केंद्र, गटई स्टॉलसाठी मंजूरी देण्याकरिता धोरण निश्चित करणेबाबत.
६१	मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय ६ व्या मजल्यावर विशेष समित्या बैठकांसाठी सभागृह, कँटीन इत्यादी तयार करणे खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे.
६२	राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ वेस्टर्न हॉटेल येथील नविन उड्डाणपुलाखालील भुयारी मार्ग येथे नविन वाहतुक सिग्नल यंत्रणा बसविणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.
६३	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झाडांची छाटणी करणेकरीता ०४ Mac lifton (हायड्रोलिक शिडी) वाहन भाडेतत्वावर वाहन, वाहनचालक, ऑपरेटर व इंधनासहीत ०५ वर्ष कालावधीकरिता घेणेकरिता आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
६४	मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्पातील शिल्लक इनर्ट उचलणेकामी Tipper ७.५ MT व Loader १.०० Cum. Bucket Capacity चा पुरवठा करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

६५	महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) जिल्हा नियोजन समिती योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास अत्याधुनिक अग्निशमन वाहने व उपकरणे खरेदी करणे.
६६	महिला भवन बांधणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.
६७	मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात 'ए.आर.' (Accommodation Reservation) धोरणांतर्गत विविध आरक्षित भूखंडांचा विकास करण्यासंबंधीचे धोरण निश्चित करणे.
६८	मिरा भाईंदर शहरामधील ज्या गृहनिर्माण संकूलनामधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) बंद आहेत किंवा सदर प्रकल्प महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले आहेत अशा गृहसंकूलामधील इमारतीचे पुनर्विकास करतेवेळी शुल्क वसुल करणेचे धोरण निश्चित करणेबाबत.
६९	बकरी ईद व चिकन मटण शॉप धोरण निश्चित करणेबाबत.
७०	नविन शिधावाटप कार्यालयाकरीता जागा उपलब्ध करुन देणेबाबत.
७१	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ सुरक्षा रक्षक पुरवठा करणेकरीता नविन ठेकेदाराची नियुक्ती करणेस निविदा प्रक्रिया करणे करिता आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.
७२	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता आवश्यक औषध फवारणीकरीता भाडेतत्वावर ४० मिनी टेम्पो (जेट स्प्रे मशिन , वाहनचालक, पेट्रोल,डिझल, १००० लीटर पाण्याची टाकी, गन, १०० मीटर पाईप, साहित्य व देखभाल दुरुस्तीसह) पुरवठा करणे कामाची पाच वर्षाकरीता निविदा मागविणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.
७३	मिरा भाईंदर महानगरपालिका जुने आरक्षण क्र. ११५ भाईंदर (पूर्व) येथील महानगरपालिकेच्या शाळा इमारतीमधील जागा एन. एल. दालमिया शाळेला भाड्याने देणेबाबत निर्णय घेणे.
७४	मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१९ मध्ये बदल करणेबाबत. (फेर सादर)

महापालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०५ ऑगस्ट, २०२६

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. १३/०८/२०२६ रोजी आयोजित केली आहे.
सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.

६. श्रीम. शर्मिला वि. बगाजी मा. सदस्या यांनी दि. ०४/०३/२०२६ रोजी विचारलेला प्रश्न.
१) मिरा भाईंदर क्षेत्रातील एकूण १९ महसूली गावांपैकी मौजे उत्तन, डोंगरी, पाली, तौरोडी, चौक चा गावांचा सीटी सर्व्हे का करण्यात आला नाही
अ) महासभा दि. २६/०२/२०१८ रोजी महासभेच्या ठरावानंतरही प्रशासनाने त्याची का अंमलबजावणी केली नाही
ब) ५ गावे सोडून उर्वरीत १४ गावांचा झालेल्या सर्वेक्षणावर अजूनही चौकशी अधिकारी का नेमण्यात आले नाही
क) मौजे उत्तन, डोंगरी, पाली, तारोडी, चौक या गावांचा सर्व्हे कधी सुरु करण्यात येईल व त्याची मुदत किती असेल
ड) सर्वेक्षणानंतर चौकशी अधिकारी नेमण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे की नाही त्यातील अंतिम यादी कशी व कधी प्रकाशित केली जाईल.
७. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी मा. सदस्य यांनी दि. ०६/०३/२०२६ रोजी विचारलेला प्रश्न.
१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेतर्फे मागील दोन वर्षांत किती समाज भवन बांधण्यात आलेली आहेत ?
i) सदर समाज भवनांसाठी कोणती आरक्षणे राखीव करण्यात आलेली होती ?
ii) सदर समाज भवनांच्या बांधकामाकरिता राज्य शासन व महानगरपालिकेकडून किती निधी खर्च करण्यात आला आहे ?
iii) प्रत्येक समाज भवनासाठी वापरण्यात आलेल्या जागेचे क्षेत्रफळ किती आहे ?
iv) प्रत्येक समाज भवनाच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी किती खर्च करण्यात आला व तो कोणत्या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आला?
v) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण किती समाज भवन बांधून नागरिकांना उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे ?
vi) सदर समाज भवनांना देण्यात आलेली नावे कोणत्या अधिनियम अथवा नियमांनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत ?
vii) सदर समाज भवनांचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी अंदाजे किती कालावधी लागणार आहे ?
viii) सदर समाज भवन संबंधित समाजांना करार पद्धतीने कधीपर्यंत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत ?
ix) ज्या समाजांसाठी समाज भवन बांधण्याचे नियोजन आहे, त्या समाजांची नावे उपलब्ध करून देण्यात यावीत.
x) समाज भवन बांधून देण्याच्या नावाखाली कोणत्याही समाजाची दिशाभूल करण्यात आलेली आहे का ? असल्यास त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.
xi) सदर समाज भवनांच्या बांधकामासाठी कंत्राटदारांची निवड कोणत्या निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात आली ? संबंधित कंत्राटदारांची नावे व करार रक्कम काय आहे ?
xii) समाज भवनांच्या वापरासाठी नियम व अटी (Rules & Regulations) काय आहेत? तसेच नागरिक किंवा संस्थांना ते भाडेतत्त्वावर देण्याची प्रक्रिया काय आहे?
xiii) समाज भवनांमध्ये कोणकोणत्या मूलभूत सुविधा (पाणी, वीज, स्वच्छतागृह, पार्किंग, सुरक्षा इ.) उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत?
xiv) समाज भवन बांधण्यासाठी निवडलेल्या जागा विकास आराखड्यानुसार (Development Plan - DP) आरक्षित आहेत का?
xv) काही समाज भवनांबाबत स्थानिक नागरिक किंवा संस्थांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत का? असल्यास त्यावर काय कारवाई करण्यात आली आहे?
xvi) समाज भवनांचे व्यवस्थापन करण्यासाठी कोणती समिती किंवा संस्था नियुक्त करण्यात येणार आहे का? असल्यास त्याची माहिती देण्यात यावी.
xvii) समाज भवनांच्या बांधकामासाठी केंद्र शासन, राज्य शासन किंवा इतर योजनांमधून निधी प्राप्त झाला आहे का? असल्यास त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी.
xviii) समाज भवनांचा वापर केवळ संबंधित समाजापुरता मर्यादित राहणार आहे का, की इतर नागरिकांनाही नियमांनुसार वापर करण्याची परवानगी देण्यात येणार आहे?
xix) समाज भवनांच्या सुरक्षिततेसाठी अग्निसुरक्षा (Fire Safety), आपत्कालीन निर्गमन (Emergency Exit) व इतर आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत का?
८. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी मा. सदस्य यांनी दि. १०/०३/२०२६ रोजी विचारलेला प्रश्न.

१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेस कोणकोणत्या धरणातून दररोज किती दशलक्ष लिटर (द.ल.लि.) पाणीपुरवठा केला जातो? त्या प्रत्येक धरणातून मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण किती आहे?
i) शहरातील नागरिकांना पाणी पुरवठा किती तासांच्या अंतराने / किती वेळेसाठी दिला जातो?
ii) मिरा-भाईंदर शहरामध्ये पाणी साठवण करण्यासाठी एकूण किती जलकुंभ (Water Tanks) अस्तित्वात आहेत? तसेच त्या प्रत्येक जलकुंभाची साठवण क्षमता किती आहे?
iii) महानगरपालिकेचा पाणीपुरवठा एकूण किती झोनमध्ये विभागलेला आहे ? त्या सर्व झोनची नावे व क्षेत्रमर्यादा कोणती आहेत?
iv) पाणी पुरवठा विभागात सध्या कार्यरत असलेल्या एकूण मिटर रिडर्सची संख्या किती आहे ?
v) महानगरपालिकेतर्फे नागरिकांना पाण्याचे बिल हे पाणी मीटर रिर्डींगप्रमाणे आकारले जाते का ? असल्यास त्याची कार्यपद्धती काय आहे ?
vi) प्रत्येक पाणीपुरवठा झोनमध्ये किती पाणीपुरवठा अधिकारी व कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत ? झोननिहाय त्यांची संख्या किती आहे ?
vii) सोसायट्या तसेच चाळवस्त्यांमध्ये पाणीपुरवठ्याचे निश्चित वेळापत्रक ठरविण्यात आलेले आहे का ? असल्यास त्या वेळापत्रकाची सविस्तर यादी सभागृहास सादर करण्यात यावी.
viii) शहरामध्ये पाणी गळती (Leakage) चे प्रमाण किती आहे ?
ix) एकूण अनधिकृत नळजोडण्यांची संख्या किती आहेत ?
x) शहरातील सर्व भागांना समान प्रमाणात पाणीपुरवठा होत आहे का ? काही भागांमध्ये कमी पाणी पुरवठा होत असल्यास त्यामागील कारणे कोणती ?
xi) मिरा-भाईंदर शहरासाठी प्रस्तावित सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कधीपर्यंत पूर्ण होणार आहे ? त्यातून शहराला दररोज किती अतिरिक्त पाणी मिळणार आहे ?
xii) शहरामध्ये भविष्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन महानगरपालिकेकडून नवीन जलकुंभ, पाईपलाईन किंवा पाणीपुरवठा प्रकल्प उभारण्याबाबत काही योजना आखण्यात आलेली आहे का ? असल्यास त्याची माहिती देण्यात यावी ?
९. श्रीम. दिपीका पंकज अरोरा मा. सदस्या यांनी दि. १०/०३/२०२६ रोजी विचारलेला प्रश्न.
१) एम बी एम सी च्या पॅनल मध्ये किती रजिस्टर्ड स्ट्रक्चरल ऑडिटर्स आहेत?
अ) एम बी एम सी च्या पॅनलमध्ये स्ट्रक्चर ऑडिटर म्हणून रजिस्टर करण्याची काय अटीशर्ती आहेत?
ब) रजिस्टर झालेले सर्व ऑडिटर्सने सर्व अटीशर्ती पूर्ण केलेली आहेत का?
क) एम बी एम सी मध्ये रजिस्टर करायला स्ट्रक्चर ऑडिटर्सनी कोणती एक्झाम द्यायला लागते? ही एक्झाम एमबीएमसी घेत आहेत का?
ड) रजिस्टर झालेले सर्व स्ट्रक्चर ऑडिटर्स ला बीएमसी लायसन्स भेटला आहे का?
इ) सर्व स्ट्रक्चर ऑडिटर्सनी बिल्डिंगसला क्लिअरन्स सर्टिफिकेट दिल्यानंतर मीरा-भाईंदर मध्ये काही अप्रिय घटना घडली आहे का?
१०. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी मा. सदस्य यांनी दि. १७/०३/२०२६ रोजी विचारलेला प्रश्न.
१) प्रलंबित कर थकबाकीची एकूण रक्कम व थकबाकीदारांची संख्या.
i) चालू आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या कर वसुलीची स्थिती व टक्केवारी.
ii) मोठ्या थकबाकीदारांवर करण्यात आलेली कारवाई व त्याचे तपशील.
iii) कर वसुली वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना.
iv) थकबाकीदारांसाठी कोणतीही सवलत योजना (अभय योजना) प्रस्तावित आहे का, असल्यास त्याची माहिती.
v) मनपाची एकूण कर थकबाकी नेमकी किती आहे? मागील ०३ वर्षांची तुलना देण्यात यावी.
vi) रु.५० लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेले मोठे थकबाकीदार किती आहेत? त्यांची यादी सादर करण्यात यावी.
vii) जुन्या अथवा नवीन कर आकारणी करतेवेळी अथवा झालेल्या काही व्यावसायिक (हॉटेल, गॅरेज, तात्पुरते शेड) अशा किती मालमत्तेंना शास्तीसह कर आकारणी करण्यात आलेली नाही याबाबतची सविस्तर माहिती.
viii) शहरातील विविध ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात शेड टाकून त्याचा वापर व्यावसायिक म्हणून करण्यात येत असतो अशा मालमत्तांना मनपामार्फत कर आकारणी करण्यात आलेली आहे किंवा कसे याबाबतची सविस्तर माहिती.
ix) शहरातील विविध ठिकाणी असलेल्या काही मालमत्तेंना कर आकारणी का करण्यात आलेली नाही याबाबतची सविस्तर माहिती.
x) शहरातील मालमत्ताधारकांना कर देयके वेळेवर का पाठविली जात नाही ?
xi) मे.कोलोब्रो प्रा.लि यांनी केलेल्या शहरातील विविध मालमत्तेचा सर्वेक्षणाचा अहवाल का सादर करण्यात आलेला नाही ? याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

xii) शहरातील अनेक मालमत्तेस शास्ती लागू झालेली असूनही त्याची अमंलबजावणी आजमितीस का करण्यात आलेली नाही ?
xiii) मोठ्या थकबाकीदारांची यादी का जाहीर केली जात नाही ? त्यांच्यावर कठोर कारवाई का केली जात नाही ?
xiv) कर वसुलीचे उद्दिष्ट अपूर्ण राहण्यास जबाबदार अधिकारी कोण ?
xv) थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहीम का राबविण्यात येत नाही ?
xvi) संबंधित जबाबदार अधिका-यांवर शिस्तभंगात्मक/कडक कारवाई का प्रस्तावित करण्यात आलेली नाही ?

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. महासभा
दि. १३/०८/२०२६

प्रकरण क्र. ४९ :- **अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियामक मंडळ निवडणुकीसाठी निर्वाचण गण गठित करण्याच्या अनुषंगाने निवडून आलेल्या विद्यमान सन्मा. नगरसेवकांमधून दोन नगरसेवकांची नावे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेस कळविणेबाबत.**

मा. महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांनी दि. १० जुन, २०२६ रोजीच्या परिपत्रकाद्वारे, अखिल भारतीय स्वराज्य संस्थेच्या नियामक मंडळ निवडणुकीसाठी निर्वाचन गण गठित करण्याकरिता निवडून आलेल्या नगरसेवकांमधून दोन प्रतिनिधींची नावे मा. महासभेच्या ठरावाच्या प्रमाणित प्रतीसह कळविण्याबाबत विनंती केलेली आहे.

तद्अनुषंगाने, मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ मध्ये निवडून आलेल्या सन्मा. नगरसेवकांमधून दोन प्रतिनिधींची नावे मा. महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांस कळविणे आवश्यक आहे. याकरिता सन्मा. नगरसेवकांमधून ठरावाद्वारे दोन प्रतिनिधींची नावे निश्चित करणे आवश्यक आहे.

तरी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियामक मंडळ निवडणुकीसाठी निर्वाचन गण गठित करण्याकरिता निवडून आलेल्या सन्मा. नगरसेवकांमधून दोन प्रतिनिधींची नावे निश्चित करुन, कळविणेसाठी मा. महासभेची मान्यता मिळणेस शिफारस आहे.

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

(बांधकाम / विद्युत विभाग)

मा. महासभा दि. ९३ / ०८ /2026

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक. (५०) रस्ते, चौक, वास्तुचे नामकरण करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते, चौक व वास्तु यांचे वेळोवेळी नामकरण करण्यात येत असते. सद्यस्थितीत नामकरणासाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. अतिरिक्त आयुक्त (1) यांचे अध्यक्षतेखाली गठीत नामकरण समितीने खालील नामकरण प्रस्तावाची शिफारस केली आहे.

अ.क्र.	ठिकाण	प्रस्तावित नामकरण
1	भाईंदर (प) जनता नगर "Bombay Market" बस थांबा	डॉ. बाबासाहेब आंबेडकर बस थांबा
2	छत्रपती शिवाजी महाराज मार्ग काशिमिरा रोड, उड्डाणपुलाखालील ब्रम्हदेव मंदिरासमोरील गार्डन	ब्रम्हदेव उद्यान
3	वॉर्ड क्र.16 पेणकरपाडा वाचनालय	श्री. छत्रपती शिवाजी महाराज वाचनालय
4	वॉर्ड क्र.16 पेणकरपाडा आरोग्य केंद्र	आनंदीबाई जोशी आरोग्य केंद्र
5	महाजनवाडी, पेणकरपाडा इमारतीमधील तळमजल्यावरील आरोग्य केंद्र	भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आरोग्य वर्धिनी केंद्र
6	महाजनवाडी, पेणकरपाडा इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील ग्रंथालय	ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले ग्रंथालय
7	मिरारोड (पू.) येथील घोडबंदर गाव, जे.पी. नॉर्थ चौक	डॉ.बाबासाहेब गोपले चौक
8	भाईंदर पुर्व येथील नवघर क्रॉस रोड, सुंदर विहार हॉटेल समोरील चार रस्त्यावरील चौक	श्री गुरु जम्भेश्वर चौक
9	मिरारोड (पुर्व) येथील जे.पी. गृहसंकुलासमोरील 60 मी. रस्ता	महाराजा अग्रसेन मार्ग
10	प्र. क्र.14, मांडवीपाडा, सेंट झेवियर्स शाळेच्या पाठीमागे, मांडवी पाडा सर्कल चौक	पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक
11	काशिमिरा वेस्टर्न पार्क येथील चौक	सदगुरु बाबा हरदेव सिंहजी महाराज चौक
12	काशिमिरा मांडवीपाडा येथील चौक	क्रांतीसुर्य बिरसा मुंडा चौक
13	जरीमरी गावदेवी तलावा समोरील चौक	श्री क्षेत्र नारायणगड चौक
14	भाईंदर (पु), गोल्डन नेस्ट सर्कल ते फाटक रस्त्यावरील आगरी भवन रस्त्या समोरील बस थांबा	आगरी भवन बस थांबा
15	रसाज मॉलच्या मागे व रसाज सर्कलच्या उजव्या बाजुला जाणारा रस्ता	कासम परमार मार्ग
16	न्यु गोल्डन नेस्ट परिसरातील फेस 14 व 15 यांना जोडणारा चौक	छत्रपती संभाजीराजे चौक
17	मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, चौथा मजला, कॉन्फरन्स हॉल	माजी उप मुख्यमंत्री मा. श्री. अजितदादा पवार सभागृह पंडित दिनदयाल उपाध्याय सभागृह

18	मिरारोड (पू.) येथील टि.एम.टी. व शांती शॉपिंग सेंटर जवळील चौक	शांतीस्टार बिल्डर्स श्री. असित रमेश शाह चौक
19	नयानगर, (वॉर्ड नं.9) स्थित चौक	भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम चौक

वरील ठिकाणांच्या नामकरणाबाबत विचार विनिमय होऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' मधील प्रकरण 11(2) नुसार मा. महासभेची मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC-14/2026-27/DK/MG-2

मा. महासभा / ~~स्थायी समिती सभा~~
गोषवारा प्राप्त दि. 9६ /0६ /२0२६ वेळ सायं. 0६-30 वा
रजिस्टर नोंद अ. क्र. 39 वर्ष २0२६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.३३ / ०८ /२०२६

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

// गोषवारा //

प्रकरण क्र (५१) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना भुमिगत मलजोडणी करणे या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत... (E- ३१८७३१२)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भुयारी गटार योजने अंतर्गत शहरात एकूण १०० किलोमीटर लांबीच्या मलवाहिन्या अंथरण्यात आलेल्या आहेत. तसेच शहरामध्ये एकूण ९ मलनि:सारण केंद्रांची कामे पुर्ण झालेली असून १ मलनि:सारण केंद्राचे काम शिल्लक अहे.

महानगरपालिकेच्या मुख्य मलवाहिनीवरील चेंबरला गृहसंस्थांच्या मालमत्ता जोडणी करणेसाठी "मिरा भाईंदर शहरातील गृहसंस्थांनी / घरगुती / व्यावसायिक मालमत्ता व इतर मालमत्तांच्या मलवाहिनी जोडणेबाबतचे धोरण" मा.महासभा दि. ०६/०५/२०२६ ठराव क्र. १३ पारित झाले आहे. सदर धोरणानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गृहसंस्था / घरगुती / व्यावसायिक मालमत्ता व इतर मालमत्ताधारकांनी मलवाहिनी महानगरपालिकेच्या मॅनहोल / चेंबरपर्यंत जोडलेली नाही, त्या मालमत्ताधारकांनी स्वखर्चाने त्यांच्या सेप्टीक टँक / चेंबर पासून इमारतीच्या प्रवेशव्दारापर्यंत मलवाहिनी टाकावी. महानगरपालिकेने त्यांच्या इमारतींच्या प्रवेशव्दार ते महापालिकेच्या सिवरलाईन, मॅनहोल / चेंबर पर्यंतची कामे महानगरपालिकेचे अभियंता यांच्या देखरेखीखाली महानगरपालिका स्वखर्चाने करणे आहे.

त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गृहसंस्था / घरगुती / व्यावसायिक मालमत्ता व इतर मालमत्ताधारकांना मलनि:सारण जोडणी उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित मालमत्तांच्या प्रवेशद्वारापासून मुख्य मलवाहिनीवरील मॅनहोल / चेंबरपर्यंत मलवाहिनी अंथरणकरीता उत्खनन करणे, पाईप टाकणे, चेंबर बांधकाम, रस्ता पूर्ववत करणे व इतर अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहेत.

त्यानुसार खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित खर्च (जी.एस.टी. सहित)
१.	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना भुमिगत मलजोडणी करणे.	रु.१२,५३,२८,७५३/-

तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.२३/ ०८ /२०२६

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

// गोषवारा //

प्रकरण क्र (५२) :- पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजुर कर्मचारी पुरवठा करणे या कामास मुदतवाढ व वाढीव खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत... (E- २३८०७२)

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत पाणी वितरण व्यवस्थेकरीता ३३ जलकुंभावरुन झोनव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो. तसेच अंदाजे ३९६ कि.मी. लांबीची सी.आय. पाईपलाईन अंथरण्यात आलेली आहे. सदर पाईपलाईन १०० मि.मी. ते ६०० मि.मी. व्यासाची आहे. पाईपलाईनची देखभाल दुरुस्ती व पाणी वितरण व्यवस्था पाणी पुरवठा विभागामार्फत केली जात आहे. सदर देखभाल दुरुस्ती करीता व वितरण व्यवस्थेअंतर्गत मजुर कर्मचारी सद्यस्थितीत कमी असल्यामुळे पाणी वितरण व्यवस्थेअंतर्गत देखभाल दुरुस्ती अथवा गळती झाल्यास वेळेत दुरुस्ती करता येत नाही. दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक मजुर कमी असल्याने पाणी गळती दुरुस्ती तातडीने होऊ शकत नाही. परिणामी नागरीक व लोकप्रतिनिधींच्या रोषास सामोरे जावे लागते. सदरचे काम पाणी पुरवठा वितरणाशी निगडीत असल्याने सदरचे कामकरणे गरजेचे आहे.

उपरोक्त विषयानुसार पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजुर कर्मचारी पुरवठा करणे कामाचा कार्यादेश मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि यांना देण्यात आलेला आहे. सदर कामास दोन महिने मुदतवाढ व मा. विशेष महासभा दि. २७/०३/२०२६, ठराव क्र. ३२ अन्वये सुधारीत खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामाची नविन निविदा प्रक्रिया सुरु असून महाराष्ट्र विधान परिषदेव्दारे ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची व्दिवार्षिक निवडणूक २०२६ च्या आचारसंहितेमुळे निविदा प्रक्रियासाठी विलंब होऊन निविदा प्रकिया पुर्ण होणेस ३१/०७/२०२६ पर्यतचा कालावधी अपेक्षित आहे.

सदर वाढीव कालावधीकरीता मंजुर दराने रु.१,६७,५०,०००/- इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार मंजुर व होणाऱ्या एकूण वाढीव खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

मुळ मंजुर खर्च	मंजुर सुधारीत खर्च	वाढीव खर्च	सुधारीत खर्च
रु.१४७९.६३ लक्ष	रु.१५२२.६३ लक्ष	रु.१६७.५ लक्ष	रु.१६९०.१३ लक्ष

उपरोक्त कामाची तरतुद "कर्मचारी पुरवठा करणे" या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आलेली आहे. शहरातील वितरण व्यवस्था सुरुळीत सुरु राहणे आवश्यक असल्याने सदर कामास दि.३१/०७/२०२६ पर्यत मुदतवाढ व वाढीव खर्चास मान्यता देणेस आवश्यक आहे.

तरी सदर कामास मुदतवाढ व वाढीव खर्चासह सुधारीत खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१३/०८ /२०२६

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

// गोषवारा //

प्रकरण क्र (५३) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलनि:सारण केंद्र क्र.६ए, ६बी, ६सी व ७ ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे या कामास मुदतवाढ व वाढीव खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत... (E- २८५८८०)

मिरा भाईंदर क्षेत्रात भुयारी गटार योजनेअंतगर्त मलनि:सारण केंद्र क्र. ६ए, ६बी, ६सी व ७ बांधण्यात आलेली आहेत. सदर मलनि:सारण केंद्रांच्या परिसरातील इमारतींच्या सांडपाण्यावर योग्यरितीने प्रक्रिया होणेकरीता सदर मलनि:सारण केंद्रांची देखभाल दुरुस्ती करणेकरीता संदर्भिय पत्रान्वये मे. फ्रेन्ड्स इंजिनिअरींग कॉरपोरेशन यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कामास दोन महिने मुदतवाढ व मा. विशेष महासभा दि. २७/०३/२०२६, ठराव क्र. ३२ अन्वये सुधारीत खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामाची नविन निविदा प्रक्रिया सुरु असून महाराष्ट्र विधान परिषदेव्दारे ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची व्दिवार्षिक निवडणूक २०२६ च्या आचारसंहितेमुळे निविदा प्रक्रियेसाठी विलंब होऊन निविदा प्रकिया पुर्ण होणेस ऑगस्ट २०२६ पर्यंतचा कालावधी अपेक्षित आहे.

सदर वाढीव कालावधीकरीता मंजुर दराने रु.३६,९२,९७३/- इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार मंजुर व होणाऱ्या एकूण वाढीव खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

मुळ मंजुर खर्च	मंजुर सुधारीत खर्च	वाढीव खर्च	सुधारीत खर्च
रु.३५४.१५ लक्ष	रु.३८२.४८ लक्ष	रु.३६.९३ लक्ष	रु.४१९.४१ लक्ष

उपरोक्त कामाची तरतुद "मलनिसारण केंद्र देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आलेली आहे. सदर मलनि:सारण केंद्रांची देखभाल दुरुस्तीची कामे नियमित सुरु ठेवणेकरीता सदर कामास दि.३१/०८/२०२६ पर्यत मुदतवाढ व वाढीव खर्चास मान्यता देणेस आवश्यक आहे.

तरी सदर कामास मुदतवाढ व वाढीव खर्चासह सुधारीत खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.९३/०८ /२०२६

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

// गोषवारा //

प्रकरण क्र (५४) :- भाईंदर (पुर्व) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका सुचवेल तो इतर जलकुंभ येथुन मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.
(E- ३२३६३३४)

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा पाणी पुरवठा विभाग हा अत्यावश्यक सेवेत मोडत आहे. महानगरपालिकेमार्फत मनपा हद्दीतील इमारतींना आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे मनपाचे धोरण आहे. सदर टँकर पाणी पुरवठा हा जलजोडणी नसलेल्या इमारतींना, जलवाहिन्यांच्या अंतिम टप्यातील कमी दाबाने पाणी पुरवठा होणाऱ्या इमारतींना, खाजगी कार्यक्रमांना मागणी केल्यास तसेच काही आपतकालीन परिस्थितीमध्ये तातडीने निघालेले जलवाहिनी दुरुस्तीच्या वेळी महानगरपालिकेमार्फत रु.९६५/- प्रति फेरा व झोपडपट्टी भागात रु.५००/- प्रतिफेरा तसेच मलनि:सारण केंद्र क्र.०८ च्या बाजुकडील पाणी पुर्नः प्रक्रिया केद्रातुन प्रक्रिया केलेले पाणी विकासकामार्फत नव्याने विकसीत करण्यात येणाऱ्या इमारतीच्या बांधकामा करीता रु.९६५/- प्रति फेरा इतके दर आकारुन पुरविण्यात येतात. या व्यतिरिक्त आदिवासी पाडे, दुषित पाणी पुरवठा होणाऱ्या इमारती, तसेच मनपाची कार्यालये व आपतकालीन परिस्थितीमध्ये (डंम्पींग ग्राऊंड येथे आग लागणे) मोफत पाणी पुरवठा करणेत येते. सदर योजना ना नफा ना तोटा या तत्वावर राबविली जाते. उपरोक्त टँकर मनपा भाडे तत्वावर घेऊन पाणी पुरवठा केला जातो.

त्यानुसार खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित खर्च (जी.एस.टी. सहित)
१.	भाईंदर (पुर्व) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका सुचवेल तो इतर जलकुंभ येथुन मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे.	रु. १,९०,००,०००/-

तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १३ /०८ /2026

// गोषवारा //

प्रकरण क्र. :- ५५

विषय - एकात्मिक डास निर्मुलन योजनेकरिता औषध फवारणी कामगार ठेका पद्धतीने पुरविणेकरीता व्दिवार्षिक निविदा काढणेस मंजुरी मिळणेबाबत..

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता औषध फवारणी कामगार पुरवठा करणेकामी मा. महासभेने दि.23/06/2021, ठराव क्र.20 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजूरी दिलेली होती. परंतू सदर निविदेस आवश्यक प्रतिसाद न मिळाल्याने मा. आयुक्त यांनी दि.14/11/2022 रोजी फेरनिविदा मागविण्यास मंजूरी दिलेली होती. या अनुषंगाने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन ई-टेंडरद्वारे दि.20/12/2022 रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या.

मे. स्वामी समर्थ सिक्युरीटी ॲण्ड हॉस्पिटॅलिटी यांनी कमी दराची निविदा सादर केल्याने मा. प्रशासकीय ठराव क्र.290, दि.08/03/2023 अन्वये कमी दराच्या निविदेच्या दरास मंजुरी देण्यात आली व दि.20/03/2023 रोजी मे. स्वामी समर्थ सिक्युरिटी ॲण्ड हॉस्पिटेलिटी प्रा. लि. यांना दि.01/04/2023 पासून एकूण 120 औषध फवारणी कामगारांचा पुरवठा करणेकरीता कार्यादेश देण्यात आला, तसेच मा. आयुक्त तथा प्रशासक यांची दि.26/07/2024 रोजीच्या मान्यतेनुसार व मा. प्रशासकीय ठराव क्र.102, दि.08/08/2024 रोजीच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेनुसार दि.24/09/2024 पासून अतिरिक्त 30 औषध फवारणी कामगार पुरवठा करणेस कार्यादेश देण्यात आला होता. सदर निविदेचा कालावधी संपला असल्याने नव्याने निविदा मागविणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत 24 प्रभागात एकूण 150 औषध फवारणी कामगार स्प्रे-पंप व भाडेतत्वावरील मिनी औषध फवारणी टेम्पोद्वारे त्या प्रभागाच्या सुक्ष्मकृती आराखड्यानुसार नियमित औषध फवारणी, वेळोवेळी घरभेटी देऊन डासांची पैदास रोखण्यासाठी पाणीसाठे तपासणी, डासआळ्या आढळल्यास पाणीसाठे रिकामे करणे, ॲबेटिंग करणे, इत्यादी कामे करतात. याद्वारे स्वच्छ पाण्यात पैदास होणाऱ्या व डेंग्यु आजार पसरवणाऱ्या डासांच्या अळ्यांचा वेळीच नायनाट करणे शक्य होऊन नागरिकांच्या डेंग्यु, मलेरिया व इतर साथींच्या आजारांपासून बचाव होण्यास मोलाची मदत मिळत आहे. त्याचप्रमाणे चालु वर्षा पासून कार्यक्षत्रात संध्याकाळच्या सत्रात Vehicle Mounted धुर फवारणी सुरु करणे विचाराधीन असून त्याकरीता अतिरिक्त 30 औषध फवारणी कामगार आवश्यक आहेत. त्यामुळे औषध फवारणी करीता 150 व धुर फवारणीकरीता 30 असे एकूण 180 औषध फवारणी कामगार पुरवठा करणेकामी निविदा मागविणे कामाचा प्रस्तावास मा. प्रस्ताव समितीने दि.03/02/2026 रोजी मान्यता दिलेली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता आवश्यक औषध फवारणी कामगार पुरवठा करणेकामी व्दिवार्षिक निविदा मागविणेकरीता अंदाजे रु.12,00,00,000/- खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च "एकात्मिक डास निर्मुलन योजना (ठेका कर्मचारी वेतन, मिनी टेम्पो देयक, औषध खरेदी)" या लेखार्शिषाखालील उपलब्ध तरतुदीतुन सदरचा खर्च करण्यात येईल.

तरी सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता आवश्यक औषध फवारणी कामगार पुरवठा करणेकरीता व्दिवार्षिक निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(कविता बोरकर)
उपायुक्त (सार्व.आ.वि.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने)

मिरा-भाईंदर महानगरपालिका

जाहिरात विभाग

मा.महासभा दि. ३३ /०८ /२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्र. ५६ :- महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय - साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मधील तरतुदीनुसार जाहिरात फी दरवाढी बाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध व्यक्ती/संस्था/कंपनी यांना महानगरपालिकेच्या जागेवर ठेक्याद्वारे होर्डिंग्ज वर जाहिरात उभारण्याची परवानगी देण्यांत येत असते. तसेच काही व्यक्ती / संस्था / कंपनी यांना खाजगी जागेत मागणी नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४४, २४५, ३८६ आणि ३९२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय - साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ अन्वये सादर केलेली कागदपत्रे तपासुन खाजगी जागेवर होर्डिंग्ज उभारण्यास परवानगी देण्यांत येत असते. महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार जाहिरात फी आकारुन त्याची वसुली करण्यांत येते.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात शासनमार्फत प्राप्त मंजुरीच्या अधिन राहुन सुधारीत जाहिरात दरपत्रकानुसार जाहिरात विभागाने अंमलबजावणी करुन जाहिराती वसुली करण्यात येत होती. परंतु सदर सुधारीत जाहिरात दर हे लगतच्या महानगरपालिकेशी तुलना करता कमी असल्याचे आढळुन येत आहेत. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय - साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मधील कलम (२०) (क) मधील तरतुदीनुसार सदरचे परवाना शुल्क आकारामधील वाढ दर ३ वर्षांनंतर चलनवाढ दरानुसार निश्चित करावी असे नमुद आहे. सदर शासन अधिसुचनेनुसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जाहिरात फी च्या शुल्कात वाढ करणे आवश्यक आहे. करीता लगतच्या भिवंडी निजामपूर महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, वसई- विरार शहर महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, बृहन्मुंबई महानगरपालिका या महानगरपालिकेंचे दरपत्रक मागवुन जाहिरातीचे दर ठरविण्यात आले व त्यानुसार दि. २१/११/२०२२ रोजीच्या प्रशासकिय ठराव क्र. ११९ अन्वये ठराव पारीत करुन जाहिरात फीचे दरास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर ठरावान्वये मंजुर झालेल्या दरानुसार सन २०२३-२४ पासुन आकारणी करणेस मंजुरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार सर्व जाहिरातदार यांना दि. २३/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यांत आले. सदर मागणी पत्राच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर आऊटडोर मिडीया असोसिएशने जाहिरात फी दरामध्ये कपात कपात करणेबाबत पत्रान्वये कळविले आहे.

मिरा-भाईंदर आऊटडोर मिडीया असोसिएशनच्या पत्राच्या अनुषंगाने जाहिरात फी दराबाबत तत्कालीन मा. आयुक्त यांनी दि. २१/०२/२०२३ रोजीच्या आदेशानुसार समिती गठीत करुन जाहिरात विभागातील दराबाबत व इतर महानगरपालिकेतील दराशी तपासणी करुन वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणेबाबत आदेशित केले. त्यानुसार समिती

गठीत करुन जाहिरात फी दराबाबत गठीत समितीने मा. प्रशासकिय ठराव क्र.११९ दि.२१/११/२०२२ अन्वये मधील मंजुर सर्व दरामध्ये फक्त बदल नमुद करुन त्यात नमुद केलेल्या सर्व दरांवर ३०% कपात करुन दरांमध्ये सुधारणा करुन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासुन अंमलबजावणी करणेस व जाहिरात दरामध्ये प्रतीवर्षी ५% वाढ निश्चित करुन तसा बदल ठरावात करणेस दि. २३/०२/२०२३ रोजी गठीत समितीने मान्यता दिली. सदर मान्यतेच्या अधिन राहुन मा. प्रशासकिय ठराव क्र.११९ दि.२१/११/२०२२ अन्वये पारीत केलेल्या ठरावात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि 'ड' प्रकरण २ कलम १ (र) नुसार समितीने शिफारस केलेल्या दरानुसार बदल करुन प्रशासकिय ठराव पारीत करणेकरीता तत्कालीन आयुक्त यांनी दि. २३/०२/२०२३ रोजी अहवालास मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेनुसार मा. प्रशासकिय ठराव क्र.११९ दि.२१/११/२०२२ मधील मंजुर सर्व दरामध्ये ३०% कपात करुन जाहिरात फी दरास मान्यतेबाबत दि.०२/०३/२०२३ मा. प्रशासकिय ठराव क्र.२८२ ठराव पारीत करण्यांत आला आहे.

मा.प्रशासकिय ठराव क्र.२८२ दि. ०२/०३/२०२३ पारीत ठरावामध्ये प्रती वर्षी ५% वाढ करणेस मान्यता प्राप्त झाली आहे. सदर मान्यतेनुसार सन २०२४-२५ व २०२५-२६ या आर्थिक वर्षात जाहिरात फी दरामध्ये ५% वाढ करून जाहिरात फीची आकारणी करण्यांत आलेली आहे.

मिरा-भाईंदर आऊटडोर मिडीया असोसिएशन यांनी दि. १७/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जाहिरात फी दरवाढीबाबत आक्षेप घेतला आहे. तसेच सदर जाहिरात फी बाबत मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र.८८७१/२०२३ (मिरा-भाईंदर महानगरपालिका विरुध्द होर्डिंग ओनर्स असोसिएशन ऑफ मुंबई व इतर) दाखल केलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय - साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मध्ये २०. जाहिरात परवान्यांकरिता शुल्क :- (क) परवाना शुल्क निश्चित करण्याच्या संदर्भात, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे ३८६ (२) अंतर्गत, आयुक्त, महानगरपालिकेच्या मंजूरीने वेळोवेळी निश्चित करतील असे परवाना शुल्क जारी करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या वाजवी मर्यादेपेक्षा जास्त नसावे. जाहिरातीकरिता भाडे आकार, परवाना शुल्क हे अभिकरणांकडून महानगरपालिकेने वेळोवेळी मंजूर केलेल्या दरानुसार गोळा करण्यात येईल. सदरचे परवाना शुल्क आकारामधील वाढ दर ३ वर्षांनंतर चलन वाढ दरानुसार निश्चित करावी. अभिकरण परवानगी संपण्याच्या १० दिवस अगोदर महानगरपालिकेला अग्रीम म्हणून जाहिरात फलक खाजगी जागेवर असल्यास ६ महिन्यांचे परवाना शुल्क आणि महानगरपालिकेच्या जागेवर असल्यास ६ महिन्यांचे भाडे आणि ६ महिन्यांचे परवाना शुल्क आगाऊ प्रदान करतील. तोपर्यंत सदरचे फलक पुढील निर्णय होईपर्यंत कार्यरत राहतील. असे नमुद आहे.

मा. प्रशासकिय ठराव क्र. २८२ दि. ०२/०३/२०२३ मध्ये प्रती वर्षी ५% वाढ करणेबाबत नमुद आहे. परंतु मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय- साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मध्ये २० (क) मध्ये परवाना शुल्क आकारामधील वाढ दर ३ वर्षांनंतर चलन वाढ दरानुसार निश्चित करणेबाबत नमूद केले आहे.

जाहिरात विभागामार्फत मा.प्रशासकिय ठराव क्र. २८२ दि. ०२/०३/२०२३ मधील नमुद केलेली जाहिरात फी दरामध्ये प्रतीवर्षी ५% दरवाढ रद्द करुन महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय- साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मध्ये २०. (क) मध्ये नमुद प्रमाणे ३ वर्षांनंतर चलन वाढ दरानुसार जाहिरात फी दरवाढ करणे बाबत निर्णय घेणेकरीता विधी अधिकारी यांचा अभिप्राय मागविण्यांत आला.

विधी अधिकारी यांनी टि/९ नुसार दिनांक ०२/०३/२०२३ च्या ठरावान्वये दर आधीच निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे पुढील तीन वर्षांनंतर म्हणजेच सन २०२६ मध्ये दर पुनरावलोकन करणे अपेक्षित आहे. दरवर्षी ५% दरवाढ करणे हे वरील नियमांचे उल्लंघन ठरेल. त्यामुळे, जाहिरात नियम २०२२ च्या नियम २० (अ) मधील तरतुदींचे पालन होण्यासाठी संबंधित ठरावामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्याची कार्यवाही असा अभिप्राय दिलेला आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय - साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मध्ये २०. (क) परवाना शुल्क निश्चित करण्याच्या संदर्भात, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे ३८६ (२) अंतर्गत, आयुक्त, महानगरपालिकेच्या मंजूरीने वेळोवेळी निश्चित करतील असे परवाना शुल्क जारी करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या वाजवी मर्यादेपेक्षा जास्त नसावे. जाहिरातीकरिता भाडे आकार, परवाना शुल्क हे अभिकरणांकडून महानगरपालिकेने वेळोवेळी मंजूर केलेल्या दरानुसार गोळा करण्यात येईल. सदरचे परवाना शुल्क आकारामधील वाढ दर ३ वर्षांनंतर चलन वाढ दरानुसार निश्चित करावी. असे अभिप्राय दिले आहेत.

तरी विधी अधिकारी यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार व महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय - साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मध्ये २०. (क) मधील नमुद तरतुदीनुसार प्रशासकिय ठराव क्र. २८२ दि.०२/०३/२०२३ ठरावानुसार सन २०२३-२४,२०२४-२५ व २०२५-२६ या आर्थिक वर्षातील जाहिरात फी दरामध्ये लागु करण्यांत आलेले प्रतीवर्षी ५% दरवाढ रद्द करुन महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय - साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मधील कलम (२०) (क) नुसार ३ वर्षांनंतर म्हणजेच सन २०२६ मध्ये व पुढे प्रत्येक ३ वर्षानंतर चलन वाढ दरानुसार जाहिरात फी दरवाढ करणे बाबत मा.महासभेची मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(प्रणाली घोंगे)
उपआयुक्त (जाहिरात)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

मा.महासभा दि. १३ / ०८ /2026

(गोषवारा)

प्रकरण क्र. ५७ मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना ग्रुप वैद्यकीय विमा लागु करणेबाबत

मा.प्रशासकीय सभा दि.31/07/2025, ठराव क्र.187 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय विमा योजना लागु करणेकरीता M/S.SMC INSURANCE BROKERS PVT LTD (Niva Bupa Health Insurance Co.ltd) या कंपनीस मा.प्रशासकीय सभा दि.21/04/2025, ठराव क्र.43 अन्वये मंजूरी दिलेली आहे. तद्नंतर M/S.SMC INSURANCE BROKERS PVT LTD (Niva Bupa Health Insurance Co.ltd) यांचे सोबत 01 वर्षाचा करारनामा करुन त्यांना दि.03/06/2025 रोजीचा कार्यादेश देण्यात आला आहे. त्यांची मुदत दि.25/06/2026 रोजी संपुष्टात येणार आहे.

मा.श्री.शेरसिंग रुक्कानसिंग डागोर, अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा), महाराष्ट्र राज्य, सफाई कर्मचारी आयोग, चेंबुर मुंबई यांचा दि.26/06/2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेत दौरा आयोजित करण्यात आलेला होता. सदर दौऱ्यामध्ये महानगरपालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकीय विमा रु. 5 लाखापर्यंत करणेबाबत निर्देश देण्यात आले होते. तसेच विविध कर्मचारी संघटना सुध्दा कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकीय विमा रक्कमेमध्ये वाढ करणेबाबत मागणी करीत आहेत.

महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांना ग्रुप वैद्यकीय विमा योजना लागु करणेकरीता जाहिर वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देऊन IRDA कडे नोंदणीकृत असलेले शासन मान्यता प्राप्त शासकीय, बँक व खाजगी कंपन्याकडून ऑनलाईन दरपत्रके मागविणेबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस व दि.25/06/2026 रोजी नंतर नविन कंपनीस मंजूरी मिळेपर्यंत सामान्य प्रशासन विभागाकडे आलेल्या वैद्यकीय प्रतीपुर्तीस मंजूरी मिळणेस व कर्मचाऱ्यांकरीता रु.2 लाखापर्यंत वैद्यकीय विमा योजना लागु करणेस, रु.1 कोटी इतकी बफर रक्कम घेणेबाबत व त्याकामी होणाऱ्या खर्चास तसेच RFP (Request For Proposal) मागविणेस मा.आयुक्त महोदय यांनी दि.04/07/2026 रोजी मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार, महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांना ग्रुप वैद्यकीय विमा योजना लागु करणेकरीता जाहिर वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देऊन IRDA कडे नोंदणीकृत असलेले शासन मान्यता प्राप्त शासकीय, बँक व खाजगी कंपन्याकडून ऑनलाईन दरपत्रके मागविणेबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस व दि.25/06/2026 रोजी नंतर नविन कंपनीस मंजूरी मिळेपर्यंत सामान्य प्रशासन विभागाकडे आलेल्या वैद्यकीय प्रतीपुर्तीस मंजूरी मिळणेस व कर्मचाऱ्यांकरीता रु.2 लाखापर्यंत वैद्यकीय विमा योजना लागु करणेस, रु.1 कोटी इतकी बफर रक्कम घेणेबाबत व त्याकामी होणाऱ्या खर्चास तसेच RFP (Request For Proposal) मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास त्याकामी अंदाजित रक्कम रु.2,80,00,000/- (अक्षरी रक्कम रु.दोन कोटी ऐंशी लाख मात्र) आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबतचा गोषवारा मा.महासभे पुढे ठेवण्यास शिफारस आहे.

(डॉ.सचिन बोंमर)
उप-आयुक्त (मु.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांचे मंजुरीने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १३ / ०८ /२०२६

गोषवारा

प्रकरण क्र. ५८ :- मालमत्ता कराचा आगाऊ भरणा करणाऱ्या नागरीकांना द्यावयाच्या सवलतीस देण्यात आलेल्या मुदतवाढीस मा. महासभेची कार्योत्तर मंजूरी देणे बाबत.

संदर्भ :- १) मा. महासभा ठराव क्र. ३२ दि. २७/०३/२०२६
२) मा. महापौर यांचे दि. २९/०६/२०२६ रोजीचे पत्र.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराचे देयके वाटप केले असून मालमत्ता कराची वसूलीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

मालमत्ता कराचा नियमीत व विहित मुदतीत कराचा भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देण्यासाठी करदात्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात सवलत देणे गरजेचे आहे.

मालमत्ता कराची वसूली अधिक होणेकरीता संदर्भ क्र. १ अन्वये मा. महासभेने जून २०२६ अखेर पर्यंत मालमत्ता कराचा संपूर्ण भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात ५% व जुलै २०२६ अखेर पर्यंत संपूर्ण भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना ३% सवलत देणे बाबत ठराव पारीत केला आहे.

त्यानुसार दि. ०१/०४/२०२६ ते दि. ३०/०६/२०२६ पर्यंत रु. १०२.३६ कोटी रक्कम वसूली झालेली आहे.

तथापि, महानगरपालिकेचे कर्मचारी मतदार पुर्ननिरीक्षण कार्यक्रम व जनगणना कार्यक्रमामध्ये व्यस्त असल्याने कर विभागाच्या कार्यालयात आवश्यक मार्गदर्शन व सेवा वेळेत उपलब्ध होऊ शकली नाही. परिणामी, अनेक नागरीकांना विहित मुदतीत मालमत्ता कर भरता आला नसून त्यांना ५% सवलतीचा लाभ घेता आला नाही. त्यामुळे सदर सवलतीची मुदत वाढविणे करीता नागरीकांनी मोठया प्रमाणावर मागणी केलेली आहे. सदर सवलतीचा जास्तीत नागरीकांना याचा फायदा घेता यावा या उद्देशाने सदर सवलतीची मुदत वाढविणे करीता मा. महापौर यांनी संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने दि. ०१/०४/२०२६ ते दि. ३०/०६/२०२६ पर्यंतच्या सवलतीची मुदत १५ दिवसांनी वाढवून दि. १५/०७/२०२६ पर्यंत ५% सवलत देण्यात आलेली होती.

दि. ०१/०७/२०२६ ते दि. १५/०७/२०२६ पर्यंत सदर सवलत मुदतवाढीचा २८,९०५ मालमत्ता धारकांनी लाभ घेऊन रु. २५.८१ कोटी कर वसूली झालेली आहे.

मा. महासभा ठराव क्र. ३२ दि. २७/०३/२०२६ अन्वये दि. ०१/०४/२०२६ ते दि. ३०/०६/२०२६ पर्यंत ५% सवलत देणे बाबत ठराव पारीत केलेला होता. परंतु नागरीकांची मागणी व मा. महापौर यांनी दिलेल्या निर्देशानुसार जनहितार्थ दि. ०१/०७/२०२६ ते दि. १५/०७/२०२६ पर्यंत सदर सवलतीस मुदतवाढ दिलेली असल्याने मा. महासभा यांची सदर सवलत मुदतवाढीस कार्योत्तर मंजूरी देणेस शिफारस असे.

(कविता बोरकर)
उप-आयुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र. – ५९ दि. २३/०८/२०२६

विषय :- मा. महासभा दि.०६/०५/२०२६, ठराव क्र. १७ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता भाड्याने देण्याबाबत धोरण निश्चित करणेबाबत.

मा. महासभा दि.०६/०५/२०२६, ठराव क्र. १७ अन्वये विषयांकीत बाबत धोरण निश्चित करून महासभेपुढे सादर करणेसाठी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. त्यानुसार गठीत समितीची दि.१४/०७/२०२६ रोजी बैठक घेऊन खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरात नागरीकांच्या सोयी सुविधांसाठी विविध समाजमंदिर, सभागृह, उद्याने, मैदाने, व्यायामशाळा इत्यादी वास्तू बांधण्यात आलेल्या आहेत. सदर मालमत्ता नागरीकांना तसेच सार्वजनिक / खाजगी संस्थांना वापरण्यासाठी भाड्याने देण्यात येत आहेत. मालमत्ता भाड्याने आरक्षण ज्या दिवसापासुन पाहीजे आहे तो दिवस वगळुन सदरचा कालावधी ६० दिवस करण्यात येत आहे.

१) **स्वर्गीय गोपीनाथ मुंडे क्रिडा संकुल (स्पोर्टस् कॉम्प्लेक्स)** :- सदर स्पोर्टस् कॉम्प्लेक्स उभारते वळी तत्कालीन डी. सी. रूल प्रमाणे मैदान आरक्षण नियमानुसार १०% जागेत स्पोर्टस् कॉम्प्लेक्सचे बांधकाम केले होते. नवीन यु.डी.सी.पी.आर. प्रमाणे एफ.एस.आय. मध्ये वाढ झाल्याने सदर स्पोर्टस् कॉम्प्लेक्स तोडून नवीन बांधल्यास महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल तसेच नागरीकांना अनेक सुविधा नवीन उपलब्ध होतील. त्यामुळे प्रशासनाने याबाबत पी. पी. पी तत्वावर स्पोर्टस् कॉम्प्लेक्स बांधण्याबाबत योग्य ती कारवाई करावी व सदर संकुलातील स्विमिंग पूल, बॅडमिंटन व इतर सुविधा नागरीकांकरीता सुरू करावी.

२) **लता मंगेशकर नाट्यगृह** :- खालील दराप्रमाणे नाट्यगृह जनतेला व नाट्यरसिकांना भाडयाने उपलब्ध करून दयावे.

वातानुकूलित (एसी)

मोठे सभागृह	**सध्याचे दर**	**प्रस्तावित दर**
पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०)	रू.५०,०००/-	रू.६०,०००/-
अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३)	रू.३५,०००/-	रू.३५,०००/-
अर्धा दिवसाकरिता (सायंकाळी ४ ते रात्री १०)	रू.३५,०००/-	रू.३५,०००/-
अनामत रक्कम रू.३०,०००/-		

छोटे सभागृह	**सध्याचे दर**	**प्रस्तावित दर**
पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०)	रू.२५,०००/-	रू.४०,०००/-
अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३)	रू.१५,०००/-	रू.२५,०००/-
अर्धा दिवसाकरिता (सायंकाळी ४ ते रात्री १०)	रू.१५,०००/-	रू.१५,०००/-
अनामत रक्कम रू.२५,०००/-		

धार्मिक/सामाजिक कार्यक्रमाकरीता देण्यात यावे. (फक्त एका दिवसाकरीता)

नाट्यगृहामध्ये अल्पोपहार / जेवण कार्यक्रमाच्या आयोजकांनी कॅफेटेरीया / कँटीन यामधूनच घेणे अनिवार्य राहील. अल्पोपहार व जेवणाचे दर स्थायी समितीव्दारे निश्चित केले जातील.

साफसफाई खर्च रू.५,०००/- (जेवण असल्यास) आणि रू.३,०००/- (जेवण नसल्यास)

वरील भाडेदरांमध्ये १८% प्रमाणे जी.एस.टी. अनुज्ञेय राहील.

प्रभाग समिती क्र. ०१ कार्यक्षेत्रात असलेले समाजमंदिर हॉल

अ. क्र.	मालमत्ता प्रकार	सद्याचे भाडे दर	अनामत रक्कम	सुधारीत भाडेदर	अनामत रक्कम
1	मंगल कार्यालय नगरभवन अ) (वातानुकुलित)	रू.12,000/-		रू.12,000/- पुर्ण दिवस रू.7,000/- (स.9 ते दु. 3) रू.7,000/- (दु. 4 ते रा.10)	
	ब) (विना वातानुकुलित)	रू.10,000/-	रू.10,000/-	रू.10,000/- पुर्ण दिवस रू.6,000/- (स.9 ते दु. 3) रू.6,000/- (दु. 4 ते रा.10)	रु.10,000/-
	ओपन टेरेस	रू.10,000/-		रू.7,000/- पुर्ण दिवस रू.4,000/- (स.9 ते दु. 3) रू.4,000/- (दु. 4 ते रा.10)	
	दिवाबत्ती दर खुर्ची भाडे पाणी वापर, साफसफाई खर्च	रू.20/- रू.10/- रू.750/- रू.1500/-		रू.20/- रू.10/- रू.750/- रू.1500/-	

प्रभाग समिती क्र. ०२ कार्यक्षेत्रात असलेले समाजमंदिर हॉल

अ.क्र.	समाज मंदिर हॉल	सध्याचे दर	सुधारित भाडे दर
१.	विनायक समाज मंदिर हॉल		
	तळ मजला	१,०००/-	पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.१,५००/- अर्धा दिवस (सकाळी ९ ते दुपारी ३) -रू.१,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.१,०००/- अनामत रक्कम रू.२,०००/-
	दुसरा मजला	२,५००/-	पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.३,०००/- अर्धा दिवस (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.२,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.२,०००/- अनामत रक्कम रू.५,०००/-
	तिसरा मजला	१,५००/-	पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.२,०००/- अर्धा दिवस (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.१,५००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.१,५००/- अनामत रक्कम रू.३,०००/-

	कृष्ण सभागृह हॉल (सदर हॉलची दुरूस्ती करून हॉल भाडयाने देण्यात यावा.)	पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.३,०००/- अर्धा दिवस (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.२,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.२,०००/- अनामत रक्कम रू.५,०००/-
३.	भाईंदर (प.) स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स (जैनाचार्य प.पु.आ.ग. श्री अभयदेव सूरिश्वरजी महाराज क्रीडा संकुल)	**पुर्ण दिवसासाठी पुर्ण हॉल - पहिला मजला** (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.४०,०००/- अर्धा दिवस (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.२५,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.२५,०००/- अनामत रक्कम रू.५०,०००/-
		पुर्ण दिवसासाठी अर्धा हॉल - पहिला मजला (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.२५,०००/- अर्धा दिवस (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.१५,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.१५,०००/- अनामत रक्कम रू.३०,०००/-
		पुर्ण दिवसासाठी - तळमजला (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.२५,०००/- अर्धा दिवस (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.१५,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.१५,०००/- अनामत रक्कम रू.३०,०००/-

प्रभाग क्र. ०३ कार्यक्षेत्रात असलेले हॉल

अ.क्र.	सभागृह केंद्र इत्यादीचे नाव व पत्ता	सध्याचे दर	सुधारित भाडे दर
१.	लोकमान्य टिळक सभागृह, नवघर रोड, सचिन तेंडुलकर मैदान	विना वातानुकूलित भाडे (Non AC) रू.८,०८०/- वातानुकूलित भाडे (AC) रू.१५,१६०/-	**विना वातानुकूलित** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.९,०००/- अर्धा दिवस अनामत रक्कम रू.१०,०००/- (सकाळी ९ ते दुपारी ३) -रू.५,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.५,०००/- अनामत रक्कम रू.७,०००/- **वातानुकूलित** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.१७,०००/- अर्धा दिवस अनामत रक्कम रू.१५,०००/-

			(सकाळी ९ ते दुपारी ३) -रू.९,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.९,०००/- अनामत रक्कम रू.१०,०००/-
२.	वेस्गुरू परमपूज्य श्री वामनश्रम महास्वामी सभागृह, सचिन तेंडुलकर मैदानच्या बाजूला	विना वातानुकूलित भाडे (Non AC) रू.८,०८०/- वातानुकूलित भाडे (AC) रू.१५,१६०/-	**विना वातानुकूलित** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.९,०००/- अर्धा दिवस अनामत रक्कम रू.१०,०००/- (सकाळी ९ ते दुपारी ३) -रू.५,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.५,०००/- अनामत रक्कम रू.७,०००/- **वातानुकूलित** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.१७,०००/- अर्धा दिवस अनामत रक्कम रू.१५,०००/- (सकाळी ९ ते दुपारी ३) -रू.९,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.९,०००/- अनामत रक्कम रू.१०,०००/-
३.	स्वामी विवेकानंद सभागृह, जेसल पार्क	विना वातानुकूलित भाडे (Non AC) रू.४,५४०/- वातानुकूलित भाडे (AC) रू.१०,४५०/-	**विना वातानुकूलित** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.५,०००/- अर्धा दिवस अनामत रक्कम रू.७,०००/- (सकाळी ९ ते दुपारी ३) -रू.३,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.३,०००/- अनामत रक्कम रू.५,०००/- **वातानुकूलित** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.१०,०००/- अर्धा दिवस अनामत रक्कम रू.१०,०००/- (सकाळी ९ ते दुपारी ३) -रू.६,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.६,०००/- अनामत रक्कम रू.७,०००/-
४.	प्रभाग समिती क्र. ०३ कार्यालय, तलाव रोड, समाज मंदिर हॉल		पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.६,०००/- अर्धा दिवस अनामत रक्कम रू.८,०००/-

			(सकाळी ९ ते दुपारी ३) -रू.४,०००/- (सायंकाळी ४ ते रात्री १०) रू.४,०००/- अनामत रक्कम रू.५,०००/-

प्रभाग कार्यालय क्र. ४.

प्रभाग कार्यक्षेत्रात असलेले मनपाचे सभागृह बाबतची माहिती

अ.क्र	समाजमंदिर /हॉल नाव पत्ता	सध्याचे दर	सुधारित भाडे दर
१.	स्व. प्रमोद महाजन सभागृह, पहिला मजला (विना वातानुकूलित)	रू.१५,०००/-	**विना वातानुकूलित (नॉन एसी)** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.२०,०००/- अनामत रक्कम रू.२५,०००/- अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.१२,०००/- अर्धा दिवसाकरिता (सायं ४ ते रात्री १०) - रू.१२,०००/- अनामत रक्कम रू.१५,०००/-
२.	स्व. प्रमोद महाजन सभागृह, दुसरा मजला (वातानुकूलित)	रू.२०,०००/-	**वातानुकूलित (एसी)** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.३०,०००/- अनामत रक्कम रू.३५,०००/- अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.१५,०००/- अर्धा दिवसाकरिता (सायं ४ ते रात्री १०) - रू.१५,०००/- अनामत रक्कम रू.२०,०००/-
३.	कम्युनिटी सभागृह (हॉल) (विना वातानुकूलित), हैदरी चौक, मिरारोड पुर्व ठाणे	रू.१२,५००/-	**विना वातानुकूलित (नॉन एसी)** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.१५,०००/- अनामत रक्कम रू.२०,०००/- अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.८,०००/- अर्धा दिवसाकरिता (सायं ४ ते रात्री १०) - रू.८,०००/- अनामत रक्कम रू.१०,०००/-
४.	कम्युनिटी सभागृह (हॉल) (वातानुकूलित), हैदरी चौक, मिरारोड पुर्व	रू.१५,०००/-	**वातानुकूलित (एसी)** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.२०,०००/- अनामत रक्कम रू.२५,०००/- अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.११,०००/- अर्धा दिवसाकरिता (सायं ४ ते रात्री १०) - रू.११,०००/- अनामत रक्कम रू.१५,०००/-
५.	मिनाताई बाळासाहेब ठाकरे सभागृह, तळ मजला (विना वातानुकूलित)	रू.१५,०००/-	**विना वातानुकूलित (नॉन एसी)** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.२०,०००/- अनामत रक्कम रू.२५,०००/- अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.१२,०००/- अर्धा दिवसाकरिता (सायं ४ ते रात्री १०) - रू.१२,०००/- अनामत रक्कम रू.१५,०००/-

अ.क्र	समाजमंदिर /हॉल नाव पत्ता	सध्याचे दर	सुधारित भाडे दर
६.	मिनाताई बाळासाहेब ठाकरे सभागृह, दुसरा मजला (वातानुकूलित)	रू.३०,०००/-	**वातानुकूलित (एसी)** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.३०,०००/- अनामत रक्कम रू.३५,०००/- अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.२०,०००/- अर्धा दिवसाकरिता (सायं ४ ते रात्री १०) - रू.२०,०००/- अनामत रक्कम रू.२५,०००/-
७.	पद्मभूषण डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह, तळ मजला (विना वातानुकूलित)	रू.९०,०००/-	**विना वातानुकूलित (नॉन एसी)** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.६०,०००/- (सदर भाडे दरात उपलब्ध खुर्च्यांचे भाडे समाविष्ट आहे) (अर्ध्या दिवसाकरीता देण्यात येऊ नये) अनामत रक्कम रू.७०,०००/-
८.	पद्मभूषण डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह, पहिला मजला (वातानुकूलित)	रू.१,००,०००/-	**वातानुकूलित (एसी)** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.७०,०००/- (सदर भाडे दरात उपलब्ध खुर्च्यांचे भाडे समाविष्ट आहे) (अर्ध्या दिवसाकरीता देण्यात येऊ नये) अनामत रक्कम रू.८०,०००/-
९.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानातील समाज मंदिर (विना वातानुकूलित)	रू.६,०००/-	**विना वातानुकूलित (नॉन एसी)** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.६,०००/- अनामत रक्कम रू.८,०००/- अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.३,०००/- अर्धा दिवसाकरिता (सायं. ४ ते रात्री १०) - रू.३,०००/- अनामत रक्कम रू.५,०००/-
१०.	धम्म सम्राट अशोक बुद्ध विहार, मिरारोड पुर्व	रू.२५,०००/- रू.१०,०००/-	**वातानुकूलित (एसी)** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.२५,०००/- अनामत रक्कम रू.३०,०००/- अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.१५,०००/- अर्धा दिवसाकरिता (सायं. ४ ते रात्री १०) - रू.१५,०००/- अनामत रक्कम रू.२०,०००/- **कॉन्फरन्स हॉल (एसी)** पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.१०,०००/- अनामत रक्कम रू.१५,०००/- अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.६,०००/- अर्धा दिवसाकरिता (सायं. ४ ते रात्री १०) - रू.६,०००/- अनामत रक्कम रू.१०,०००/-

साफसफाई खर्च रू.५,०००/- (जेवण असल्यास) आणि रू.३,०००/- (जेवण नसल्यास)
लाईट बील दराप्रमाणे व रू.१२ प्रति खुर्चीचे दर आकारण्यात यावे.

प्रभाग कार्यालय क्र. ५

अ.क्र.	समाजमंदिर हॉलचे नाव पत्ता	सध्याचे दर	सुधारीत भाडेदर
१.	सावित्रीबाई फुले समाज मंदिर (बरखा शांतीनगर इमारत समोर सेक्टर-०८ शांतीनगर, मिरारोड पुर्व)	-	पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.३,०००/- अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३) - रू.२,०००/- अर्धा दिवसाकरिता (सायंकाळी ४ ते रात्री १०) - रू.२,०००/-

प्रभाग कार्यालय क्र. ६

अ.क्र.	समाजमंदिर हॉलचे नाव पत्ता	सध्याचे दर	सुधारीत भाडेदर
१.	संत समाजमंदिर हॉल, पेणकर पाडा	प्रति दिवस रू.५,०००/-	पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.३,०००/- अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३) -रू.२,०००/- अर्धा दिवसाकरिता (सायं ४ ते रात्री १०) रू.२,०००/-
२.	आरक्षण क्र. ...., कम्युनिटी हॉल, काशिमिरा	प्रति दिवस रू.५,०००/-	पुर्ण दिवसासाठी (सकाळी ९ ते रात्री १०) - रू.३,०००/- अर्धा दिवसाकरिता (सकाळी ९ ते दुपारी ३) -रू.२,०००/- अर्धा दिवसाकरिता (सायं ४ ते रात्री १०) रू.२,०००/-

- **मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या भव्य वास्तूंवर यापूर्वी कधीही मंत्री महोदय किंवा लोकप्रतिनिधींचे फोटो लावण्याची पद्धत नव्हती. परंतु, प्रशासकीय कार्यकाळात मोठ्या प्रमाणात आणि प्रथमच महापालिकेच्या वास्तूंवर चुकीच्या पद्धतीने (राजशिष्टाचाराचे उल्लंघन करून) मंत्री महोदय व लोकप्रतिनिधींचे फोटो लावण्यात आले आहेत. वास्तविक, महापालिकेने वास्तूंच्या उद्घाटनावेळी राजशिष्टाचाराचे पालन करून नामफलक लावण्याची नियमावली तयार केलेली होती आणि त्यानुसारच महापालिकेच्या वास्तूंवर उद्घाटनाप्रसंगी केवळ अधिकृत नामफलक लावण्यात आले होते.**

प्रशासकीय कार्यकाळात उद्घाटन झालेल्या वास्तूंवर चुकीच्या पद्धतीने (राजशिष्टाचाराचे उल्लंघन करून) लावण्यात आलेले मंत्री महोदय व लोकप्रतिनिधींचे फोटो सन्मानपूर्वक काढण्यात यावेत आणि महापालिकेच्या मूळ ठरावानुसार केवळ योग्य ते नामफलक लावण्यात यावेत.

- **महापालिकेच्या भव्य वास्तू - स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे कलादालन, स्वर्गीय गोपीनाथ मुंडे क्रीडा संकुल, भाईंदर पश्चिम येथील जैनाचार्य प.पु.आ.ग. श्री अभयदेव सूरिश्वरजी महाराज क्रिडासंकुल, लता मंगेशकर नाट्यगृह, स्वर्गीय प्रमोद महाजन सभागृह, स्वर्गीय मीनाताई बाळासाहेब ठाकरे सभागृह, पद्मभूषण डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह आणि धम्म सम्राट अशोक बुद्ध विहार इत्यादी वास्तूंची देखभाल, दुरुस्ती, निगा राखणे आणि त्यांचे संचलन करणे आवश्यक आहे. या वास्तू महापालिकेने खालील अटीशर्तीनुसार निविदा प्रक्रिया करावी.**

अ) शुल्क व महसूल संकलन (Fees & Revenue Sharing):

पालिका निर्धारित शुल्क: निविदाधारकाने (Agency) वापरकर्त्या नागरिकांकडून/खेळाडूंकडून फक्त महापालिकेने मंजूर व निश्चित केलेल्या दरपत्रकानुसारच (Approved Fee Structure) शुल्क आकारायचे आहे. स्वतःच्या मर्जीने अतिरिक्त शुल्क आकारता येणार नाही.

महापालिकेचा महसूल हिस्सा (Revenue Share %): नागरिकांकडून जमा होणाऱ्या एकूण शुल्कापैकी/उत्पन्नापैकी निविदाधारकाने किमान [X]% रक्कम प्रतिमहा/प्रतिवर्ष महापालिकेकडे महसूल म्हणून जमा करणे बंधनकारक राहील. (ज्या निविदाधारकाचा टक्केवारीचा प्रस्ताव महापालिकेच्या जास्त फायद्याचा असेल, त्यास प्राधान्य दिले जाईल.)

ब) दैनंदिन खर्च व व्यवस्थापन (O&M Expenses):

वास्तूचा ताबा घेतल्यापासून खालील सर्व प्रकारचा दैनंदिन व देखभाल खर्च निविदाधारकाला स्वतःच्या उत्पन्नातून करावा लागेल:

कर्मचारी व मनुष्यबळ: सिक्युरिटी गार्ड्स, हाऊसकीपिंग, प्रशिक्षक (Coaches), मॅनेजर आणि इतर तांत्रिक/अकुशल कर्मचारी.

उपयोगिता बिले (Utility Bills): वीज बिल, पाणी पट्टी, इंटरनेट व टेलिफोन बिल, लिफ्ट.

दुरुस्ती व निगा: दैनंदिन स्वच्छता, किरकोळ इत्यादी दुरुस्ती, रंगकाम, उपकरणांची देखभाल.

क) २०% दुरुस्ती राखीव निधी (Repair Reserve Fund - 20% Provision):

राखीव रक्कम: जमा होणाऱ्या एकूण शुल्कामधून २०% रक्कम ही एका स्वतंत्र संयुक्त खात्यात (Escrow Account / Reserve Fund) 'दुरुस्ती निधी' म्हणून जमा ठेवली जाईल.

करारात शेवटची दुरुस्ती: ५ वर्षांचा कंत्राट कालावधी संपल्यानंतर, या २०% राखीव रकमेचा वापर करून संपूर्ण वास्तूची, उपकरणांची आणि परिसराची मूळ स्थितीसारखी (Original Condition) डागडुजी, रंगकाम व दुरुस्ती करावी लागेल.

ताबा हस्तांतरण: वास्तूची पूर्ण दुरुस्ती करून ती पूर्ववत पहिल्यासारखी सुस्थितीत महापालिकेच्या स्वाधीन केल्यानंतरच कराराची पूर्णता मानली जाईल व स्वतंत्र संयुक्त खात्यात (Escrow Account / Reserve Fund) उरलेली रक्कम % प्रमाणे निविदाधारकास परत देण्यात येईल.

ड) निविदाधारकाची पात्रता (Eligibility Criteria)

संस्थेचा प्रकार: मान्यताप्राप्त स्पोर्ट्स क्लब, क्रीडा संस्था, चॅरिटेबल ट्रस्ट, प्रायव्हेट लि. कंपनी किंवा सक्षम एजन्सी.

अनुभव: संबंधित क्षेत्रात (क्रीडा संकुल/हॉल/कला दालन व्यवस्थापन) किमान ३ ते ५ वर्षांचा यशस्वी अनुभव असणे आवश्यक.

आर्थिक क्षमता: मागील ३ वर्षांचे ऑडिट केलेले आर्थिक पत्रक (Turnover Certificate) सादर करणे बंधनकारक.

जीएसटी व पॅन नोंदणी: वैध GST आणि PAN कार्ड असणे आवश्यक.

	मैदाने, आरजी क्षेत्र, खुल्या जागा, उद्याने	लहान जागा आर.जी. व इतर भुखंड	मोठया जागा मैदान	अनामत	लहान जागा व इतर भुखंड	मोठया जागा / मैदान	अनामत
		अ	ब	क	अ	ब	क
	अ) शाळेच्या शैक्षणिक कार्यक्रमासाठी RG मोकळे भुखंड	रु.6,000/-	रु.10,000/-	रु.5,000/-	रु.6,000/-	रु.10,000/-	रु.10,000/-
	ब) खेळांसाठी/ क्रिडास्पर्धा	रू.5,000/-	रु.10,000/-	रू.2,000/-	रू.5,000/-	रु.10,000/-	रू.5,000/-
	क) धार्मिक कार्यक्रमासाठी	रू.5,000/-	रु.10,000/-	रू.2,000/-	रू.5,000/-	रु.10,000/-	रू.5,000/-
	ड) स्वातंत्र दिन, महाराष्ट्र दिन आणि त्या प्रकारच्या राष्ट्रीय व महत्त्वाच्या प्रसंगी व राष्ट्रीय महापुरुषांच्या जयंतीच्या व पुण्यतिथी समारंभासाठी	रू.5,000/-	रु.10,000/-	रू.2,000/-	रू.5,000/-	रु.10,000/-	रू.5,000/-
	क्रिकेट खेळपट्टया						
	<u>सीझन खेळपट्टी</u>						
	शाळा/ महाविद्यालयीन विदयार्थी	रू.100/- प्रति दिन (दररोज 2 तास)		-	500/- प्रति महिना		
	शहरातील क्लब/संघ	रू.600/- प्रति दिन (दररोज 2 तास)		-	1500/- प्रति महिना		
	शहराबाहेरील क्लब/संघ	रू.800/- प्रति दिन (दररोज 2 तास)		-	5000/- प्रति महिना		
	<u>मॅट विकेट</u>						
	शाळा /महाविद्यालयीन विदयार्थी	रू.250/- प्रति दिन (दररोज 2 तास)		-	500/- प्रति महिना		
	शहरातील क्लब / संघ	रू.1200/- प्रति दिन (दररोज 2 तास)		-	2500/- प्रति महिना		
	शहराबाहेरील क्लब/संघ	रू.1800/- प्रति दिन (दररोज 2 तास)		-	2500/- प्रति महिना		
	<u>साधी खेळपट्टी</u>						
	शाळा /महाविद्यालयीन विदयार्थी	रू.100/- प्रति दिन (दररोज 2 तास)		-	500/- प्रति महिना		
	शहरातील क्लब / संघ	रू.100/- प्रति दिन (दररोज 2 तास)		-	1500/- प्रति महिना		
	शहराबाहेरील क्लब/संघ	रू.1500/- प्रति दिन (दररोज 2 तास)		-	5000/- प्रति महिना		
	<u>टेनिस खेळपट्टी</u>						
	शाळा /महाविद्यालयीन विदयार्थी	रू.100/- प्रति दिन (दररोज 2 तास)			500/- प्रति महिना		
	शहरातील क्लब / संघ	रू.200/- प्रति दिन (दररोज 2 तास)			500/- प्रति महिना		
	शहराबाहेरील क्लब/संघ	रू.400/- प्रति दिन (दररोज 2 तास)			1000/- प्रति महिना		
	शुटींगसाठी रस्ता / मालमत्ता भाडयाने देणे.						
	रस्ता	रू.35,000/- प्रति ठिकाण		रू.15,000/-	35,000/-		रू.20,000/-
	मालमत्ता	रू.35,000/- + संबंधित मालमत्तेचे भाडे दर		रू.15,000/-	रू.35,000/- + संबंधित मालमत्तेचे भाडे दर		रू.20,000/-
	उद्यान व मैदान (1 एकर क्षेत्रापर्यत)	रू.75,000/- प्रति ठिकाण		रू.15,000/-	75,000/-		20,000/-

	मैदाने, आरजी क्षेत्र, खुल्या जागा, उद्याने	लहान जागा आर.जी. व इतर भुखंड	मोठया जागा मैदान	अनामत	लहान जागा व इतर भुखंड	मोठया जागा / मैदान	अनामत
		अ	ब	क	अ	ब	क
	(1 एकरच्या वरील क्षेत्रासाठी)	रू.1,50,000/- प्रति ठिकाण		रू.25,000/-	1,50,000/-		30,000/-
	रस्ते, सार्वजनिक जागावर मंडप परवानगी अ) मंडप परवानगी (विक्री करीता)	10.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन		-	20.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन		**मुख्य रस्त्यावर परवानगी देण्यात येवू नये.**
	ब) मंडप परवानगी (लग्न / इतर उत्सव)	5.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन		-	5.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन		
	क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शैक्षणिक संस्था)	5000/- प्रति चौ.फुट / प्रति दिन		-	5000/- प्रति दिन		
	(इतर संस्था)	10,000/- प्रति चौ.फुट / प्रति दिन		-	10,000/- प्रति चौ.फुट / प्रति दिन		
	सार्वजनिक जागा, फुटपाथ यावर ठेवण्यात येणारे सामान	100/- प्रति चौ. फुट प्रतिदिन दंड (विनापरवानगी) Restrospective effect ने अंमलबजावणी करणे		-	200/- प्रति चौ. फुट प्रतिदिन दंड (विनापरवानगी) Restrospective effect ने अंमलबजावणी करणे		

<u>मिरा भाईंदर महानगरपालिकेची समाज मंदिरे, व्यायामशाळा, वाचनालय व योगा शेड इ. मालमत्ता तीन ते पाच वर्ष मुदतीसाठी भाड्याने देण्यासाठीचे धोरण.</u>

1) मालमत्ता 3 ते 5 वर्ष मुदतीसाठी करारनामा करुन देण्यात येईल.
2) सदर नेमलेल्या संस्थानी फक्त त्यांच्या संस्थेचा फलक महानगरपालिकेकडून मजकूर व याची साईझ मंजूर करुन घेऊन लावण्यास यावा. तसेच महानगरपालिकेत नामकरण केलेली नाम फलक सुध्दा मोठ्या आकारात बसवुन द्यावा लागेल.
3) मालमत्तेची दैनंदिन साफसफाई, सुरक्षा व्यवस्था संस्थेस करावी लागेल, महानगरपालिकेमार्फत कर्मचारी नेमण्यात येणार नाहीत.
4) सदर मालमत्तेची देखभाल दुरुस्ती, रंगरंगोटी कामे महानगरपालिकेच्या सुचनेप्रमाणे वेळोवेळी करावी लागतील.
5) सदर ठिकाणी वीज जोडणी व पाणी जोडणी महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल, तथापी त्याची मासिक देयक संस्थेस भरावे लागेल.
6) मंजूर नकाशा व्यतिरिक्त अतिरिक्त कोणतेही बांधकाम करता येणार नाही.
7) सदर संस्थेने कोणत्याही संस्थेस अथवा इसमास ही मालमत्ता हस्तांतरण अथवा भाडयाने देता येणार नाही.
8) सदर मालमत्ता दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्ती कशाप्रकारे करणार या बाबत कर्मचाऱ्याची पदे संस्था, वेतन या सह माहिती दयावी लागेल. त्या कर्मचाऱ्यांचे कोणतेही दायीत्व मनपाचे राहणार नाही.

9) सदर जागेच्या ठिकाणी काही अपघात घडल्यास अथवा हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.

10) मालमत्तेच्या जागेबाबत वाद निर्माण झाल्यास करारनामा रद्द करण्यात येईल.

11) दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीचे काम समाधानकारक न आढळल्यास 7 दिवसाची नोटीस देऊन करारनामा रद्द करण्यात येईल.

12) सदर संस्थांनी मागील तीन वर्षाच्या Audited Balance Sheet जोडणे बंधनकारक राहील.

13) प्राप्त अर्जातुन मागणीनुसार कोणत्याही एका संस्थेस एक अथवा एकापेक्षा जास्त मालमत्ता देखभाल, संचलन, दुरुस्तीसाठी देण्याबाबतचा अंतिम निर्णय मा. महासभा, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.

14) सदर संस्था महानगरपालिकेची कोणत्याही देयकाची थकबाकीदार नसावी.

15) यशस्वी संस्थेकडून भाड्याच्या कालावधी करीता सुरक्षा अनामत रक्कम ठरवून घेण्यात यावी.

16) सर्व मालमत्ता देताना भाडयासोबत जी.एस.टी. रक्कम वसुल करण्यात यावी.

18) यापुर्वी भाडयाने दिलेल्या व मुदत संपलेल्या तसेच करारनामा रद्द केलेल्या सर्व मालमत्ता रिकामी करून ताब्यात घेण्यात याव्यात व ठरविलेल्या भाडयानुसार अल्प/दिर्घ मुदतीसाठी भाडयाने देण्यात याव्यात.

19) ज्या मालमत्तांची महानगरपालिका प्रशासनास आवश्यकता आहे अशा मालमत्ता भाडयाने देण्यात येऊ नये.

20) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अभ्यासिका, वाचनालय, व्यायामशाळा, रंगमंच, स्टेज, योगाशेड दैनंदिन संचलन नियुक्त स्थानिक नोंदणीकृत संस्थांकडून अर्ज मागवून त्यांना तीन वर्ष मुदतीसाठी देण्यात यावे.

21) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मोठ्या वास्तू उदा. अप्पासाहेब धर्माधिकारी हॉल, बुद्धविहार, स्व. गोपीनाथ मुंडे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स / भाईंदर (प.) स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स (जैनाचार्य प.पु.आ.ग. श्री अभयदेव सूरिश्वरजी महाराज क्रीडा संकुल) / लता मंगेशकर नाट्यगृह / स्व. प्रमोद महाजन हॉल / मिनाताई ठाकरे सभागृह इत्यादी 5 वर्ष मुदतीसाठी देण्यात याव्यात.

<u>महानगरपालिकेच्या मालमत्ता अल्प मुदतीसाठी भाड्याने देण्यासाठीचे धोरण.</u>

1) मैदाने, सभागृह व मालमत्ता प्रामुख्याने शैक्षणिक, सामाजिक व वैज्ञानिक उपक्रमांना प्राधान्याने देण्यात येतील.

2) छोटया सभागृहात स्वयंपाक करता येणार नाही.

3) कोणतीही मालमत्ता, सभागृहे भाडयाने देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांनी अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्यांचे राहतील.

4) कोणतीही मालमत्ता, सभागृहे याबाबत आरक्षणाचे बाबतीत काही वाद निर्माण झाल्यास त्याचे अधिकार मा. स्थायी समितीस राहतील.

5) कोणतीही मालमत्ता, सभागृहे यांची देखभाल निगा व दुरुस्ती कार्यकारी अभियंता तथा मिळकत व्यवस्थापक यांचे अधिपत्याखाली राहतील.

6) कोणतीही मालमत्ता/सभागृहे विशेष बाब म्हणून भाडयाने देताना भाडयात 50% पर्यंत सवलत देण्याचे किंवा नाममात्र भाड्याने सभागृहे देण्याचे अधिकार स्थायी समितीस राहतील.

7) ठरविलेल्या धोरणात काही तांत्रिक अडचणी आल्यास किंवा काही बाबी राहून गेल्यास तसेच शुल्कामध्ये बदल करावयाचा असल्यास त्याचे अधिकार मा. स्थायी समिती / महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता यांच्य समितीस देण्यात येत आहेत.

8) मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित व्यक्ती/ संस्थेवर राहील व संबंधितांचे (डिपॉझीट) अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल व दंड आकारुन नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल.

9) कार्यक्रम रद्द झाल्यास सदरच्या कार्यक्रमासाठी भरलेले भाडे संबंधितांना परत मिळणार नाही. अर्जदाराने कार्यक्रमाच्या 3 दिवस अगोदर बुकिंग रद्द केल्यास 30% अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. अर्जदाराने परवानगी घेऊन कार्यक्रम आयोजन न केल्यास 100% अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. मिरा भाईंदर महानगरपालिकेने बुकिंग रद्द केल्यास 100% अनामत रक्कम परत करण्यात येईल.

10) महापालिकेस मालमत्तेच्या जागा, सभागृहे यांची आवश्यकता असल्यास संबंधितांचे आरक्षण रद्द करणेत येईल व सदरचे संस्थेस / व्यक्तीस जागा खाली करुन पालिकेच्या ताब्यात द्यावे लागेल व संबंधितांस सदर बाबतीत कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

11) कोणत्याही मालमत्तेबाबत वाद निर्माण झाल्यास स्थायी समितीचे निर्णय अंतिम राहतील व सदरचे निर्णय संबंधितांवर बंधनकारक राहील.

12) शासनाकडून वेळोवेळी येणाऱ्या सुचना/ आदेश यांचे पालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहतील.

13) ज्या संस्थेस / व्यक्तीस महानगरपालिकेच्या मालमत्ता भाडयाने देण्यात आले असेल त्या संस्थेस / व्यक्तीस कोणत्याही कारणास्तव सदरहू मालमत्ता इतर संस्थेस / व्यक्तीस वापरास परस्पर देता येणार नाही.

14) मालमत्ता भाड्याने देताना आरक्षण ज्या दिवसापासून पाहिजे आहे तो दिवस वगळुन 60 दिवस मैदान / सभागृह आरक्षित करता येईल. त्या आधी आलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

15) महापालिकेने मालमत्ता भाडयाने देणेबाबत वेळोवेळी दिलेले आदेश संबंधितांवर बंधनकारक राहतील.

16) महानगरपालिका मालमत्तेमध्ये कोणताही कार्यक्रम करण्यापुर्वी त्या त्या कार्यक्रमाच्या स्वरुपाच्या अनुषंगाने केंद्र/राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम व आदेशाची पुर्तता व अनुपालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहील. याबाबत कोणत्याही प्रकारे नियमभंग झाल्यास त्याची जबाबदारी संपुर्णपणे संबंधित व्यक्ती / संस्थेची राहील.

17) सदर मालमत्ता नोंदणीकृत सेवाभावी संस्था, कोणत्याही नोंदणीकृत संस्था, कंपनी, भागीदारी संस्था यांना देण्यात येतील.

18) वाहनतळ आरक्षणातील जागा धार्मिक व इतर कार्यक्रमासाठी भाडयाने देण्यात यावी.

<u>मार्केट / मंडईतील गाळे भाड्याने देण्याबाबत प्रस्तावित धोरण :</u>

1) भाजी मंडईतील गाळयाचे भाडे प्रतिमाह, 6 x 4 फुटासाठी भाजी/ मासळी विक्रेत्यासाठी रु.4,500/- मटन विक्रेत्यांसाठी रु.6,000/- प्रमाणे राहील. प्रतिवर्षी सदर भाडयात 5% वाढ करणेत येईल,
   अथवा महापालिका वेळोवेळी त्या बाबत निर्णय घेईल.

2) भाजी मंडईतील गाळा 11 वर्षाच्या भाडेपट्टा कराराने देणेत येईल. पुढील मुदतवाढ देणेचे अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहे.

3) ओटा फक्त भाजी, मासळी, फुल व्यवसायासाठी आहे. इतर कोणतेही व्यवसाय ओटयात करता येणार नाही. सदर ओटयात अर्जदार व त्यांचे कुंटुबीय यांनाच फक्त व्यवसाय करता येईल.

4) सदरचा ओटा महापालिकेच्या परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही. वारसाच्या नावे ओटा हस्तांतरीत करण्यास महापालिकेच्या परवानगी घ्यावी लागेल.

5) मंडईची वेळ सकाळी 7.00 ते रात्री 10.00 वाजेपर्यंत राहील.

6) विक्रीचा माल फक्त देण्यात आलेल्या गाळयामध्ये ठेवावा अन्य मोकळया जागेचा वापर त्यासाठी करू नये.

7) सदर ओटयाची दुरुस्ती व निगा हे मंजुर ओटेधारकाने स्वखर्चाने करावयाची आहे. मात्र सदर ओटयात कोणत्याही प्रकाराचा फेरबदल करावयाचा नाही. दुरुस्तीसाठी महापालिकेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

8) सदर ओटयात स्पोटक किंवा ज्वालाग्राही सामान ठेवता येणार नाही.

9) विक्रीस ठेवलेल्या मालाचा निरुपयोगी भाग अगर कोणत्याही प्रकारची घाण मंडईमध्ये ठरविलेल्या जागीच टाकली पाहिजे इतरत्र कोठेही ठेवता येणार नाही.

10) सदर ओटयाचा विक्रेता किंवा नोकर हा संसर्गजन्य रोगापासून मुक्त असला पाहिजे.

11) वेळोवेळी ओटेधारकांची अगर त्याचे सेवकांची शारिरीक तपासणी व विक्री करिता ठेवलेल्या मालाची तपासणी महापालिकेचे आरोग्य अधिकारी अगर महापालिकेने पाठविलेल्या अन्य अधिकारी यांना करण्याचा अधिकार राहील.

12) उपयोगात आणणेची मापे व काटे सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेतली असली पाहिजे.

13) कोणत्याही ओटेधारकाला गिऱ्हाईकांच्या आकर्षणाकरीता जोरजोराने ओरडण्यास मनाई आहे तसेच कर्ण/ कर्कश ध्वनीचा व त्यासंबंधी साहित्याचा उपयोग करता येणार नाही. तसे केल्यास त्याला जागा रिकामी करावी लागेल.

14) सदर ओटयाची दिलेली मुदत संपताच ओटयाची मालकी महापालिकेची असेल. त्याबद्दल कोणताही हक्क व नुकसान भरपाई मागता येणार नाही.

15) ओटेधारकांने ओटयाचे भाडे दर महिन्याच्या 10 तारखेच्या आत महापालिकेकडे आगाऊ भरले पाहिजे. दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधीचे भाडे थकीत राहिल्यास महापालिका कोणतीही पुर्व सुचना न देता महापालिका ओटा ताब्यात घेईल.

16) अर्जदार संस्थेने जागेची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन प्रत्येकी जागेसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा. सदर जागा "जशी आहे तशी "As in where is" देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

17) अर्जदाराने स्थानिक वास्तव्याचा दाखला (तहसिलदार कार्यालय) देणे बंधनकारक राहिल.

    अ) जे अर्जदार मासिक भाडे भरण्याचा पर्याय स्विकारतील अशा अर्जदार/ व्यक्ती/ संस्थांनी 11 महिन्याचे मासिक भाडे (डिमांड ड्राफ्ट /post dated cheque) व्दारे महानगरपालिकेस अदा करावे लागेल व सोबत अर्जदार / संस्थेचे ज्या बँकेत खाते असेल, (सध्या व्यवहार होत असलेले) त्या बँकेतील खाते क्रमांक व पासबुकातील पहिल्या पानाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

ब) GST COUNCIL यांचे दिनांक 19/05/2017 रोजीच्या मंजुरीनुसार GST Reverse Charges VIDE SR.NO.6 (1) अन्वये महानगरपालिकेच्या भाडे वसूली संदर्भात Renting of immovable Property वर दिनांक 01 जुलै 2017 पासून 18% GST (GOODS & SERVICE TAX) लागु झाला आहे. संबंधीत अर्जदार /व्यक्ती /संस्थांना भाडयाच्या रक्कमेवर नियमानुसार अधिक वस्तु सेवा शुल्क (GST) व अन्य कर भरणा करणे बंधनकारक राहील.

क) अर्जदार संस्थेने ज्या दिवसापासून जागा वापरण्याकरीता घेतली आहे त्या दिवसापासूनचे भाडे भरणा करणे, अर्जदार संस्थेस दोन महिन्यापेक्षा जास्त भाडे थकीत केल्यास मासिक भाडयानुसार दरमहा 2% प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

ड) अर्जदार संस्थेच्या त्या वर्षातील कामाचा आढावा घेऊन पुढील वर्षाकरीता मुदतवाढ देणे अथवा भाडेकरार रद्द करणे बाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त यांचा असेल.

21) महानगरपालिकेने बांधलेले मार्केट मधील गाळे व इमारत संचलन देखभाल व दुरूस्तीसाठी कंत्राटदार नेमून दयावयाचा असल्यास वरील धोरणानुसार भाडे व अटीशर्तीनुसार कंत्राटदार नेमण्यात यावा. सदर अधिकार स्थायी समिती यांना राहिल.

22) महापालिका मिळकतीमध्ये विदयुत व पाणी व्यवस्था नसल्यास अर्जदारास ती स्वत: करावी लागेल व त्याकरीता आवश्यक नाहरकत दाखला महापालिकेकडून देण्यात येईल.

23) सद्यस्थितीत सदर जागा आधार नोंदणी. निवडणुक मतदार नोंदणी अथवा इतर मनपाच्या/शासकीय कामाकारीता वापरात असेल किंवा पुर्नविकासाच्या प्रक्रियेत असेल तर सदरचे शासकीय काम पुर्नविकास पुर्ण झालेनंतर पात्र अर्जदारास जागेचा ताबा देण्यात येईल व ताबा दिनांकापासून करारनामा व भाडे अस्तित्वात येईल.

24) जागा भाडयाने उपलब्ध करुन देणेकरीता प्राप्त अर्ज देकार स्विकारणे अथवा नाकारणे किंवा एखादया एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास अशा संस्थेस किती जागा द्यावी याबाबतचे अधिकार मा. स्थायी समिती यांना राहतील.

मोकळ्या जागेवर मार्केट मधील लाभार्थी निश्चित करणे

1) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्षेत्रातील रहीवाशांना मार्केटची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी आरक्षणाच्या ताब्यातील व विकसित न झालेल्या जागा, मोकळ्या जागा यावर तात्पुरत्या स्वरूपात मा. आयुक्त यांनी जागा निश्चित करून मार्केट बांधण्यात यावेत. सदर मार्केटच्या जागा हया सर्व प्रभागात निश्चित करून खाजगी विकासकाकडून बांधून न घेता महानगरपालिकेमार्फत बांधण्यात यावेत. सदर मार्केटमध्ये शेड, कॉंक्रीट कोबा, शौचालय, पाणी इ. व्यवस्था करण्यात यावी.

2) सदर मार्केटमध्ये बसविण्यात येणारे विक्रेते शक्यतो संबंधित प्रभागातील रहिवासी असावेत तसेच त्यांच्याकडे किमान 10 वर्षांपासून विक्रेता म्हणून व्यवसाय करीत असल्याचा वैध पुरावा असणे आवश्यक राहील. पात्र लाभार्थ्यांनी अर्जामध्ये खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास त्यांच्याकडून रु. 50,000/- इतका दंड वसूल करण्यात यावा. तसेच संबंधित लाभार्थ्याने दंडाची रक्कम न भरल्यास ती मालमत्ता करामधून वसूल करण्यात यावी. सदर लाभार्थ्यांचा अन्य कोणताही व्यवसाय नसावा तसेच ते कोणत्याही शासकीय/खाजगी नोकरीत कार्यरत नसावेत अथवा त्यांच्या नावावर कोणताही वाणिज्य गाळा नसावा. एका परिवारातील केवळ एका सदस्यासच या योजनेचा लाभ देण्यात यावा.

3) सदर विक्रेत्यांची यादी, मार्केट मधील जागे पेक्षा जास्त झाल्यास लॉटरी सिस्टीम ने जागा वितरीत कराव्यात.

4) सदर विक्रेत्यांकडून रु.150/- प्रति दिन फी घेण्यात यावी. तसेच रू.5000/- लायसन्स फी घ्यावी.

5) शौचालय पे अॅन्ड यूज तत्वावर 15 वर्ष मुदतीसाठी बांधण्यास परवानगी देण्यात येईल. सदर संस्थांनी शौचालयाची देखभाल व दुरूस्ती व्यवस्थित ठेवावी.
6) सदर मार्केटची साफसफाई, सुरक्षा व्यवस्था, पाणी व्यवस्था, विज व्यवस्था संचलन करणाऱ्या कंत्राटदाराने करावी.
7) सदर मार्केटच्या जागा व मार्केट बांधण्याचे काम बांधकाम विभागाने करावे किंवा मार्केट BOT पद्धतीने विकसित करावे. मार्केट मध्ये बसविण्यात येणारे विक्रेते यांची निश्चिती संबधित प्रभाग अधिकारी यांनी समितीच्या अभिप्रायानूसार करावी.
8) सदर मार्केट संचलन व देखभालीसाठी आवश्यकता वाटल्यास खाजगी कंत्राटदार यांना देण्यात यावे.
9) सर्व प्रथम ज्या रस्त्यावर फेरीवाल्यांमुळे अडथळा निर्माण होत आहे त्या रस्त्यावरील फेरीवाले हटवून स्थलांतरीत करावे. तद्नंतर सदर रस्त्यावर पुन्हा फेरीवाले बसणार नाही, याची दक्षता प्रभाग अधिकारी घ्यावी. तरीही फेरीवाले बसल्यास प्रभाग अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी.

<u>शुटींग धोरण</u>

1) शुटींग करीता परवानगीसाठी संबधितांनी शुटींगच्या दिवसापूर्वी 5 दिवस आधी अर्ज करून फी व अनामत रक्कम भरून परवानगी घेणे बंधनकारक राहील, संबधित विभाग प्रमुख यांनी याबाबत दक्षता घ्यावी.
2) शुटींगसाठी परवानगी दिलेल्या क्षेत्रातील एजन्सी धारक यांना परवानगीची एक प्रत देण्यात यावी. विनापरवानगी शुटींग सुरू असल्याचे आढळल्यास संबधित मुकादम यांनी तात्काळ सदर घटना प्रभाग मिळकत व्यवस्थापक यांच्या निदर्शनास आणावी.
3) विनापरवानगी शुटींग करताना आढळल्यास संबधिताकडून परवानगी फी 10 पट दंड वसूली करून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.

<u>स्मशानभूमी/ दफनभूमी, विरंगुळा केंद्र, क्रिकेट पिच / फुटपाथ</u>

1) स्मशानभूमी, दफनभूमी संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना 3 वर्ष मुदतीसाठी निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल.
2) विरंगुळा केंद्र संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल. तसेच अर्ज आल्यास देखील करारनामा करून संचलनास देण्यात यावा.
3) क्रिकेट पीच फुटबॉल पीच, स्केटींग जागा दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रीया करुन संस्थेची निवड करण्यात यावी व तीन वर्ष मुदतीसाठी जागा भाडयाने देण्यात यावी.
4) शहरातील महानगरपालिकेच्या जागा, रस्ते, गटाराचा स्लॅब, पदपथावर व्यापारी/ दुकानदार/ गॅरेजवाले/ इतर हे विविध ठिकाणच्या जागा अनेक दिवसापासून वापरत आहेत. त्यांची व्यापारी तत्वासाठी जागेचा उपयोग केला असल्याने पूर्वलक्षी प्रभावाने त्यांचे कडून अनधिकृत वापरासाठी जागा भाडे वसूल करावे.

मैदाने :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मैदाने भाड्याने देणेसाठी खालीलप्रमाणे धोरण सादर करण्यात येत आहे.

1. प्रस्तावना :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण 20 मैदाने असुन सदर मैदानांचा वापर खेळा व्यतिरिक्त इतर कार्यक्रमांसाठी होत असुन मैदानाची नासधुस होऊन महानगरपालिकेस सदर मैदान पुर्ववत करण्यासाठी वेळोवेळी खर्च येत असतो. सदर मैदाने मुलांना खेळण्यासाठी जास्तीत-जास्त वेळा उपलब्ध होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अ नुसार विहीत केलेल्या वापरासाठी मैदाने व इतर जागा वर्षातील 45 दिवसाकरीता भाडयाने देणे आवश्यक आहे. इतर वेळेस मैदाने व इतर जागा सर्वसाधारण नागरीकांच्या वापरासाठी व मुलांना खेळण्यासाठी खुली राहावी. याबाबत शासनाने विहित केलेल्या कालमर्यादेत मैदाने खेळा व्यतिरिक्त वापरणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करुन नव्याने धोरण तयार करण्याची आवश्यकता आहे.

2. व्याप्ती :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मंजुर विकास योजनेतील व महानगरपालिकेच्या ताब्यातील सार्वजनिक वापर होत असलेली मैदाने - मैदानाची यादी खालीलप्रमाणे आहे.

1) भाईंदर पश्चिम नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान
2) राई आरक्षण क्र.56 सी सर सेनापती कान्होजी आंग्रे मैदान
3) चौक आरक्षण क्र.01 नरवीर चिमाजी आप्पा मैदान
4) भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.122 अ जैसलपार्क सिताराम चौधरी मैदान
5) भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.122 अ जैसलपार्क बालाजी खेळ मैदान
6) भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.122 अ जैसलपार्क राम कापसे मैदान
7) भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.122 सी भारतरत्न सचिन तेंडूलकर मैदान
8) भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.122 ब नवघर शाळा मैदान
9) भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.111 अ नवघर स्व. आनंद दिघे मैदान
10) भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.117 नवघर केसरीनाथ पाटील उर्फ बादशाह मैदान
11) भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.221 स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान
12) मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.170 आला हजरत इमाम एहमद खाजाँ मैदान
13) मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.178 भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम मैदान
14) पेणकरपाडा आरक्षण क्र.353 मधील मैदान
15) मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.300 नामदार गोखले मैदान
16) घोडबंदर आरक्षण क्र.314 भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान
17) भाईंदर (प.) आरक्षण क्र.96 शहीद भगतसिंग मैदान
18) आरक्षण क्र.246 पद्मभुषण मेजर ध्यानचंद मैदान
19) मिरागांव आरक्षण क्र.355 स्व. श्री यशवंत भोईर मैदान
20) बादशाह मैदान, नवघर जुने तलावाच्या मागे

3. मैदान बुकिंग करण्याची पध्दत :-

अ) मैदान आहे त्या स्थितीत भाड्याने देण्यात येईल व शनिवार / रविवार मैदाने भाड्याने देण्यात येऊ नये.

ब) मैदान ज्या दिवसापासुन भाड्याने पाहिजे तो दिवस वगळुन अगोदर 60 दिवस मैदान आरक्षित करावे लागेल. त्याआधी आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

क) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 (1950 चा मुंबई 29) अन्वये नोंदणी केलेल्या सार्वजनिक न्यासाला; किंवा संस्था नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) अन्वये किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 (1961 चा महा. 24) अन्वये नोंदणी केलेल्या संस्थेस किंवा कंपनी अधिनियम, 1956 (1656 चा 1) अन्वये नोंदणी केलेल्या कंपनीस किंवा व्यक्तीस मैदान भाड्याने देण्यात येईल. अर्ज स्विकारताना मालमत्ता कराच्या देयकाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

ड) मैदान आरक्षणासाठी ऑनलाईन / ऑफलाईन (जी पध्दत सुरु असेल त्यानुसार) रु.5000/- रक्कम भरुन मैदान आरक्षित करावे लागेल. अर्जदारामार्फत आरक्षण रद्द केल्यास बुकिंगची पुर्ण रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच महानगरपालिकेमार्फत रद्द केल्यास सदर रक्कम परत देण्यात येईल.

इ) मैदान आरक्षित करताना संस्थेचे नाव, पत्ता, नोंदणी क्रमांक, कार्यक्रमाचा उद्देश, कार्यक्रमाचा कालावधी याचा तपशील घेणे, पोलीस विभाग, अग्निशमन विभाग, वाहतूक विभाग यांचेकडील नाहरकत दाखला प्रभाग अधिकारी यांनी घ्यावे.

ई) ज्या जागेत कार्यक्रम करावयाचा आहे त्यामधील करण्यात येणाऱ्या सुविधा व पार्किंगचे नियोजन (वाहनांचे पार्कींग मैदानात करता येणार नाही) दर्शविणारा नकाशा इ. माहिती सोबत जोडावी लागेल.

उ) मैदाने आरक्षणाचे बाबतीत काही वाद निर्माण झाल्यास त्याचे अधिकार मा. स्थायी समितीस राहतील.

4. मैदान भाड्याने देण्यासाठी मंजुरीचे अधिकार :-

अ) मैदान भाड्याने देण्यासाठी बुकींग रक्कम प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभाग, उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग तसेच मालमत्ता व्यवस्थपन विभाग व संबंधित सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती यांच्या कार्यालयाकडुन नेमलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्यामार्फत संयुक्त पाहणी होऊन मैदान ज्या प्रयोजनासाठी भाड्याने मागण्यात आले आहे त्याबाबत चौकशी व खातरजमा करुन मैदान भाड्याने देणेबाबत निर्णय घेण्यात येईल.

ब) मैदान भाड्याने देण्याचा अधिकार वृक्ष प्राधिकरण विभागाच्या मुख्य उद्यान अधिक्षक यांना राहील.

5. मैदानांचा अनुज्ञेय वापर :-

नियोजन प्राधिकरण यासंबंधात वेळोवेळी काढलेल्या आदेशाद्वारे अशा आदेशामध्ये यथास्थिती नियोजन प्राधिकरणाने विनिर्दीष्ट केलेल्या अटीवर व शर्तीवर एकावेळी 11 दिवसापेक्षा अधिक नसेल इतक्या तसेच दोन कार्यक्रमाच्या मध्ये 4 दिवसांचे अंतर आणि कोणत्याही परिस्थितीत एका कॅलेंडर वर्षामध्ये 45 दिवसापेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी कोणत्या संघटनेला किंवा संघाला अशा कोणत्याही क्रिडांगणाचा वापर करता येणार नाही. मैदाने आरक्षित केलेल्या दिवसाव्यतिरीक्त मंडप / इतर सुविधा उभारणेकरीता व काढण्याकरीता जे दिवस अपेक्षित असतील त्या दिवसांचेसुद्धा भाडे आकारण्यात येईल.

1) स्वातंत्र्य दिन

2) प्रजासत्ताक दिन

3) महाराष्ट्र दिन

4) त्या प्रकारच्या राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रसंगी समारंभाकरीता

5) राष्ट्रीय महापुरुषांच्या जयंतीच्या व पुण्यतिथीच्या प्रसंगी समारंभाकरीता

6) धार्मिक आणि समाजिक समारंभ

7) सार्वजनिक सभा

6. भाडे दर :-

अ.क्र.	कार्यक्रमाचा तपशिल	भाडेदर (प्रति दिन)	
		5000 चौ. मीटर क्षेत्रापर्यंतचे आतिल मैदान	5000 चौ. मीटर क्षेत्रापेक्षा मोठे क्षेत्रफळ मैदान
1)	राष्ट्रीय महत्वाचे कार्यक्रम, महापुरूषांच्या जयंती, पुण्यतिथी समारंभ प्रसंगासाठी	5,000/-	10,000/-
2)	क्रिडा उपक्रम	10,000/-	15,000/-
3)	धार्मिक, सामाजिक व इतर कार्यक्रम	20,000/-	40,000/-

अ) प्रति दिन भाड्यासोबत मैदानात उभारण्यात येणारे मंडप/स्टेज यांची फी निश्चित केलेल्या दरानुसार घेण्यात यावी.

ब) वरील सर्व दर हे 5 वर्षासाठी असुन दरवर्षी 5 किंवा 10% वाढ गृहीत धरुन भाडे आकारण्यात येईल.

क) वरील नमुद भाडे रक्कमेवर नियमानुसार वस्तु व सेवा कर अधिक आकारण्यात येईल.

7. सुरक्षा अनामत व अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम :-

अ) रू.1,00,000/- सुरक्षाम अनामत घेण्यात यावी.

ब) मैदान खराब व नादुरूस्त केल्यास सदर मैदान पुर्ववत करण्यासाठी लागणारी रक्कम सुरक्षा अनामत रक्कमेतून वजा करून उर्वरित रक्कमेचा परतावा करण्यात यावा. जर सदर ठिकाणी विनापरवानगी व भाडे न भरता तात्पुरते स्ट्रक्चर / मंडप / स्टेज उभारल्यास व त्याची फी जमा केली नसल्यास त्याची फी सुरक्षा रक्कमेतून वजा करण्यात यावी. रक्कम वसुल करताना अडचणी आल्यास त्यांच्या मालमत्ता कराच्या बिलावर बोजा चढवावा.

क) मैदान / जागा भाड्याने देताना कार्यक्रमाच्या कालावधीचा विचार न करता कार्यक्रमासाठी स्टेज / मंडप उभारणी कालावधी व मंडप स्टेजचे सामान जो पर्यंत मैदानात शिल्लक असेल त्या कालावधी पर्यंत भाड्याची व दंडाच्या रकमेची गणना करण्यात यावी व सदर रक्कम अनामत रक्कमेतून वजा करण्यात यावी.

8. परवानगी रद्द करणे, अनामत रक्कम परतावा व दंडाबाबतच्या तरतुदी :-

अ) अर्जदाराने कार्यक्रमाच्या 3 दिवस अगोदर बुकिंग रद्द केल्यास 30% अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

ब) अर्जदाराने कार्यक्रम 72 तासांच्या आत रद्द केल्यास 50% अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

क) अर्जदाराने परवानगी घेऊन कार्यक्रम आयोजन न केल्यास 100% अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

ड) मिरा भाईंदर महानगरपालिकेने बुकिंग रद्द केल्यास 100% अनामत रक्कम परत करण्यात येईल.

9. मैदानाचा ठिकाणानिहाय अनुज्ञेय वापर :-

अ) सर्व मैदाने क्रिडा उपक्रमाकरीता देण्यात यावी.

ब) खालील मैदानात धार्मिक / सामाजिक / सार्वजनिक इत्यादी कार्यक्रम अनुज्ञेय राहणार नाहीत.

1) भाईंदर पश्चिम नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान
2) भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.221 स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान
3) आरक्षण क्र.246 पद्मभुषण मेजर ध्यानचंद मैदान

क) उपरोक्त अ.क्र. 9 ब मधील मैदाना व्यतिरीक्त सर्व मैदानात सर्व कार्यक्रम करण्यास अटीशर्तीप्रमाणे परवानगी देण्यात यावी.

11. पार्किंग व्यवस्था तरतुद :-

अ) मैदानात पार्कींगची व्यवस्था करू नये.

ब) कार्यक्रमाच्या ठिकाणी येणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहनांच्या पार्किंगसाठी कार्यक्रमाच्या आयोजकांनी पर्यायी व्यवस्था करावी. जेणेकरून रस्त्यावर पार्किंग होणार नाही

क) पार्किंग ठिकाणी सुरक्षा रक्षक व वाहन चालक नेमुन वाहने उभ्या करण्यासाठी नियोजन स्वखर्चाने करावे लागेल.

ड) पार्किंगसाठी स्वतंत्र प्रवेश व बाहेर जाण्यासाठी मार्ग ठेवावा लागेल. परवानगी पुर्वी पार्किंग नियोजनाबाबत नकाशा सादर करणे बंधनकारक राहील.

12. अटीशर्ती :-

1) मैदाने महापालिकेच्या कार्यक्रमाकरिता विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येतील. मैदाने कोणत्याही राजकीय पक्षांच्या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत.

2) लग्नकार्य, साखरपुडा इ. साठी मनपाचे कोणतेही मैदान भाडयाने देण्यात येणार नाही. सामुहीक विवाहाच्या कार्यक्रमासाठी मैदाने भाड्याने देवू नये.

4) ज्या संस्थेस / व्यक्तीस महानगरपालिकेचे मैदान भाडयाने देण्यात आले असेल त्या संस्थेस / व्यक्तीस कोणत्याही कारणास्तव सदरहू मैदाने इतर संस्थेस / व्यक्तीस वापरास परस्पर देता येणार नाही.

5) सदर कार्यक्रमाकरीता स्थानिक पोलीस ठाणे, वाहतूक पोलीस विभाग अग्निशमन विभाग यांच्या आवश्यक परवानग्या / नाहरकत पत्र घेणेकरीता मुख्य उद्यान अधिक्षक यांनी व्यवस्था करावी.

6) कार्यक्रमा ठिकाणी आवश्यक व्यवस्था उभारणी, देखभाल व संचलनासाठी नेमण्यात येणाऱ्या मनुष्यबळाची यादी महानगरपालिका व पोलीस विभागास आवश्यक माहीती व कागदपत्रासह उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

7) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अ नुसार मैदाने व इतर जागा वर्षातील 45 दिवसाकरीता भाडयाने देण्याची दक्षता घेण्यात येईल. इतर वेळेस मैदाने व इतर जागा सर्वसाधारण नागरीकांच्या वापरासाठी खुली राहील.

8) मैदानांची देखभाल निगा व दुरुस्ती कार्यकारी अभियंता, बांधकाम / उदयान अधिक्षक तथा मिळकत व्यवस्थापक यांचे अधिपत्याखाली राहतील.

9) शासनाकडून वेळोवेळी येणाऱ्या सुचना/ आदेश यांचे पालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहतील.

10) महापालिकेने मैदाने भाडयाने देणेबाबत वेळोवेळी दिलेले आदेश संबंधितांवर बंधनकारक राहतील.

11) महानगरपालिका मैदानांमध्ये कोणताही कार्यक्रम करण्यापुर्वी त्या त्या कार्यक्रमाच्या स्वरुपाच्या अनुषंगाने केंद्र / राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम व आदेशांची पुर्तता व अनुपालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहील. याबाबत कोणत्याही प्रकारे नियमभंग झाल्यास त्याची जबाबदारी संपुर्णपणे संबंधित व्यक्ती / संस्थेची राहील.

12) लग्नकार्य, साखरपुडा, प्रदर्शन, करमणुकीचे कार्यक्रम इ. साठी मनपाचे कोणतेही मैदान भाडयाने देण्यात येणार नाही.

13) सदर मैदानाच्या मंडपासाठी खड्डे न करता ड्रम अथवा इतर व्यवस्था करुन मंडप उभे करावे.

14) अवजड वाहनांना मैदानामध्ये सामान घेऊन जाण्यासाठी प्रवेश बंदी राहील.

15) मैदानाचा वापर झाल्यानंतर सदर मैदानाची उद्यान अधिक्षक यांच्यामार्फत पहाणी करून मैदानाची नासधूस, मैदानातील कचरा, माती व इतर साहीत्य हटवून मैदानाची स्वच्छता केली नसल्यास तसेच नासधूस केली असल्यास मैदान पुर्ववत करण्याकरीता येणारा खर्च अनामत रक्कमेतून कपात करून घेण्यात यावा.

16) रात्री 10 नंतर ध्वनीक्षेपक / मैदानातील फ्लडलाईट बंद करणे बंधनकारक राहील.

17) अनुदानीत शाळांकरीता मैदाने मोफत उपलब्ध करून दयावीत.

18) क्रिकेट व्यतिरीक्त पारंपारीक खेळांच्या स्पर्धा उदा. खोखो, कबड्डी, कुस्ती यासारख्या राज्यस्तरीय स्पर्धांना मैदाने विनामुल्य उपलब्ध करून दयावीत.

19) Online Booking व Single Window System तयार करण्यात यावीत.

13. प्राधान्य व भाड्यापासुन सुट :-

अ) केंद्र शासन / राज्य शासन व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्रमांना प्राधान्याने विनामुल्य परवानगी देण्यात येईल.

ब) क्रिडा कार्यक्रम, शाळांचे शैक्षणिक व वैज्ञानिक उपक्रम या कार्यक्रमांना प्राधान्याने परवानगी देण्यात येईल.

14. महासभा, स्थायी समिती व आयुक्त यांचे अधिकार :-

अ	महानगरपालिकेने मैदान भाड्याने देण्याबाबत निश्चित केलेल्या धोरणात सार्वजनिक हिताच्या दृष्टीने व कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक बदल करण्याचे तसेच सुधारणा करण्याचे, विशेष अटीशर्ती ठरविण्याचे अधिकार मा. महासभेची मंजुरी घेवून आयुक्त यांना राहतील.
ब	मैदाने भाड्याने देण्याचा अधिकार वृक्ष प्राधिकरण विभागाच्या मुख्य उद्यान अधिक्षक यांना राहील.
क	मैदाने भाडयाने देतांना भाडयांत सवलत देण्याचे अधिकार मा. स्थायी समिती यांना राहतील.
ड	मैदान भाड्याने देण्याबाबत वाद निर्माण झाल्यास मा. स्थायी समिती यांचा निर्णय अंतिम राहील व सदरचा निर्णय संबंधितांवर बंधनकारक राहील.
इ	वरीलप्रमाणे धोरणात नमुद अटीशर्तींचे उल्लंघन केल्यास कारवाई व दंड निश्चित करण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.
ई	शासकीय कार्यालयाकरीता जागा शासनाने मागितल्यास पालिकेतर्फे जागा जागेच्या उपलब्धतेनुसार उपलब्ध करून द्यावी व सदर जागेचा वीज व पाणीबील भरणा संबंधित शासकीय विभागाने करावा.

मिरा-भाईंदर महानगरपालिका फुटबॉल टर्फ / क्रिकेट टर्फ कंत्राटी तत्वावर क्रीडा सुविधांच्या दैनंदिन संचालन, व्यवस्थापन व देखभालीसाठीच्या धोरणास मान्यता देणे.

१. प्रस्तावना

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्रीडा संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी, पायाभूत सुविधांचा प्रभावी वापर सुनिश्चित करण्यासाठी आणि सार्वजनिक-खासगी भागीदारीला प्रोत्साहन देण्यासाठी, महानगरपालिका हद्दीत ठरविण्यात आलेल्या क्रीडा सुविधा संचालन, व्यवस्थापन व देखभाल करण्यासाठी पात्र सेवा पुरवठादारांकडून मागविण्याचे प्रस्तावित करीत आहे.

हा दस्तऐवज, महानगरपालिका व निवडलेल्या सेवा पुरवठादार यांच्यातील कराराचा पाया ठरणाऱ्या जबाबदाऱ्या, सेवा पातळी, बंधनकारक अटी, कार्यप्रदर्शन निर्देशांक आणि प्रशासकीय चौकट यांचा आढावा सादर करतो.

२. उद्दिष्टे

- मिरा-भाईंदर मध्ये क्रीडा सुविधांची गुणवत्ता व उपलब्धता वाढवणे.
- पायाभूत सुविधांचे राष्ट्रीय दर्जाच्या मानकांप्रमाणे संवर्धन व देखभाल करणे.
- युवकांचा व समुदायाचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढविणे.
- खासगी क्षेत्रातील तज्ञाद्वारे पारदर्शक व शाश्वत संचालन सुनिश्चित करणे.
- यामधून मिरा-भाईंदरमहानगरपालिकेस उत्पन्न निर्माण होणार आहे.

३. कराराअंतर्गत समाविष्ट सुविधा

अ.क्र.	सुविधा नाव	प्रकार	स्थान	क्षेत्रफळ (चौ.मी.)	बांधकाम पुर्ण झालेले वर्ष
१	फुटबॉल टर्फ	मैदानी खेळ	भाईंदर (पूर्व), आरक्षण क्र.119 (स्व.गोपीनाथ मुंडे क्रिडासंकुल मार्ग)	1112.00	2025
२	फुटबॉल टर्फ	मैदानी खेळ	भाईंदर (पूर्व), आरक्षण क्र.246, (पद्मभुषण मेजर ध्यानचंद मैदान)	1601.00	2025
३	फुटबॉल टर्फ	मैदानी खेळ	मिरा रोड (पूर्व), आरक्षण क्र.260, (टाऊन पार्क जवळ)	1330.00	2025
४	फुटबॉल टर्फ	मैदानी खेळ	भाईंदर (पूर्व), आरक्षण क्र.122सी (सचिन तेंडुलकर मैदान)	1084.00	2025

४. कामाचे कार्यक्षेत्र (Scope of Work)

सेवा पुरवठादार यांचे खालील प्रमाणे कामाचे स्वरूप असेल.

४.१. संचालन व्यवस्थापन (Operational Management)

- संस्थेस फक्त फुटबॉल टर्फची जागा हस्तांतर करण्यात येईल. त्याव्यतिरिक्त अन्य जागेचा वापर करता येणार नाही.
- महानगरपालिकेच्या वेळापत्रकानुसार दररोज सुविधा उघडणे व बंद करणे.
- प्रवेश नियंत्रण व गर्दी व्यवस्थापन. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता प्रवेश देणे.
- वापरकर्त्यांची नोंदणी व वेळापत्रक ठरविणे.
- सुविधा वापरण्याचे नियम व वेळा दर्शविणे.
- सुविधेमध्ये कोणतेही भौतिक बदल (physical infrastructure) करावयाचे असल्यास, ते मा. आयुक्त, मिरा-भाईंदरमहानगरपालिका यांची पुर्वपरवानगी घेऊनच करणे.
- मनपाने नेमलेल्या संस्थेस दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीचे अधिकार असतील. कोणत्याही प्रकारे दुसऱ्या संस्थेस सदर कामांसाठी नेमता येणार नाही. टर्फची मालकी मिरा भाईंदर महानगरपालिकेची राहील.
- फुटबॉल व क्रिकेट व्यतिरिक्त इतर गेमसाठी टर्फचा वापर करता येणार नाही.
- मनपाने नियुक्त केलेल्या संस्थेने फक्त मिरा भाईंदर महानगरपालिकेचा लोगो, नाव फलकावर लिहावे, संस्थेचे मालक म्हणून सदर टर्फ बाबत कोणत्याही प्रकारे जाहीरात करता येणार नाही.
- सदर टर्फची जागा कोणत्याही अतिक्रमणापासून मुक्त ठेवावी लागेल.

४.२. पायाभूत सुविधा देखभाल (Infrastructure Maintenance)

- दैनंदिन स्वच्छता, किटक नियंत्रण व स्वच्छता व्यवस्थापन.
- नागरी व विद्युत पायाभूत सुविधांची देखभाल (उदाहरणार्थ – लाईट्स) दुरुस्ती.
- उपकरणांची देखभाल (नेट, चटई, टर्फ इत्यादी).
- फुटबॉल टर्फ मधील सर्व साहित्य सामुग्री यांची यादी करण्यात येऊन सदर साहित्य संस्थेस हस्तांतर करण्यात येईल.

४.३. मनुष्यबळ नियुक्ती (Manpower Deployment)

- किमान कर्मचारी नियुक्ती: सुविधा व्यवस्थापक, सहाय्यक, प्रशिक्षक/कोच, सफाई कर्मचारी, सुरक्षा रक्षक.
- नियुक्त कर्मचाऱ्यांचे चारीत्र्य पडताळणी पोलिस मार्फत करण्यात यावी.
- बायोमेट्रिक हजेरी नोंदी मिरा भाईंदर महानगरपालिकासोबत सामायिक केल्या जातील.
- कर्मचाऱ्यांना युनिफॉर्म व ओळखपत्र देणे.
- सदर सर्व कर्मचारी यांची शैक्षणिक पात्रता व अर्हता मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त, यांच्या मान्यतेने निश्चित करुन निविदा प्रक्रिया करण्यात येईल.

४.४. सुरक्षा व देखरेख (Security and Surveillance)

- २४x७ सीसीटीव्ही निगराणी, किमान ३० दिवसांचा व्हिडीओ बॅकअप राखणे बंधनकारक.
- अग्निशामक यंत्रणा, आपत्कालीन मार्ग व प्रकाश व्यवस्था कार्यरत ठेवणे.
- गर्दी नियंत्रण व आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सुरक्षा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक.(वेळोवेळी अहवाल देणे.)

४.५. कार्यक्रम व प्रशिक्षण (Programs & Coaching)

- उन्हाळी/हिवाळी शिबिरे तसेच महिलांकरिता/युवकांकरिता केंद्रित कार्यक्रम आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या पूर्वपरवानगीनेच राबविता येतील.
- कोणताही कार्यक्रम किंवा शिबिर आयोजित करताना मिरा भाईंदर महानगरपालिकेची पुर्वसंमती आवश्यक राहील. कोणत्याही प्रकारच्या जाहिरातीत एमबीएमसी चे लोगो वापरणे बंधनकारक असेल.
- महानगरपालिका आयोजित करणार असलेले स्पर्धा/टुर्नामेंट्स विनामूल्य असतील. अशा स्पर्धा/स्पर्धांची अंतिम मान्यता व निर्णयाचे अधिकार आयुक्तांकडे असतील.
- सदर ठिकाणी संस्थेने जाहीरात केल्यास महानगरपालिकेच्या धोरण व दरानुसार जाहीरात फी भरणे बंधनकारक राहील.

४.६. महसूल संकलन (Revenue Collection)

- वापरकर्त्यांकडून शुल्क वसुली फक्त मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दरपत्रकानुसारच करण्यात यावी.

वेळ	**वापरकर्ता प्रकार**	**शुल्क (प्रति तास)**
सकाळी – ६:०० ते ११:००	सामान्य नागरिक	₹ 1000/-
सकाळी – ६:०० ते ११:००	विद्यार्थी (ओळखपत्र आवश्यक)	₹ 500/-
संध्याकाळी – ६:०० ते १०:००	सामान्य नागरिक	₹ 1200/-
संध्याकाळी – ६:०० ते १०:००	विद्यार्थी (ओळखपत्र आवश्यक)	₹ 600/-

- ना-नफा तत्त्वावर आधारित किंवा सामुदायिक क्रीडा कार्यक्रमांसाठी – **२५% सवलत**
- विशेष प्रकरणांमध्ये सवलत देण्याचा अधिकार स्थायी समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे असेल.
- सर्व व्यवहारांसाठी ई-बिलिंग प्रणालीचा वापर अनिवार्य असून पावत्या देणे बंधनकारक राहील.
- सेवा पुरवठादार / संस्था यांच्याकडून मासिक भाडे रू.1,00,000/- + GST बोली सुरूवातीपासून लावावी. (कोणतेही क्रिकेट टर्फ / फुटबॉल टर्फ करीता कमीत कमी रू.1,00,000/- + GST मासिक भाडे घेणे अनिवार्य असेल.
- वापरकर्त्यांकडून शुल्कासोबत GST रक्कम घेण्यात येईल.
- वापरकर्त्यांकडून जमा केलेली GST रक्कम शासन निधीत जमा करणेची जबाबदारी संबंधीतांची राहील.

५. करार कालावधी (Contract Period)

- **प्रारंभिक कालावधी:** 3 वर्षे
- **वाढीची शक्यता:** वार्षिक कार्यप्रदर्शन मूल्यमापन व परस्पर सहमतीच्या आधारे **प्रत्येक 11 महिन्याच्या दोन मुदतवाढी देण्यात येतील.**

६. पात्रता निकष (Eligibility Criteria)

बोली लावणारी संस्था / सेवा पुरवठादार यांना खालील अटींचे पालन करणे आवश्यक आहे :

1	निविदेची फी (Tender Form Fee) (Scan Copy) रू.29000/-
2	बयाणा रक्कम – (Earnest Money Deposit) (EMD) (Scan Copy) रू.30,000/-
3	वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate) (Scan Copy)
4	पॅनकार्डची प्रत (कंपनी / भागीदारी संस्था निविदा भरत असेल तर संबंधित कंपनी / भागीदारी संस्था यांच्या नावाचे पॅनकार्ड असणे बंधनकारक आहे. प्रोप्रायटरी फर्म्सचे पॅनकार्ड प्रोप्रायटरच्या नावाचे असावे.) (Scan Copy)
5	निविदा धारकांचे (Bidder) कंपनी / भागीदारी संस्था / प्रोप्रायटरी फर्म्स इत्यादी संबंधित संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र. (Scan Copy)
6	सरासरी वार्षिक उलाढाल : निविदाकराची मागल 03 वर्षाची सरासरी उलाढाल कामाच्या किंमती किमान 75% असावी. (C. A. Certificate Scan Copy)
7	निविदाकाराला शासकीय / निमशासकीय संस्था / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळाने काळया यादीत टाकलेले नाही, याबाबतचे निविदाकाराच्या लेटर हेडवरील हमीपत्र. (Scan Copy)
8	निविदाकाराने निविदे सोबत सादर केलेल्या दस्ताऐवजांची सत्यता दर्शविणारे रू.500/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र. (Scan Copy)
9	फुटबॉल टर्फ बांधकाम किंवा फुटबॉल टर्फ चालविण्याच्या व्यवस्थापनाचा किमान 3 **वर्षांचा अनुभव** याबाबत खाजगी, शासकीय संस्थेचा अनुभव दाखले जोडणे बंधनकारक राहील.
10	ग्राहक संदर्भ (client references) व कार्यप्रदर्शन प्रमाणपत्रे सादर करणे.

11	कोणत्याही गुन्हेगारी प्रकरणात गुंतलेले नसावे किंवा ब्लॅकलिस्ट केलेले नसावे.

सदर धोरणातील अटीशर्तीत बदल करण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहतील.

७. आर्थिक अटी (Financial Terms)

७.१ महसूल :

महानगरपालिका दरवर्षी महसूल वाटपाचा दर फेरविचार करण्याचा हक्क राखून ठेवते.

७.२ सुरक्षा ठेव (Security Deposit):

सेवा सुरू होण्यापुर्वी रु.10 लाख रक्कमेची परतयोग्य सुरक्षा ठेव जमा करणे आवश्यक आहे.

७.३ दंडात्मक अटी (Penalties):

सेवा पातळी करार (SLA) अंतर्गत अपयश किंवा करारभंग झाल्यास, त्यानुसार रक्कम कपात केली जाईल (तपशील पाहा विभाग ९).

८. सेवा पातळी करार (SLA) (Service Level Agreement)

८.१. कार्यप्रदर्शन मापदंड (Performance Metrics)

मापदंड (Parameter)	SLA मानक (SLA Standard)	निरीक्षण पद्धत (Monitoring Method)	दंड (Penalty)
सुविधा कार्यावधी (Facility Operational Hours)	९८% कार्यरत वेळ	हजेरी नोंदी (Attendance logs)	₹ २,०००/- प्रति दिवस
स्वच्छता (Cleanliness)	९०% समाधान	प्रत्यक्ष पाहणी (Random MBMC inspections)	₹ १,०००/- प्रति तक्रार
कर्मचारी उपस्थिती (Staff Attendance)	१००%	बायोमेट्रिक डेटा (Biometric data)	₹ ५००/- प्रति अनुपस्थित कर्मचारी/दिवस
उपकरण कार्यप्रदर्शन (Equipment Functionality)	१००%	लेखापरीक्षण प्रत्यक्ष (Physical audits)	दुरुस्तीचा खर्च सेवा पुरवठादाराने वहावा (Cost of repair borne by vendor)
तक्रार निराकरण (Complaint Resolution)	२४ तासांच्या आत (Within 24 hrs)	हेल्पडेस्क अहवाल (Helpdesk report)	₹ ५००/- प्रति उशिर केलेले प्रकरण

९. दंड व कपाती (Penalties & Deductions)

- पूर्वपरवानगी न घेता उशिरा उघडणे किंवा लवकर बंद करणे: ₹ १,000/- प्रति प्रसंग.
- अस्वच्छ किंवा आरोग्यदृष्ट्या हानिकारक परिसर: ₹ १,000/- प्रति उल्लंघन.
- अनुपस्थित कर्मचारी: ५००/- प्रति कर्मचारी/दिवस.
- संगणक प्रणालीमध्ये नोंदणी न करता वापरकर्ता शुल्क: ₹ २५,०००/- पर्यंत दंड + संभाव्य करार रद्द होऊ शकतो.
- सदर दंड रक्कम सुरक्षा ठेव रकमेतुन वसुल करण्यात येईल.

१०. मिरा भाईंदर महानगरपालिकेची जबाबदारी (MBMC Responsibilities)

- सुविधांना वापरण्या योग्य स्थितीत प्रवेश प्रदान करणे.
- दरपत्रके व वापरकर्ता धोरणे मंजूर करणे.
- तिमाही पुनरावलोकन (quarterly reviews) करणे.
- तक्रारींच्या निराकरणासाठी सहाय्य प्रदान करणे.

११. कायदेशीर व करार तरतुदी (Legal & Contractual Provisions)

११.१. करार समाप्ती (Termination Clause)

- मिरा भाईंदर महानगरपालिका ३० दिवसांच्या सूचनेवर करार समाप्त करू शकते.
- खालील परिस्थितींमध्ये त्वरित करार समाप्त केला जाईल:
    - फसवणूक, खोटी माहिती देणे, किंवा गुन्हेगारी क्रियाकलाप.
    - कराराचे उल्लंघन.
    - वारंवार वापरकर्ता तक्रारी किंवा सार्वजनिक उल्लंघन.
    - देखभाल दुरूस्ती व संचलनाचा दर्जा योग्य न राखणे.
    - संस्थेने टर्फ वापरणाऱ्या प्रत्येक खेळाडू वापरकर्त्याची नोंदणी संगणक प्रणालीवर करुनच वापर करणे बंधणकारक असून उल्लंघन केल्याचे आढळणे.
    - कराराचा कालावधी संपण्यापूर्वीच काम करणेस बंद केल्यास
    - सुरक्षा ठेवीच्या 50% रकमेपर्यंत दंडाची रक्कम महानगरपालिकेकडून आकारल्यास.

११.२. एक्झिट व्यवस्थापन (Exit Management)

- सेवापुरवठादार संबंधित सुविधा समाधानकारक कार्यरत स्थितीत परत करणे आवश्यक आहे. कार्यरत स्थितीत सुविधा परत न केल्यास सुरक्षा ठेव परतावा देण्यात येणार नाही.
- सर्व देणी (आर्थिक/भौतिक) एक्झिटपूर्वी पूर्णपणे निकाली काढणे आवश्यक आहे.
- हँडओव्हर कालावधीत एमबीएमसी गरजेनुसार संचालनाची जबाबदारी स्वीकारू शकते.

११.३. नुकसानभरपाई व जबाबदारी (Indemnity & Liability)

- सेवापुरवठादार यांच्या कोणत्याही कृतीमुळे झालेल्या नुकसान किंवा हानीसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका नुकसानभरपाईस जबाबदार राहणार नाही. ती सेवा पुरवठादार यांची जबाबदारी असेल. संपत्तीचे नुकसान किंवा वापरकर्त्यांना झालेल्या दुखापतीसाठी संपूर्ण जबाबदारी ही सेवापुरवठादार असेल.

- नैसर्गिक आपत्ती, सरकारी कृती किंवा नागरी अशांतता यासह परंतु त्यात्पुरते मर्यादित नसलेल्या परिस्थितीमुळे, त्यांच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे विलंब किंवा टर्फचे संचालन न झाल्यास कोणताही पक्ष त्यास जबाबदार राहणार नाही. प्रभावित झालेल्या पक्षाने ०७ दिवसांच्या आत दुसऱ्या पक्षास याबाबत कळविले पाहिजे.

१२. विमा (Insurance)

- सेवा पुरवठादाराने खालील बाबतींवर विमा घेणे आवश्यक आहे:
  - सार्वजनिक जबाबदारी (किमान ₹ २५ लाख).
  - कर्मचारी जखमी होण्याचे आणि अपघाती संरक्षण.
  - आग आणि मालमत्तेची हानी (जर लागू असेल).

१३. वाद निराकरण (Dispute Resolution)

- वाद सोडविणेसाठी दोन्ही पक्षाकारांनी चर्चा करुन सौम्यपणे वाद सोडविले जातील. तथापी, 1 महिन्यात तडजोडन झाल्यास संबंधीत पक्षकारांना न्यायालयात जाण्याचे अधिकार राहतील.

१४. गोपनीयता (Confidentiality)

- सेवा पुरवठादार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही डेटा, रेकॉर्ड्स किंवा माहिती उघड करू शकत नाही.
- उल्लंघन झाल्यास कायदेशीर परिणाम होतील आणि त्वरित करार समाप्त केला जाईल.

१५. अहवाल व लेखा तपासणी (Reporting & Audit)
मासिक अहवाल सादरीकरण :

- हजेरी (Attendance)
- महसूल संकलन (Revenue collection)
- देखभाल नोंदी (Maintenance logs)
- कार्यक्रम वेळापत्रक (Program schedules)

- मिरा भाईंदर महानगरपालिकेने अंतर्गत/बाह्य लेखा तपासणी करण्याचा हक्क राखून ठेवला आहे.

१६. न्याय क्षेत्र –

- करारनाम्यातील अटीशर्ती व मुदयाबाबत काहीही कायदेशिरवाद निर्माण झाल्यास मा.न्यायालय ठाणे / मिरा भाईंदर यांना तो खटला चालविण्याचा अधिकार असेल.

सदर कामासाठी सर्वात जास्त बोली लावणाऱ्या संस्थेच्या दराने इतर पात्र संस्थाचे पॅनल करून त्यांना कामे देण्याचा अधिकार स्थायी समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहतील.

विषय :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या जागेवर क्रिकेट पीच उभारुन प्रशिक्षणासाठी पीच वापरणेसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबतचे धोरणास मान्यता देणे.

1. प्रस्तावना

मिरा-भाईंदरमहानगरपालिका क्षेत्रातील १३ मैदानाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असून मालमत्ता व्यवस्थापन विभागामार्फत सदर मैदानात क्रिकेट पीच तयार करुन त्याचे दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्ती करण्याची बाब विचारात घेऊन खालीलप्रमाणे धोरणाचा मसुदा सादर करण्यात येत आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची शहरात विविध मैदाने असून सदर मैदानावर मोठ्या प्रमाणावर खेळाडू खेळण्यासाठी येतात. सदर मैदानावर महानगरपालिका तसेच खाजगी संस्थामार्फत क्रिकेट पीच तयार करुन खेळाडूंना प्रशिक्षण देण्याचे काम करण्यात येते. मिरा-भाईंदर शहरातील खेळाडूना क्रिकेट प्रशिक्षण चांगल्या प्रकारे क्रिकेटचे प्रशिक्षण उपलब्ध व्हावे, यासाठी खालीलप्रमाणे धोरणाचा मसुदा सादर करण्यात येत आहे.

2. उद्दिष्टे

- मिरा-भाईंदर मध्ये क्रीडा सुविधांची गुणवत्ता व उपलब्धता वाढवणे.
- पायाभूत सुविधांचे राष्ट्रीय दर्जाच्या मानकांप्रमाणे संवर्धन व देखभाल करणे.
- युवकांचा व समुदायाचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढविणे.
- खासगी क्षेत्रातील तज्ञाद्वारे पारदर्शक व शाश्वत संचालन सुनिश्चित करणे.
- यामधून मिरा-भाईंदरमहानगरपालिकेस उत्पन्न निर्माण होणार आहे.

3. करारा अंतर्गत समाविष्ट सुविधा

अ.क्र.	सुविधा नाव	प्रकार	स्थान
१	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	भाईंदर (प.) आरक्षण क्र.१२२ सचिन तेंडूलकर मैदान
२	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदान (पाण्याच्या टाकीच्या बाजुस)
३	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदान (सत्संगकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजुस)
४	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	स्व.बाळासाहेबठाकरेमैदानाच्याबाजुसमोकळयाजागेत
5	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	स्व. बाळासाहेब ठाकरे मैदानाच्या बाजुस मोकळया जागेत
6	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	भाईंदर (पुर्व) नवघर शाळेसमोरील मैदान
7	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.२४६ मैदान
8	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.१७० (आला हजरत) मैदान
9	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.१७८ मैदान
10	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	पेणकरपाडा आरक्षण क्र.३५३ मैदान
11	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	आरक्षण क्र.५६ सी केंद्र

अ.क्र.	सुविधा नाव	प्रकार	स्थान
12	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	आरक्षण क्र.३००
13	क्रिकेट पीच	मैदानी खेळ	आरक्षण क्र.३१४

४. कामाचे कार्यक्षेत्र (Scope of Work)

सेवा पुरवठादार संस्था यांचे खालील प्रमाणे कामाचे स्वरूप असेल.

४.१. संचालन व्यवस्थापन (Operational Management)

- संस्थेस क्रिकेट पीचची जागा हस्तांतर करण्यात येईल. त्याव्यतिरिक्त मैदानातील इतर जागेचा वापर करता येणार नाही.
- महानगरपालिकेच्या वेळापत्रकानुसार दररोज सुविधा उघडणे व बंद करणे.
- प्रवेश नियंत्रण व गर्दी व्यवस्थापन. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता प्रवेश.
- वापरकर्त्यांची नोंदणी व वेळापत्रक ठरविणे.
- सुविधा वापरण्याचे नियम व वेळा दर्शविणे.
- सुविधेमध्ये कोणतेही भौतिक बदल (physical infrastructure) करावयाचे असल्यास, ते आयुक्त, मिरा-भाईंदरमहानगरपालिका यांची पूर्वपरवानगी घेऊनच करण्यात येतील.
- मनपाने नेमलेल्या संस्थेस दैनंदिन संचालन, देखभाल व दुरुस्तीचे अधिकार असतील. इतर कोणत्याही प्रकारे दुसऱ्या संस्थेस सदर कामासाठी नेमता येणार नाही. पीचची मालकी मिरा भाईंदर महानगरपालिकेची राहील.
- मनपाने नियुक्त केलेल्या संस्थेने मिरा भाईंदर महानगरपालिकेचा लोगो, नाव फलकावर लिहावे. संस्थेस मालक म्हणून सदर पीच बाबत कोणत्याही प्रकारे जाहिरात करता येणार नाही.
- सदर पीचची जागा कोणत्याही अतिक्रमणापासून मुक्त ठेवावी लागेल.

४.२. पायाभूत सुविधा देखभाल (Infrastructure Maintenance)

- दैनंदिन स्वच्छता, कीटक नियंत्रण व स्वच्छता व्यवस्थापन.
- नागरी व विद्युत पायाभूत सुविधांची (उदाहरणार्थ – लाईट्स) दुरुस्ती.
- उपकरणांची देखभाल (नेट, चटई, पीच इत्यादी).
- क्रिकेट टर्फ मधील सर्व साहित्य सामुग्री यांची यादी करण्यात येऊन सदर साहित्य संस्थेस हस्तांतर करण्यात येईल.

४.३. मनुष्यबळ नियुक्ती (Manpower Deployment)

- किमान कर्मचारी नियुक्ती: सुविधा व्यवस्थापक, सहाय्यक, प्रशिक्षक/कोच, सफाई कर्मचारी, सुरक्षा रक्षक.
- नियुक्त कर्मचाऱ्यांचे चारीत्र्य पडताळणी पोलिस मार्फत करण्यात यावे.
- बायोमेट्रिक हजेरी नोंदीमिरा भाईंदर महानगरपालिकासोबत सामायिक केल्या जातील.
- कर्मचाऱ्यांना युनिफॉर्म व ओळखपत्र असावे.
- सदर सर्व कर्मचारी यांची शैक्षणिक पात्रता व अर्हता मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त, यांच्या मान्यतेने निश्चित करुन निविदा प्रक्रिया करण्यात येईल.

४.४. सुरक्षा व देखरेख (Security and Surveillance)

- २४x७ सीसीटीव्ही निगराणी, किमान ३० दिवसांचा व्हिडीओ बॅकअप राखणे बंधनकारक.
- अग्निशामक यंत्रणा, आपत्कालीन मार्ग व प्रकाश व्यवस्था कार्यरत ठेवणे.
- गर्दी नियंत्रण व आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सुरक्षा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक.(वेळोवेळी अहवाल देणे.)

४.५. कार्यक्रम व प्रशिक्षण (Programs & Coaching)

- उन्हाळी/हिवाळी शिबिरे तसेच महिलांकरिता/युवकांकरिता केंद्रित कार्यक्रम आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या पूर्वपरवानगीनेच राबविता येतील.
- कोणताही कार्यक्रम किंवा शिबिर आयोजित करताना मिरा भाईंदर महानगरपालिकेची पूर्वसंमती आवश्यक राहील. कोणत्याही प्रकारच्या जाहिरातीत एमबीएमसी चे लोगो वापरणे बंधनकारक असेल.
- महानगरपालिका आयोजित करणार असलेले स्पर्धा/टुर्नामेंट्स करीता जागा विनामूल्य असतील. अशा स्पर्धा/स्पर्धांची अंतिम मान्यता व निर्णयाचे अधिकार आयुक्तांकडे असतील.
- सदर ठिकाणी संस्थेने जाहीरात केल्यास महानगरपालिकेच्या धोरण व दरानुसार जाहीरात फी भरणे बंधनकारक राहील.

४.६. महसूल संकलन (Revenue Collection)

- वापरकर्त्यांकडून शुल्क वसुली फक्त मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दरपत्रकानुसारच करण्यात यावी.

सकाळी 7.00 ते 10.00	रु.1000/- महिना प्रति प्रशिक्षणार्थी
संध्याकाळी 4.00 ते 7.00	

- महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना आठवडयातील दोन दिवस प्रशिक्षणार्थ्या सोबत मोफत प्रशिक्षण देणे बंधनकारक राहिल.
- ना-नफा तत्त्वावर आधारित किंवा सामुदायिक क्रीडा कार्यक्रमांसाठी – **२५% सवलत**
- विशेष प्रकरणांमध्ये सवलत देण्याचा अधिकार स्थायी समिती यांच्याकडे असेल.
- सर्व व्यवहारांसाठी ई-बिलिंग प्रणालीचा वापर अनिवार्य असून पावत्या देणे बंधनकारक राहील.
- मान्य केलेल्या अटींनुसार मिरा भाईंदर महानगरपालिके बरोबर उत्पन्न वाटप करण्यात येईल. जे महानगरपालिका व कंत्राटदार यांच्या बँक खात्यात परस्पर जमा होईल. ज्यासाठी कंत्राटदार यांनी त्वरीत संगणक प्रणाली (Software) विकसित करणे बंधनकारक राहील.
- वापरकर्त्यांकडून जमा केलेली GST रक्कम शासन निधीत जमा करणेची जबाबदारी संबंधीतांची राहील.

५. करार कालावधी (Contract Period)

- **प्रारंभिक कालावधी** : 3 वर्ष
- **वाढीची शक्यता:**
  - करार कलावधी 3 वर्ष असेल व अधिकतम 2 वेळा प्रत्येकी 11 महिन्यासाठी नुतनीकरणसाठी पात्र राहिल.
  - अपेक्षित दर्जा न राखल्यास करार रद्द करण्यात येईल.

६. पात्रता निकष (Eligibility Criteria)

बोली लावणारी संस्था / सेवा पुरवठादार यांना खालील अटींचे पालन करणे आवश्यक आहे :

1	निविदेची फी (Tender Form Fee) (Scan Copy) रू.29,000/-
2	बयाणा रक्कम – (Earnest Money Deposit) (EMD) (Scan Copy) रू.30,000/-
3	वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate) (Scan Copy)
4	पॅनकार्डची प्रत (कंपनी / भागीदारी संस्था निविदा भरत असेल तर संबंधित कंपनी / भागीदारी संस्था यांच्या नावाचे पॅनकार्ड असणे बंधनकारक आहे. प्रोप्रायटरी फर्म्सचे पॅनकार्ड प्रोप्रायटरच्या नावाचे असावे.) (Scan Copy)
5	निविदा धारकांचे (Bidder) कंपनी / भागीदारी संस्था / प्रोप्रायटरी फर्म्स इत्यादी संबंधित संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र. (Scan Copy)
6	सरासरी वार्षिक उलाढाल : निविदाकराची मागल 03 वर्षाची सरासरी उलाढाल कामाच्या किंमती किमान 75% असावी. (C. A. Certificate Scan Copy)
7	निविदाकाराला शासकीय / निमशासकीय संस्था / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळाने काळया यादीत टाकलेले नाही, याबाबतचे निविदाकाराच्या लेटर हेडवरील हमीपत्र. (Scan Copy)
8	निविदाकाराने निविदे सोबत सादर केलेल्या दस्ताऐवजांची सत्यता दर्शविणारे रू.500/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र. (Scan Copy)
9	क्रिकेट टर्फ व्यवस्थापनाचा किमान **३ वर्षांचा अनुभव** असणे.
10	ग्राहक संदर्भ (client references) व कार्यप्रदर्शन प्रमाणपत्रे सादर करणे.
11	कोणत्याही गुन्हेगारी प्रकरणात गुंतलेले नसावे किंवा ब्लॅकलिस्ट केलेले नसावे.

सदर धोरणातील अटीशर्तीत बदल करण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहतील.

७. आर्थिक अटी (Financial Terms)

७.१ महसूल वाटप मॉडेल (Revenue Sharing Model):

एकूण मासिक उत्पन्नापैकी कमीत कमी ५०% उत्पन्न मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे देणे बंधनकारक राहील.

महानगरपालिका दरवर्षी महसूल वाटपाचा दर फेरविचार करण्याचा हक्क राखून ठेवते.

७.२ सुरक्षा ठेव (Security Deposit):

सेवा सुरू होण्यापूर्वी रु.10 लाख रक्कमेची परतयोग्य सुरक्षा ठेव जमा करणे आवश्यक आहे.

७.३ दंडात्मक अटी (Penalties):

सेवा पातळी करार (SLA) अंतर्गत अपयश किंवा करारभंग झाल्यास, त्यानुसार रक्कम कपात केली जाईल (तपशील पाहा विभाग ९).

८. सेवा पातळी करार (SLA) (Service Level Agreement)

८.१. कार्यप्रदर्शन मापदंड (Performance Metrics)

मापदंड (Parameter)	SLA मानक (SLA Standard)	निरीक्षण पद्धत (Monitoring Method)	दंड (Penalty)
सुविधा कार्यावधी (Facility Operational Hours)	९८% कार्यरत वेळ	हजेरी नोंदी (Attendance logs)	₹ २,०००/- प्रति दिवस
स्वच्छता (Cleanliness)	९०% समाधान	(Random MBMC inspections) प्रत्यक्ष पाहणी	₹ १,०००/- प्रति तक्रार
कर्मचारी उपस्थिती (Staff Attendance)	१००%	बायोमेट्रिक डेटा (Biometric data)	₹ ५००/- प्रति अनुपस्थित कर्मचारी/दिवस
उपकरण कार्यप्रदर्शन (Equipment Functionality)	१००%	लेखापरीक्षण प्रत्यक्ष (Physical audits)	दुरुस्तीचा खर्च सेवा पुरवठादाराने वहावा (Cost of repair borne by vendor)
तक्रार निराकरण (Complaint Resolution)	२४ तासांच्या आत (Within 24 hrs)	हेल्पडेस्क अहवाल (Helpdesk report)	₹ ५००/- प्रति उशिर केलेले प्रकरण

९. दंड व कपाती (Penalties & Deductions)

- पूर्वपरवानगी न घेता उशिरा उघडणे किंवा लवकर बंद करणे: ₹ २,०००/- प्रति प्रसंग.
- अस्वच्छ किंवा आरोग्यदृष्ट्या हानिकारक परिसर: ₹ १,००० प्रति उल्लंघन.
- अनुपस्थितकर्मचारी: ₹ ५००/- प्रति कर्मचारी/दिवस.
- संकेतस्थळावर नोंदणी न करता वापरकर्ता शुल्क: ₹ २५,०००/- पर्यंत दंड + संभाव्य करार रद्द होऊ शकतो.
- सदर दंड रक्कम सुरक्षा ठेव रकमेतुन वसुल करण्यात येईल.

१०. मिरा भाईंदर महानगरपालिकेची जबाबदारी (MBMC Responsibilities)

- सुविधांना वापरणायोग्य स्थितीत प्रवेश प्रदान करणे.
- दरपत्रके व वापरकर्ता धोरणे मंजूर करणे.
- तिमाही पुनरावलोकने (quarterly reviews) करणे.
- तक्रारींच्या निराकरणासाठी सहाय्य प्रदान करणे.

११. कायदेशीर व करार तरतुदी (Legal & Contractual Provisions)

११.१. करार समाप्ती (Termination Clause)

- मिरा भाईंदर महानगरपालिका ३० दिवसांच्या सूचनेवर करार समाप्त करू शकते.
- खालील परिस्थितींमध्ये त्वरित करार समाप्त केला जाईल:

- फसवणूक, खोटी माहिती देणे, किंवा गुन्हेगारी क्रियाकलाप.
- कराराचे उल्लंघन.
- वारंवार वापरकर्ता तक्रारी किंवा सार्वजनिक उल्लंघन.
- देखभाल, दुरुस्ती व संचलनाचा दर्जा योग्य न राखणे.
- संस्थेने टर्फ वापरणाऱ्या प्रत्येक खेळाडू, वापरकत्याची नोंदणी संगणक प्रणालीवर करणे बंधनकारक असून, उल्लंघन केल्याचे आढळणे.
- कराराचा कालावधी संपण्यापूर्वीच काम करणेस बंद केल्यास
- सुरक्षा ठेवीच्या 50% रकमेपर्यंत दंडाची रक्कम महानगरपालिकेकडून आकारल्यास.

११.२. एक्झिट व्यवस्थापन (Exit Management)

- सेवापुरवठादार संबंधित सुविधा समाधानकारक कार्यरत स्थितीत परत करणे आवश्यक आहे. कार्यरत स्थितीत सुविधा परत न केल्यास सुरक्षा ठेव परतावा देण्यात येणार नाही.
- सर्व देणी (आर्थिक/भौतिक) एक्झिटपूर्वी पूर्णपणे निकाली काढणे आवश्यक आहे.
- हँडओव्हर कालावधीत एमबीएमसी गरजेनुसार संचालनाची जबाबदारी स्वीकारू शकते.

११.३. नुकसानभरपाई व जबाबदारी (Indemnity & Liability)

- सेवापुरवठादार यांच्या कोणत्याही कृतीमुळे झालेल्या नुकसान किंवा हानीसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका नुकसानभरपाईस जबाबदार राहणार नाही. ती सेवा पुरवठादार यांची जबाबदारी असेल. संपत्तीचे नुकसान किंवा वापरकर्त्यांना झालेल्या दुखापतीसाठी संपूर्ण जबाबदारी ही सेवापुरवठादार असेल.
- नैसर्गिक आपत्ती, सरकारी कृती किंवा नागरी अशांतता यासह परंतु त्यात्पुरते मर्यादित नसलेल्या परिस्थितीमुळे, त्यांच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे विलंब किंवा टर्फचे संचालन न झाल्यास कोणताही पक्ष त्यास जबाबदार राहणार नाही. प्रभावित झालेल्या पक्षाने ०७ दिवसांच्या आत दुसऱ्या पक्षास याबाबत कळविले पाहिजे.

१२. विमा (Insurance)

- सेवा पुरवठादाराने खालील बाबतींवर विमा घेणे आवश्यक आहे:
  - सार्वजनिक जबाबदारी (किमान ₹ २५ लाख).
  - कर्मचारी जखमी होण्याचे आणि अपघाती संरक्षण.
  - आग आणि मालमत्तेची हानी (जर लागू असेल).

१३. वाद निराकरण (Dispute Resolution)

- वाद सोडविणेसाठी दोन्ही पक्षाकारांनी चर्चा करुन सौम्यपणे वाद सोडविले जातील. तथापी, 1 महिन्यात तडजोडन झाल्यास संबंधीत पक्षकारांना न्यायालयात जाण्याचे अधिकार राहतील.

१४. गोपनीयता (Confidentiality)

- सेवा पुरवठादार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही डेटा, रेकॉर्ड्स किंवा माहिती उघड करू शकत नाही.
- उल्लंघन झाल्यास कायदेशीर परिणाम होतील आणि त्वरित करार समाप्त केला जाईल.

१५. अहवाल व लेखा तपासणी (Reporting & Audit)

मासिक अहवाल सादरीकरण:

- हजेरी (Attendance)
- महसूल संकलन (Revenue collection)
- देखभाल नोंदी (Maintenance logs)
- कार्यक्रम वेळापत्रक (Program schedules)

- मिरा भाईंदर महानगरपालिकेने अंतर्गत/बाह्य लेखा तपासणी करण्याचा हक्क राखून ठेवला आहे.

१६. न्याय क्षेत्र –

- करारनाम्यातील अटीशर्ती व मुदयाबाबत काहीही कायदेशिरवाद निर्माण झाल्यास मा.न्यायालय ठाणे / मिरा भाईंदर यांना तो खटला चालविण्याचा अधिकार असेल.

सदर कामासाठी सर्वात जास्त टक्केवारी भरण्या-या संस्थेच्या दराने इतर पात्र संस्थाचे पॅनल करून त्यांना कामे देण्याचा अधिकार स्थायी समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहतील.

वरील धोरणानुसार सर्व अटीशर्तींची पुर्तता केल्याशिवाय पालिकेच्या मालमत्ता / मैदाने भाड्याने देण्यात येणार नाही.

तरी यापुर्वी मालमत्ता / मैदाने भाड्याने देण्याबाबत असलेले सर्व आदेश व सक्षम प्राधिकरणाचे निर्णय / ठराव रद्द करुन मा. महासभेने नियुक्त केलेल्या समितीच्या दि.14/07/2026 रोजीच्या बैठकीत समितीने सादर केलेल्या सदर धोरणास मा. महासभेची मान्यता देणेस गठीत समितीची शिफारस आहे.

Dmehta

डिंपल मेहता
महापौर तथा अध्यक्ष, गठीत समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र.– ६० दि. १३/०८/२०२६

विषय :- मा. महासभा दि.०६/०५/२०२६, ठराव क्र. १७ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दिव्यांग, दुध केंद्र, गटई स्टॉलसाठी मंजुरी देण्याकरीता धोरण निश्चित करणेबाबत.

मा. महासभा दि.०६/०५/२०२६, ठराव क्र. १७ अन्वये विषयांकीत बाबत धोरण निश्चित करून महासभेपुढे सादर करणेसाठी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. त्यानुसार गठीत समितीची दि.१४/०७/२०२६ रोजी बैठक घेऊन खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरात दिव्यांग, दुध केंद्र, गटई कामगार यांना उपजिविकेचे साधन म्हणून रस्त्याच्या कडेला, मार्केटस्, मंडई जवळ तसेच शहरातील पदपथास लागून असलेल्या मोकळया छोटया भुखंडावर स्टॉल टाकता यावेत याकरीता अटीशर्ती खालीलप्रमाणे निश्चित केलेल्या आहेत.

अ) दिव्यांग व्यक्तीकरीता स्टॉल देणेबाबत :

१.	दिव्यांग असले बाबतचे सिव्हील रूग्णालयाचे प्रमाणपत्र तसेच UDID कार्ड असणे बंधनकारक आहे.
२.	अ) १००% अंपगत्व असणाऱ्या दिव्यांगाना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. (अ मधील प्राधान्यक्रम संपल्यानंतर) ब) ८०% ते ९९% असणाऱ्यांना व्दितीय प्राधान्य देण्यात येईल.
३.	स्टॉलकरिता परवानगी ही ८० % व त्यापेक्षा जास्त अंपगत्व असलेल्या लाभार्थ्यांना देण्यात येईल.
४.	अर्जदाराचे वय २१ वर्षापेक्षा कमी नसावे.
५.	लाभार्थी / अर्जदार यांचा मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत रहिवासी असल्याचा तहसिलदार कार्यालयाचा स्थानिक रहिवासी दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.
६.	स्टॉल एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला दिला जाईल. तसेच कोणत्याही परिस्थितीत कुटुंबातील किंवा इतर व्यक्तीस हस्तांतरित करता येणार नाही. महाराष्ट्र शासन निर्णय दि.२५/०४/२०२३ मधील अटिशर्ती बंधनकारक असतील.
७.	६' लांबी x ४' रूंदी x ८' उंची एवढ्या मोजमापाची जागा स्टॉल करीता देण्यात यावी.
८.	ज्या रस्त्यांवर ना अंकीत क्षेत्र (एकेरी वाहतूकीचे रस्ते अथवा नो हॉकर झोनच्या रस्त्यावर) आहे अशा रस्त्यावर नविन स्टॉलकरीता जागा देण्यात येणार नाही.
९.	न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे नागरीकांना रहदारीसाठी फुटपाथ मोकळे ठेवण्यात यावे.
१०.	दोन स्टॉलमध्ये कमीत कमी ५०० मीटरचे हवाई अंतर (Areal Distance) असावे.
११.	रू.५००/- प्रति महीना किंवा वेळोवेळी ठरविलेल्या भाडे एवढे भुईभाडे आकारण्यात यावे. तसेच अनामत रक्कम रु.३०००/- जमा करुन सदरचे भाडे हे वार्षिक / सहामाही भरण्यात यावे.
१२.	स्टॉल दिलेल्या परवानगीचे पत्र व भुईभाडे भरल्याची पावती प्रत लाभार्थ्यांच्या फोटोसह स्टॉलमध्ये प्रथम दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास अटीशर्तींचा भंग केल्यामुळे परवाना रद्द केला जाईल.

१३.	१२ मी. ते ४० मी. रुंद रस्त्यावरच स्टॉलकरिता परवानगी देण्यात येईल.
१४.	परवानगी प्रत्येक वेळी १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी राहणार नाही. मुदत संपल्यानंतर अर्जदाराची वागणूक व अटी / शर्तीच्या पालनाबाबत पडताळणी करुनच पुढील १२ महिन्याच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येईल. कालावधी हा त्या वर्षातील ०१ एपिल ते ३१ मार्च पर्यंत ग्राहय धरले जाईल. नविन मुदतवाढ घेताना लाभार्थी हयात असल्याबाबत स्वयंघोषीत प्रमाणपत्र व स्वत:चे जीपीएस लोकशन फोटो जोडणे आवश्यक आहे.
१५.	सदर परवानगी देणे / नाकारणे / रद्द करणेचे अंतिम अधिकार अतिरीक्त आयुक्त व अतिक्रमण उपआयुक्त यांच्या मंजूरीने प्रभाग अधिकारी यांना राहील.
१६.	भविष्यात विकास कामात बाधीत होणारा स्टॉल महानगरपालिकेने सुचित केलेल्या ठिकाणी स्थलांतरीत करणे स्टॉलधारकावर बंधनकारक राहील.
१७.	मा. न्यायालयाने वेळोवेळी पारित केलेले आदेशांचे पालन करणे हे स्टॉल धारकावर बंधनकारक राहील.
१८.	अर्जदार जरी वरील सर्व अटींची पुर्तता करीत असला तरी रस्त्यावरील भविष्यातील रहदारी तसेच स्थानिक परिस्थीतीचा विचार करून नविन स्टॉल / विद्यमान स्टॉलचे नूतनीकरण मंजूर करावयाचे अथवा नाही हे ठरविण्याचे अधिकार महापालिका यांना राहतील.
१९.	स्टॉलमध्ये गॅस सिलेंडर / शेगडीचा वापर करता येणार नाही.
२०.	➢ **ज्या व्यक्तीस परवानगी दिलेली आहे, त्या व्यक्तीनेच व्यवसाय करणे बंधनकारक राहिल.** ➢ **स्टॉल भाडयाने देणे, विकणे किंवा अन्य व्यक्तीस व्यवसाय करिता देता येणार नाही.** ➢ **स्टॉल दिलेल्या जागेवरच उभारणे, अन्य ठिकाणी स्थलांतरीत करता येणार नाही.** ➢ **स्टॉलमध्ये तंबाखूजन्य पदार्थ / मद्य / अमली पदार्थ विकता येणार नाहीत.** ➢ **स्टॉल व्यतिरीक्त जागा व्यापू नये व रहदारी / फुटपाथवर अडथळा निर्माण करू नये.** वरिल पैकी कोणत्याही अटीचे उलंघन केल्यास संबंधित स्टॉल धारकास कोणतीही पूर्वसूचना न देता परवानगी रद्द करुन संबंधित स्टॉल धारकावर फौजदारी कार्यवाही प्रस्तावित करून स्टॉल निष्कासीत करण्यात यावा.
२१.	ज्या दिव्यांगांना स्टॉल दिला जाईल त्यांना महानगरपालिकेचा इतर योजनाचा लाभ घेता येणार नाही.
२२.	अर्जदार बेरोजगार असल्याचे हमीपत्र तसेच तहसिलदार कार्यालयाचे १ लाखापर्यंतचा उत्पन्न दाखला बंधनकारक राहील.
२३.	दुकानासमोर स्टॉल मंजूर करण्यात येऊ नये. इमारतीसमोरील खुल्या क्षेत्रात / फुटपाथ / रस्त्यावर स्टॉल मंजूर करतेवेळी गृहनिर्माण संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.
२४.	१००% अंध, मुका, बहिरा दिव्यांग व्यक्तीला स्टॉल मंजूर केल्यानंतर त्याच्या कुटूंबियांना मदतनीस करीता स्टॉलमध्ये बसण्यास परवानगी देऊन सदर परवानगीत त्या कुटूंबातील सदस्याचा फोटो स्टॉलच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहील.

ब) गटई कामगाराना स्टॉल परवानगी देणेबाबत.

१.	अर्जदार अनुसूचित जातीचा असणे आवश्यक आहे. तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक आहे.
२.	स्टॉलचे क्षेत्रफळ ६' लांबी x ४' रूंदी x ८' उंची एवढे असावे.
३.	गटई, दिव्यांग व अन्य स्टॉलमध्ये अंतर कमीत कमी ५०० मीटरचे हवाई अंतर (Areal Distance) असणे आवश्यक आहे.
४.	लाभार्थी / अर्जदार यांचा मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत रहिवासी असल्याचा तहसिलदार कार्यालयाचा स्थानिक रहिवासी दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.
५.	अर्जदाराचे वय २१ वर्षापेक्षा कमी नसावे. वडिल किंवा आई लाभार्थी असल्यास त्यांच्या मुलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यांना स्टॉल मंजूर करू नये.
६.	स्टॉल दिलेल्या परवानगीचे पत्र व भुईभाडे भरल्याची पावती प्रत लाभार्थ्यांच्या फोटोसह स्टॉलमध्ये प्रथम दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास अटीशर्तींचा भंग केल्यामुळे परवाना रद्द केला जाईल.
७.	स्टॉल कोणत्याही परिस्थितीत कुटुंबातील किंवा इतर व्यक्तीस हस्तांतरित करता येणार नाही.
८.	मा.न्यायालयाच्या आदेशा प्रमाणे नागरिकांना रहदारीसाठी फुटपाथ मोकळे ठेवण्यात यावे.
९.	स्टॉलमध्ये स्वनिर्मित केलेल्या पादत्राणांची विक्री/दुरूस्ती व्यतिरिक्त इतर व्यवसाय करता येणार नाही. कोणत्याही कंपनीचे चप्पल / शूज दुकान लावून विक्री करता येणार नाही. तसे केल्यास वा आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता परवानगी रद्द करुन स्टॉल महानगरपालिकेमार्फत ताब्यात घेण्यात येईल.
१०.	ज्या रस्त्यांवर ना अंकीत क्षेत्र (एकेरी वाहतुकीचे रस्ते अथवा नो हॉकर झोनच्या रस्त्यावर) आहे अशा रस्त्यावर नविन स्टॉलकरीता जागा देण्यात येऊ नये.
११.	रू.५००/- प्रति महीना किंवा वेळोवेळी ठरविलेल्या भाडे एवढे भुईभाडे आकारण्यात यावे. तसेच अनामत रक्कम रु.३,०००/- जमा करुन सदरचे भाडे हे वार्षिक / सहामाही भरण्यात यावे.
१२.	स्टॉल दिलेल्या परवानगीचे पत्र व भुइभाडे भरल्याची पावती प्रत लाभार्थ्यांच्या फोटोसह स्टॉलमध्ये प्रथम दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील.
१३.	१२ मी. ते ४० मी. रुंद रस्त्यावरच स्टॉलकरिता परवानगी देण्यात येईल.
१४.	➢ **ज्या व्यक्तीस परवानगी दिलेली आहे, त्या व्यक्तीनेच व्यवसाय करणे बंधनकारक राहिल.** ➢ **स्टॉल भाडयाने देणे अथवा विकणे किंवा अन्य व्यक्तीस व्यवसाय करिता देता येणार नाही.** ➢ **स्टॉल दिलेल्या जागेवरच उभारणे, अन्य ठिकाणी स्थलांतरीत करता येणार नाही.** ➢ **स्टॉल व्यतिरीक्त जागा व्यापू नये व रहदारी / फुटपाथवर अडथळा निर्माण करू नये.** वरिल पैकी कोणत्याही अटीचे उलंघन केल्यास संबंधित स्टॉल धारकास कोणतीही पूर्वसूचना न देता परवानगी रद्द करुन संबंधित स्टॉल धारकावर फौजदारी कार्यवाही प्रस्तावित करून स्टॉल निष्कासीत करण्यात यावा.
१५.	परवानगी प्रत्येक वेळी १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी राहणार नाही. मुदत संपल्यानंतर अर्जदाराची वागणूक व अटी / शर्तीच्या पालनाबाबत पडताळणी करुनच पुढील १२ महिन्याच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येईल. सदरचा कालावधी हा त्या वर्षातील ०१ एपिल ते ३१ मार्च

	पर्यंतचा ग्राहय धरण्यात यावा. नविन मुदतवाढ घेताना लाभार्थी हयात असल्याबाबत स्वयंघोषीत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
१६.	सदर परवानगी देणे / नाकारणे / रद्द करणेचे अंतिम अधिकार अतिरीक्त आयुक्त व अतिक्रमण उपआयुक्त यांच्या मंजूरीने प्रभाग अधिकारी यांना राहील.
१७.	भविष्यात विकास कामात बाधीत होणारा स्टॉल महानगरपालिकेने सुचित केलेल्या ठिकाणी स्थलांतरीत करणे स्टॉलधारकावर बंधनकारक राहिल.
१८.	मा. न्यायालयाने वेळोवेळी पारित केलेले आदेशांचे पालन करणे हे स्टॉल धारकावर बंधनकारक राहिल.
१९.	अर्जदार जरी वरील सर्व अटींची पुर्तता करीत असला तरीः रस्त्यावरील भविष्यातील रहदारी तसेच स्थानिक परिस्थीतीचा विचार करून नविन स्टॉल / विद्यमान स्टॉलचे नूतनीकरण मंजूर करावयाचे अथवा नाही हे ठरविण्याचे अधिकार महापालिका यांना राहतील.
२०.	दुकानासमोर स्टॉल मंजूर करण्यात येऊ नये. इमारतीसमोरील खुल्या क्षेत्रात / फुटपाथ / रस्त्यावर स्टॉल मंजूर करतेवेळी गृहनिर्माण संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.
२१.	अर्जदार बेरोजगार असल्याचे हमीपत्र तसेच तहसिलदार कार्यालयाचे १ लाखापर्यंतचा उत्पन्न दाखला बंधनकारक राहील.

क) दुध केंद्राकरीता जागा देणे.

अटीशर्ती :-

१.	शासन मान्यता प्राप्त सरकारी / सहकारी दुध संस्थांचा वितरक अधिकृतता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
२.	खाजगी जागेवर उभारणेकरीता जागा मालक यांचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
३.	स्टॉलचे क्षेत्रफळ ६' लांबी x ४' रूंदी x ८' उंची एवढे असावे.
४.	प्रभाग समिती क्र. ०१ ते ६ मध्ये रेडीरेकनर नुसार स्टॉलचे भाडे व जी.एस.टी. ठरवले आहे.
५.	स्टॉलकरीता जागा विद्यमान व भविष्यातील वाहतुकीचा विचार करून देणेत यावे. तसेच मा. न्यायालयाच्या आदेशा प्रमाणे नागरिकांना रहदारीसाठी फुटपाथ मोकळे ठेवण्यात यावे.
६.	दुध केंद्र, गटई, दिव्यांग व अन्य स्टॉलमध्ये अंतर कमीत कमी ५०० मीटरचे हवाई अंतर (Areal Distance) असणे आवश्यक आहे.
७.	लाभार्थी / अर्जदार यांचा मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत रहिवासी असल्याचा तहसिलदार कार्यालयाचा स्थानिक रहिवासी दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.
८.	अर्जदाराचे वय २१ वर्षापेक्षा कमी नसावे.
९.	स्टॉलमध्ये दुध व दुग्धजन्य पदार्थ याच्या व्यतिरिक्त इतर व्यवसाय करता येणार नाही, इतर व्यवसाय करताना आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता परवानगी रद्द करुन स्टॉल महानगरपालिकेमार्फत ताब्यात घेण्यात येईल.
१०.	स्टॉल एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला दिला जाईल. तसेच कोणत्याही परिस्थितीत कुटुंबातील किंवा इतर व्यक्तीस हस्तांतरित करता येणार नाही.

११.	स्टॉल दिलेल्या परवानगीचे पत्र लाभार्थ्यांच्या फोटोसह स्टॉलमध्ये प्रथम दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहिल.
१२.	१२ मी. ते ४० मी. रुंद रस्त्यावरच दुध केंद्र / स्टॉलकरिता परवानगी देण्यात येईल.
१३.	➢ **ज्या व्यक्तीस परवानगी दिलेली आहे, त्या व्यक्तीनेच व्यवसाय करणे बंधनकारक आहे.** ➢ **स्टॉल भाडयाने देणे, विकणे किंवा अन्य व्यक्तीस व्यवसाय करिता देता येणार नाही.** ➢ **स्टॉल दिलेल्या जागेवरच उभारणे, अन्य ठिकाणी स्थलांतरीत करता येणार नाही.** ➢ **स्टॉलमध्ये तंबाखूजन्य पदार्थ / मद्य / अमली पदार्थ विकता येणार नाहीत.** वरिल पैकी कोणत्याही अटीचे उलंघन केल्यास संबंधित स्टॉल धारकास कोणतीही पूर्वसूचना न देता परवानगी रद्द करुन संबंधित स्टॉल धारकावर फौजदारी कार्यवाही प्रस्तावित करून स्टॉल निष्कासीत करण्यात यावा.
१४.	परवानगी प्रत्येक वेळी १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी राहणार नाही. मुदत संपल्यानंतर अर्जदाराची वागणूक व अटी / शर्तीच्या पालनाबाबत पडताळणी करुनच पुढील १२ महिन्याच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येईल. सदरचा कालावधी हा त्या वर्षातील ०१ एपिल ते ३१ मार्च पर्यंत चा ग्राहय धरण्यात यावा. नविन मुदतवाढ घेताना लाभार्थी हयात असल्याबाबत स्वयंघोषीत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
१५.	४० मी. व त्यापेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांवर स्टॉलला परवानगी देण्यात येणार नाही.
१६.	सदर परवानगी देणे / नाकारणे / रद्द करणेचे अंतिम अधिकार अतिरीक्त आयुक्त व अतिक्रमण उपआयुक्त यांच्या मंजूरीने प्रभाग अधिकारी यांना राहील.
१७.	भविष्यात विकास कामात बाधीत होणारा स्टॉल महानगरपालिकेने सुचित केलेल्या ठिकाणी स्थलांतरीत करणे स्टॉलधारकावर बंधनकारक राहिल.
१८.	मा. न्यायालयाने वेळोवेळी पारित केलेले आदेशांचे पालन करणे हे स्टॉल धारकावर बंधनकारक राहिल.
१९.	अर्जदार जरी वरील सर्व अटींची पुर्तता करीत असला तरी रस्त्यावरील भविष्यातील रहदारी तसेच स्थानिक परिस्थीतीचा विचार करून नविन स्टॉल / विद्यमान स्टॉलचे नूतनीकरण मंजूर करावयाचे अथवा नाही हे ठरविण्याचे अधिकार महापालिका यांना राहतील.
२०.	दुकानासमोर दुध केंद्र मंजूर करण्यात येऊ नये. इमारतीसमोरील खुल्या क्षेत्रात / फुटपाथ / रस्त्यावर दुध केंद्र मंजूर करतेवेळी गृहनिर्माण संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.
२१.	अर्जदार बेरोजगार असल्याचे हमीपत्र तसेच तहसिलदार कार्यालयाचे १ लाखापर्यंतचा उत्पन्न दाखला बंधनकारक राहील.

यापूर्वी दिलेले सर्व बुथ (दिव्यांग, गटई कामगार, दुध केंद्र इ.) परवाने यांच्या कागदपत्रांची पडताळणी प्रभाग अधिकारी, मिळकत विभाग यांच्यामार्फत करण्यात यावी. स्टॉल / केंद्र / बुथ यामध्ये नियमबाह्य कामकाज/कागदपत्रे इत्यादी निदर्शनास आल्यास स्टॉल / केंद्र / बुथ परवाना रद्द करण्यात यावा.

इतर अटीशर्ती :-

१) दिव्यांग स्टॉलधारकाचे परवाना करीता अर्ज जास्त असतील तर लॉटरी पध्दतीने परवाना दिला जाईल व उर्वरीत स्टॉल अर्जदारांना प्रतिक्षा यादीत ठेवले जाईल.

२) स्टॉलसंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास स्टॉल परवाना रद्द करण्यास माझी हरकत नाही, असे शपथ देणे बंधनकारक राहील.

३) ज्या व्यक्तिला स्टॉल दिला आहे त्या व्यतिरीक्त ज्याला पर्यायी वेळी बसवायचे असेल त्याचासुद्धा फोटो लावणे आवश्यक आहे. त्याव्यतिरीक्त व्यक्ती आढळल्यास परवाना भाड्याने दिला आहे, असे समजून तो रद्द करण्यात येईल.

४) सद्यस्थितीत दिव्यागांना परवाना देणेसाठी टेलिफोन बुथचा हा व्यवसाय कालबाहय झाला असल्याने टेलिफोन बुथ व तत्सम या व्यवसाय व्यतिरीक्त जनरल सामानाची विक्री, किरकोळ सामान विक्री, भाजीपाला, फळे व दैनदिन लागणाऱ्या वस्तूंची विक्री, घरघंटी, झेरॉक्स मशिन, ई-बुकींग/रेल्वे रिझर्वेशन, भाजी, फळे, फुले, डेअरी उत्पादन, रोजवापरासाठी लागणा: या वस्तु, वर्तमानपत्र, मासिके व वेळोवेळी मा. दिव्यांग कल्याण समितीने सुचविलेले व्यवसाय इ. स्टॉल धारकास स्टॉल मध्ये ठेवता येतील.

५) बी.पी.रोड, नवघर रोड, फाटक ते केबिन रोड ते जेसल पार्क सबवे पर्यंत, ६० फुट रोड भाईंदर (प.), भाईंदर (प.) स्टेशन रोड ते सेंकडरी शाळा, कमला पार्क ते पोलिस स्टेशन, अमृतवाणी सत्संग मार्ग, मिरा रोड रेल्व स्टेशन ते रसाज, वर्सोवा ब्रिज ते वेस्टर्न हॉटेल या ठिकाणी कोणत्याही स्टॉलला परवानगी देण्यात येऊ नये.

६) धार्मिक स्थळ, शाळा, सार्वजनिक ठिकाणे, पोलिस स्टेशन,इस्पितळे या ठिकाणाहुन १५० मी अतंरापर्यंत स्टॉल परवाने देण्यात येऊ नये.

७) एका जागेसाठी दोन दिव्यांग व्यक्तींनी अर्ज केलेला असल्यास त्यांच्या अपंगत्वाची टक्केवारी व त्याचे शहरातील वास्तव्य किती वर्षाचे आहे, याबाबत त्यांनी सादर केलेली कागदपत्रे तपासून यावर त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

८) स्टॉलधारकाने स्टॉल परवाना घेताना शहरातील स्वत:ची स्थावर मालमत्ता असलेल्या व्यक्तीचे हमीपत्र दयावे.

९) स्टॉल परवान्यातील अटीशर्तींचे पालन करण्याबाबत व अटीशर्तींचा भंग झाल्यास परवाना रद्द केल्यास माझी हरकत राहणार नाही, असे रू.१००/- च्या स्टॅम्प पेपरवरील लेखी हमीपत्र अर्जदाराकडून घेण्यात यावे.

१०) सर्व स्टॉल हे महापालिकेने निश्चित केलेल्या डिझाईननुसार उभारणे बंधनकारक राहील.

समितीने तयार केलेल्या धोरणामधील सर्व अटी व शर्ती मान्य करून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पात्र दिव्यांग व्यक्तींना, गटई कामगारांना, शासन मान्यताप्राप्त सरकारी/सहकारी दुध संस्थांचा वितरक यांना स्वयंरोजगारासाठी स्टॉल परवाना देण्यास तत्त्वत: मान्यता देण्यात येत आहे.

तसेच, संबंधित व्यक्तींकडून विहित कागदपत्रे प्राप्त करून, जागेची उपलब्धता, वाहतूक व सार्वजनिक हित लक्षात घेऊन, समितीच्या शिफारशीनुसार व प्रचलित शासन नियम, न्यायालयीन निर्देश आणि महानगरपालिकेच्या लागू अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी.

यापुढे शासन अथवा न्यायालयाच्या निर्देशांनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार महापालिकेस राहतील.

तरी यापुर्वी मालमत्ता / मैदाने भाड्याने देण्याबाबत असलेले सर्व आदेश व सक्षम प्राधिकरणाचे निर्णय / ठराव रद्द करुन मा. महासभेने नियुक्त केलेल्या समितीच्या दि.१४/०७/२०२६ रोजीच्या बैठकीत समितीने सादर केलेल्या सदर धोरणास मा. महासभेची मान्यता देणेस गठीत समितीची शिफारस आहे.

Mehta

डिंपल मेहता
महापौर तथा अध्यक्ष, गठीत समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २३/०८/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक.(६१) मिरा भाईदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय 6 व्या मजल्यावर विशेष समित्या बैठका सभागृह, कँटीन इत्यादी तयार करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीत कार्यालयीन कामकाजास जागा अपूरी पडत असल्याने पाचवा मजला बांधण्यात आला असून त्या ठिकाणी कार्यालये तयार करण्यात येत आहेत. मा. महासभा तसेच विविध बैठकांच्या वेळी सदस्यांना जेवणासाठी जागा नसल्याने इतर कार्यालयात व अडचणीच्या जागेत जेवण घ्यावे लागते. महानगरपालिका मुख्य कार्यालयात सहाव्या मजल्यावर एका बाजूस शेड बांधून त्यामध्ये जेवणासाठी व्यवस्था होउ शकते व इतर वेळेस शेडचा उपयोग कॅटीनसाठी होईल. त्याचप्रमाणे विशेष समित्या बैठकासाठी सभागृह देखिल सदर ठिक्ाणी करता येणार आहे. सदर कामासाठी रु.3,45,00,000/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC-6/2026-27/DK/MG-1

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. २३/०८/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्र. (६२) राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वेस्टर्न हॉटेल येथील नविन उड्डाणपुलाखालील भुयारी मार्ग येथे नविन वाहतुक सिग्नल यंत्रणा बसविणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वेस्टर्न हॉटेल येथे नविन उड्डाणपुल तयार करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी मुंबई ते पालघर व ठाणेच्या दिशेन मोठया प्रमाणात वाहनांचा वापर होत असतो. सदर ठिकाणी उड्डाणपुलाअंतर्गत घोडबंदर गाव व जे.पी रोड येथुन देखील मोठया प्रमाणात राष्ट्रीय महामार्गावर वाहनांचा प्रवेश होत असतात. त्यामुळे सदर ठिकाणी एकुण 4 दिशेने येणा-या वाहनांच्या सुरळीत वाहतुकीसाठी सिग्नल यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. तरी सदर ठिकाणी वाहतुक पोलीस विभागाने तात्काळ सिग्नल बसविण्याची मागणी केली आहे सदर कामासाठी खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

कामाचा खर्च :

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित खर्च
1)	राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वेस्टर्न हॉटेल येथील नविन उड्डाणपुलाखालील भुयारी मार्ग येथे नविन वाहतुक सिग्नल यंत्रणा बसविणे.	रु.35,53,662/-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन 2026-27 या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये सिग्नल यंत्रणा विद्युत कामे या लेखाशिर्षातुन सदर काम करावयाचे आहे. तरी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

दिपक खांबित
प्र. शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

मा. महासभा सभा दि. १३/०८/२०२६

//गोषवारा//

प्रकरण क्र. ६३ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झाडांची छाटणी करणेकरीता ०४ Mac lifton (हायड्रोलिक शिडी) वाहन भाडेत्वावर वाहन, वाहनचालक, ऑपरेटर व इंधनासहीत ०५ वर्ष कालावधीकरिता घेणेकरिता आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्याच्या आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने दि.१४/०७/२०२६ रोजी मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात करण्यात आली होती सदर बैठकीस मा.आयुक्त, मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये रस्त्यावरील झाडांची छाटणी करण्याकरिता नविन हायड्रोलिक शिडी वाहन खरेदी केल्यास सदर वाहनाकरिता वाहनचालक, ऑपरेटर, इंधन, पार्किंग, वेळोवेळी सर्व्हिसिंग व दुरुस्ती करणे (Maintenance) इत्यादी अतिरिक्त खर्च असल्याने तसेच वाहन वेळेत दुरुस्ती होत नसल्याने झाडे छाटणीच्या कामात अडथळा निर्माण होत असल्याने जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे विविध उंचीच्या ०४ Mac lifton हायड्रोलिक शिडी वाहने भाडेतत्वावर ०५ वर्ष कालावधीकरिता पुरवठा करणेबाबत तसेच सदर वाहनांचा उपयोग उद्यान विभागासह अग्निशमन विभागासही होणार आहे त्यामुळे सदरचा खर्च अग्निशमन विभागा अंतर्गत तरतुदीमधून करण्याचे निर्देश मा.महापौर यांनी देलेले आहेत.

त्याकरिता विविध उंचीच्या (१८ मी.,२०मी.,२४मी.) अतिरिक्त ०४ Mac lifton (हायड्रोलिक शिडी) वाहने, वाहनचालक, ऑपरेटर व इंधनासहीत भाड्याने घेणे आवश्यक आहे. तथापि सदरबाबत Mac lifton (हायड्रोलिक शिडी) वाहन भाडेत्वावर वाहन, वाहनचालक, ऑपरेटर व इंधनासहीतचे दर जिल्हा दरसूची (DSR) मध्ये उपलब्ध नसल्याने खुल्या बाजारभावातील दरपत्रके मागवून Rate Analysis करून अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे, त्यासाठी वेळ लागणार असल्याने सदरबाबत अपेक्षित खर्च अद्याप सांगता येणे शक्य नाही.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झाडांची छाटणी करणेकरीता ०४ Mac lifton (हायड्रोलिक शिडी) वाहने भाडेत्वावर वाहन, वाहनचालक, ऑपरेटर व इंधनासहीत ०५ वर्ष कालावधीकरिता घेणेकरिता धोरणात्मक निर्णय होऊन ई-टेंडरिंग पद्धतीने निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकरिता नगरसचिव यांच्याकडे गोषवारा सादर करण्यास मा.आयुक्त यांनी दि.२२/०७/२०२६ रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झाडांची छाटणी करणेकरीता ०४ Mac lifton (हायड्रोलिक शिडी) वाहने भाडेत्वावर वाहन, वाहनचालक, ऑपरेटर व इंधनासहीत ०५ वर्ष कालावधीकरिता घेणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२(ब) अन्वये दायित्व स्विकारण्यास तसेच धोरणात्मक निर्णय होऊन अंदाजपत्रक तयार करून ई-टेंडरिंग पद्धतीने निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस असे.

(कविता बोरकर)
उप.आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ९३ / ०८ /२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक (६४) :- मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्पातील शिल्लक इनर्ट उचलणेकामी Tipper ७.५ MT व Loader १.०० Cum. Bucket Capacity चा पुरवठा करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबत... E-६४२१७८

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्पातील शिल्लक इनर्ट उचलणेकामी Tipper ७.५ MT व Loader १.०० Cum. Bucket Capacity चा पुरवठा करणे कामी जा.क्र.मनपा/घप्रवि/०२/२०२४-२५ दि.०१/०२/२०२५ अन्वये मे. श्री साई गणेश कंन्स्ट्रक्शन यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. सदर कामाची जानेवारी २०२६ पासुन मुदत संपलेली असुन नविन निविदा मागवुन कार्यादेश देईपर्यंत कंत्राटदाराकडुन काम करुन घेण्यात येत आहे.

सदर कामासाठी अंदाजे रू.७१,७०,२९४/- वार्षिक खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सदर कामासाठी निविदा मागवून दर निश्चित करावयाचे आहेत. सदर कामी होणारा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या "इनर्ट उचलणे/ कचरा सपाटीकरण/ लॅण्ड फिल्ड" या लेखाशीर्षातून करण्यात येणार आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्पातील शिल्लक इनर्ट उचलणेकामी Tipper ७.५ MT व Loader १.०० Cum. Bucket Capacity चा पुरवठा करणे कामाची नव्याने निविदा मागविणेसाठी होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच नविन निविदा मागवुन कार्यादेश देईपर्यंत होणाऱ्या रु. ३६,००,०००/- वाढीव खर्चासह रु.१,०७,७०,२९४/- सुधारीत खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(दिपक खाबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

अग्निशमन विभाग

मा. महासभा दि. ९३ / ०८ / २०२६

(गोषवारा)

प्रकरण क्र. ६५ :- महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) जिल्हा नियोजन समिती योजने अंतर्गत मिरा- भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास अत्याधुनिक अग्निशमन वाहने व उपकरणे खरेदी करणेबाबतचा गोषवारा मा. महासभेच्या आर्थिक व प्रशासकीय मंजुरीकामी सादर करणेबाबत.

(रु. ३५,९६,९६,००० /-)

महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) योजनेतून खर्च अनुज्ञेय असलेल्या बाबींची व्याप्ती वाढविण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करणेच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समिति, ठाणे यांनी स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडून आवश्यक उपकरणे/ साहित्य, संख्या, अंदाजित रक्कम, तांत्रिक तपशील इ . माहिती दि. 02/06/2026 रोजीच्या पत्रान्वये अपेक्षिलेली होती. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, उंच व अतिउंच इमारती, दाट व अरुंद लोकवस्ती, विविध उद्योग-व्यवसाय तसेच वाढत्या अग्निशमन, अपघात व आपत्कालीन घटनांचा विचार करता नागरिकांना तात्काळ, सुरक्षित व प्रभावी अग्निशमन व बचाव सेवा उपलब्ध करून देणे, अग्निशमन विभागाची वाहन व उपकरण क्षमता अद्ययावत व सक्षम करणे इ. बाबी लक्षात घेऊन जिल्हा नियोजन समिति, ठाणे यांना अग्निशमन विभागाच्या आवश्यकतेनुसार उपकणे / साहित्य त्याची संख्या व अंदाजित खर्चाचा तपशीलवार प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेस सदर उपकरणे खरेदीकरिता **महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर)** योजनेतून निधी उपलब्ध होणार आहे.

सद्यस्थितीत अग्निशमन विभागाची ०६ अग्निशमन केंद्रे व ०१ मुख्य अग्निशमन कार्यालय अशी एकूण ०७ केंद्रे कार्यरत असून ०१ नवीन अग्निशमन केंद्र प्रस्तावित आहे. विभागाकडे विविध ०८ प्रकारची एकूण ५६ वाहने उपलब्ध आहेत. तथापि, शहराचा वाढता विस्तार व आपत्कालीन घटनांचे बदलते स्वरूप लक्षात घेता जलद प्रतिसाद, मोठ्या आगींसाठी पुरेसा पाणीपुरवठा, अरुंद भागात सहज प्रवेश, विशेष बचावकार्य तसेच अग्निशमन जवानांची सुरक्षितता यासाठी अत्याधुनिक अग्निशमन वाहने व उपकरणांची आवश्यकता आहे तसेच महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये आग लागण्याचे प्रमाण जास्त असल्याने अतिरिक्त अग्निशमन वाहनांची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. १२/०३/२०२६ रोजीच्या परिपत्रक क्र. अशसे-२०२६/ प्र.क्र. २५/ नवि-०४ अन्वये High Rise Fire Fighting Vehicles (HRFFV) यंत्रणा खरेदी करणेबाबत देखील कळविले आहे .

त्याअनुषंगाने, घटनास्थळी तात्काळ पोहोचून कमी पाण्यात प्रभावी अग्निशमन कार्यवाहीसाठी **Rapid Response Vehicle with High Pressure Multimode Foam System**, मोठ्या आगींसाठी आवश्यक पाणीसाठा व पाणीपुरवठ्यासाठी **Fire Water Tender**, दाट व अरुंद लोकवस्तीमध्ये कार्यवाहीसाठी **Mini Water Tender व Multipurpose Mini Water Tender**, रस्ता अपघात, इमारत दुर्घटना व इतर आपत्कालीन बचावकार्यासाठी **Rescue Tender**, तातडीच्या प्रतिसादासाठी **Rapid Intervention Vehicle (RIV)** तसेच जवानांच्या सुरक्षिततेसाठी **Fire Fighter Helmet व Breathing Apparatus Set**, पूर व जलदुर्घटनांतील बचावकार्यासाठी **Inflatable Rubber Boat, Floating Pump व Robotic Water Rescue Craft**, विविध बचावकार्यासाठी **Chain Saw, Metal/Bolt/Concrete Cutter, Pumps, Fire Hose व BA Compressor Set** इत्यादी आवश्यक उपकरणे जिल्हा वार्षीक योजना निधीतुन खरेदी करणे प्रस्तावित आहे.

सदर वाहने व उपकरणे अग्निशमन विभागाकडे उपलब्ध नाहीत त्याकरिता सदरचे वाहने व उपकरणे महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीतुन खरेदी करणेकरिता वाहनांचा व उपकरणांचा तांत्रिक तपशील (Technical Specification) **मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, सांताक्रुझ, मुंबई** यांना पाठविलेनुसार दि. ०१/०७/२०२६ रोजी तांत्रिक मंजुरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त अग्निशमन वाहने व उपकरणे यांचे दरनिश्चती करणेकरिता ऑनलाईन जाहिरात प्रसिद्ध करून दरपत्रके मागविण्यात आली असुन रक्कम रु. ३५,९६,९६,००० /- एवढ्या रक्कमेचे न्यूनतम दर प्राप्त झालेले आहेत. सदर दरास तांत्रिक मंजुरी घेऊन सदरचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती यांचेकडे दाखल करण्यात येणार आहे.

तरी प्रस्तावामध्ये नमूद करण्यात आलेली अग्निशमन वाहने व उपकरणे महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) योजनेतुन प्राप्त होणाऱ्या निधीतून खरेदी करणेचा प्रस्ताव मा. जिल्हा नियोजन समिती यांचेकडे सादर करणेकरिता रक्कम रु. **३५,९६,९६,०००/-** इतक्या होणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस गोषवारा सविनय सादर.

(डॉ. सचिन बांगर)
उप – आयुक्त (मुख्यालय)
अग्निशमन विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
सोबत प्राप्त दि.०४/०८/२०२६ वेळ सं.४.००वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. ४९ वर्ष २०२६-२७

Dare
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २३/०८/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक.(६६) महीला भवन बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे गोडेदव स.क्र.(30) 327/1,2,4 ते 9, 11 अ,12,16,17,19,22 व 25, (29), 328/1 ब, 2,3,4, (28) 329/1,2,3,4,5,6,7,10,11 37/ 330/7, (27) 331/4 ब, (23) 339/2 अ, (22) 340/1अ, 2 ब, 2 क, 3 ब, 4, 5 ब, 6,7,8,9 अ ते 9 ड, 9 फ, 10,11,12 या रेखांकनातील 1127.00 चौ. मीटर नागरी सुविधा क्षेत्र (Aminity Open Space) जागा उपलब्ध आहे. सदर जागेमधील 1127.00 चौ. मीटर जागा सातबारा उता-यासह महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सदर जागेचा सातबारा उतारा महानगरपालिकेच्या नावे होण्यापुर्वी सदर जागेवर विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात महानगरपालिका कर्मचारी निवास्थाने बांधण्यासाठी दि.20/10/2010 रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली होती. तथापी प्लीन्थ व्यतिरिक्त इतर काम झालेले नाही. तद्नंतर झालेल्या निर्णयानूसार सदर जागेवर कर्मचारी निवास्थाना ऐवजी महीला बालकल्याण भवन बांधण्याचे नकाशे मंजूर करण्यात आले. सदर काम हे विकासकाने विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात काम करण्यास स्वारस्य नसल्याचे कळविलेले आहे. मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सदर जागेवर महानगरपालिकेच्या निधीतून अर्थसंकल्पात केलेल्या तरतूदीनूसार महीला भवन बांधण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर इमारत बांधणेसाठी 29.25 कोटी एवढा खर्च अपेक्षित असून सदर कामासाठी सन 2026-27 या वर्षाच्या अर्थसंकल्पात "महिला भवन बांधणे" या लेखाशिर्षाअंतर्गत रु.10.00 कोटी एवढी तरतूद केलेली आहे. सदर तरतूद ही 2026-27 या वर्षासाठी पुरेशी असून 2027-28 या वर्षात सदर कामासाठी तरतूद करावी लागणार आहे. प्रस्ताव समिती ने सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवणेस दि.04/08/2026 रोजी मान्यता दिलेली आहे. तरी सदर कामाच्या रु.29.25 कोटी खर्चाच प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

PC-6/2026-27/DK/MG-2

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २३/०८/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्र. ६७) :- मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात "ए.आर." (Accomodation Reservation) धोरणांतर्गत विविध आरक्षित भुखंडाचा विकास करण्यासंबंधीचे धोरण निश्चित करणे.

मिरा भाईंदर शहराची मुळ विकास योजना भागशः दि. 14/05/1997 च्या शासन अधिसुचने अन्वये मंजूर करण्यात आल्यानंतर ती दि. 15/07/1997 पासून अंमलात आली होती व उर्वरित भागशः क्षेत्राची विकास योजना दि.25/08/2000 च्या शासन अधिसुचने अन्वये मंजूर होऊन ती दि. 15/10/2000 पासून अंमलात आली होती.

उपरोक्त मुळ मंजुर विकास योजना सुधारीत करण्याच्या अनुषंगाने नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना ठाणे शाखा कार्यालय यांनी वैधानिक कार्यवाही करुन ती महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 30 अन्वये ती शासनास मंजुरीसाठी दि.25/10/2023 रोजी सादर केली असता शासन नगर विकास विभागाने सदरची सुधारीत प्रारूप विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम 31 (1) अन्वये सारभुत स्वरुपाचे बदल (EP) वगळून दि. 16/04/2026 च्या अधिसुचनेव्दारे मंजूर केली असुन वगळलेल्या भागाची (सारभूत स्वरुपाची/EP) विकास योजना नागरीकांच्या सुचना हरकतीसाठी उपरोक्त समक्रमाकांचे सुचनेव्दारे प्रसिद्ध केली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेसह संपूर्ण राज्याकरीता (राजपत्रातील नमुद भाग वगळून) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) ही दि. 02/12/2020 पासुन लागू करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर शहराच्या सुधारित मंजुर विकास योजनेमध्ये विविध स्वरुपाची (बांधिव/खुले) आरक्षणे प्रस्तावीत करण्यात आली असुन विकास योजना अहवालानुसार बहुतांश प्रस्तावित आरक्षणाखालील बहुतांश जागा या खाजगी मालकीच्या असुन बहुतांश आरक्षणाचे समुचित प्राधिकरण "मिरा भाईंदर महानगरपालिका" ही आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगरचना अधिनियम 1966 चे कलम 126 अन्वये आरक्षणाखालील जागा परस्पर वाटाघाटीने, विकास हक्क् प्रमाणपत्राद्वारे व भुसंपादन अधिनियम 2013 नुसार संपादन करता येऊ शकतात तसेच UDCPR नियमावलीमधील विनियम क्र. 11.1 मधील टेबल क्र. 11-अ नुसार मंजुर विकास योजनेमधील विविध बांधिव / खुल्या स्वरुपाची आरक्षणे समावेशक आरक्षणच्या माध्यमातुन (Accomodation Reservation Principle) विकसीत करणेबाबत तरतुद असून सदर तरतुदीनुसार उपरोक्त आरक्षणे संबंधित समुचित प्राधिकरण किंवा आरक्षणाखालील जागेचे जागामालक किंवा आरक्षणाखालील जागेचे जागामालक / विकासक यांना उपरोक्त समावेशक आरक्षणाच्या तरतुदीनुसार आरक्षणाचे विकसन करण्याचा पर्याय आहे तसेच उक्त अधिनियमाचे कलम 126 अन्वये आरक्षणाच मोबदला घेणेबाबत जमिनमालक यांची ऐच्छिक बाब आहे.

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियामावलीमधील (UDCPR) विनियम क्र. 11.1 नुसार सुधारित मंजुर विकास योजनेमधील आरक्षणे समावेशक आरक्षणाच्या तरतुदीद्वारे विकसित

करणेकामी मंजुरी देण्याचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका यांना असून ज्या कारणासाठी विकास योजनेमध्ये आरक्षणे प्रस्तावीत आहेत अश्या स्वरुपाच्या आरक्षणाचे विकसन हे त्याच कारणासाठी उपरोक्त तरतुदीनुसार विकसीत करण्यासाठी परवानगी देण्याची कार्यवाही करण्यात येते तसेच सुधारीत मंजूर विकास योजनेमधील व वगळलेल्या भागाच्या विकास योजनेमधील सदर विकास योजना मंजूरीअंती त्यामध्ये प्रस्तावीत असणारे "Municipal Purpose" या आरक्षणांतर्गत महानगरपालिकेस आवश्यक असणाऱ्या सार्वजनिक सुविधांच्या (क्रिडांगण, बगीचा, इतर बांधीव सुविधा इ.) अनुषंगाने सदर आरक्षणाचा विकास करता येऊ शकतो.

सबब मिरा भाईंदर शहराच्या मंजुर सुधारीत विकास योजनेमधील प्रस्तावित आरक्षणे त्याच वापरासाठी / कारणासाठी विकसीत करण्याच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करण्यात येते तसेच "Municipal Purpose" या आरक्षणामध्ये महानगरपालिकेस आवश्यकतेनुसार लागणाऱ्या सार्वजनिक सुविधेच्या अनुषंगाने सदर आरक्षणाचा विकास करण्यात येईल.

(मा.आयुक्त सो.यांच्या मान्यतेने.)

(पु. म. शिंदे)
सहायक संचालक, नगररचना
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. ०६/०८/२०२६ वेळ दु. ३.३०वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. ५१ वर्ष २०२६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. 23/07/2026

// गोषवारा //

प्रकरण क्र. ६८) :- **मिरा भाईंदर शहरामधील ज्या गृहनिर्माण संकुलनामधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) बंद आहेत किंवा सदर प्रकल्प महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले आहेत अशा गृहसंकुलामधील इमारतीचे पुर्नविकास करतेवेळी शुल्क वसुल करणेचे धोरण निश्चित करणेबाबत.**

मिरा भाईंदर शहराची मुळ विकास योजना भागशः दि. 14/05/1997 च्या शासन अधिसुचने अन्वये मंजूर करण्यात आल्यानंतर ती दि. 15/07/1997 पासून अंमलात आली होती व उर्वरित भागशः क्षेत्राची विकास योजना दि.25/08/2000 च्या शासन अधिसुचने अन्वये मंजूर होऊन ती दि. 15/10/2000 पासून अंमलात आली होती.

उपरोक्त मुळ मंजुर विकास योजना सुधारीत करण्याच्या अनुषंगाने नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना ठाणे शाखा कार्यालय यांनी वैधानिक कार्यवाही करुन ती महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 30 अन्वये ती शासनास मंजुरीसाठी दि.25/10/2023 रोजी सादर केली असता शासन नगर विकास विभागाने सदरची सुधारीत प्रारूप विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम 31 (1) अन्वये सारभुत स्वरुपाचे बदल (EP) वगळून दि. 16/04/2026 च्या अधिसुचनेव्दारे मंजूर केली असुन वगळलेल्या भागाची (सारभूत स्वरुपाची/EP) विकास योजना नागरीकांच्या सुचना / हरकतीसाठी उपरोक्त समक्रमाकांचे सुचनेव्दारे प्रसिद्ध केली आहे.

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू होण्यापुर्वी शासनाच्या पर्यावरण विभागाकडील दि.14/09/2006 च्या शासन अधिसुचनेनुसार 20000.00 चौ.मी. व त्यापेक्षा जास्त बांधकाम क्षेत्र असणाऱ्या प्रकल्पामध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) उभारणे बंधनकारक असल्याने त्यानुसार महानगरपालिकेकडुन 20000.00 चौ.मी. व त्यापेक्षा जास्त बांधकाम क्षेत्राचे प्रकल्पासाठी पर्यावरण विभागाकडील नाहरकत व जागेवर सांडपाणी प्रकल्प उभारलेबाबत तपासणीअंती नगररचना विभागाकडुन भोगवटा प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येत होती / आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीमध्ये महानगरपालिका क्षेत्रातील काही गृहनिर्माण संकुलनामधील सांडपाणी प्रक्रीया प्रकल्प (STP) हे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाले आहेत तर प्रकल्प हे सदयस्थितीत कार्यान्वीत नाहीत.

शासनाने राज्यातील सर्व महानगरपालिका, विशेष नियोजन प्राधिकरण व इतर प्राधिकरणासाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) ही दि.02/12/2020 पासून लागु झाली असुन सदर नियमावलीनुसार समुह गृहनिर्माण योजना अंतर्गत (Group Housing Scheme) तसेच इतर प्रकल्पामध्ये Gray Water Recycling and Reuse प्रकिया प्रकल्प राबविणे बंधनकारक असुन इमारतीस भोगवटा दिल्यानंतर सदर प्रकल्प कार्यान्वित नसल्यास किंवा त्यामध्ये काही उल्लंघन असल्यास दंडात्मक कार्यवाही करणेची तरतुद आहे.

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) अंमलात येण्यापुर्वी तत्कालीन नियमावलीनुसार मंजुर असलेले 20000.00 चौ.मी. व त्यापेक्षा जास्त बांधकाम क्षेत्र असलेले बहुतांश प्रकल्प हे 1.0 ते 1.65 चटई क्षेत्र निर्देशांकानुसारच्या अनुज्ञेय होणाऱ्या बांधकाम क्षेत्राच्या अनुषंगाने असुन सदर प्रकल्पामधील इमारतीचे आता पुर्नविकास करतांना एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नुसार पुर्वमंजुरीपेक्षा जास्त चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होवुन त्यानुसारच्या बांधकामानुसार प्रकल्पामधील सदनिकांच्या संख्यमध्ये व पर्यायाने लोकसंख्येमध्ये देखील वाढ होऊन सदर वाढीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या क्षेत्रामधील मलनिस्सा:रण वाहिण्या तसेच सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या योजनेवर ताण येवु शकतो तसेच वाढीव सदनिकांच्या अनुषंगाने मलनिस्सारण वाहिण्या व सांडपाणी प्रक्रीया प्रकल्पाची क्षमता वाढविणे आवश्यक राहील.

सबब एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) लागु होण्यापुर्वीच्या 20000.00 चौ.मी. व त्यापेक्षा जास्तीच्या बांधकाम क्षेत्राच्या गृहनिर्माण संकुलनामधील जे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) बंद आहेत किंवा ते कार्यान्वीत नाहीत अशा तसेच जे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाले आहेत अशा गृहसंकुलनामधील इमारतीचे पुर्नविकासाच्या अनुषंगाने भोगवटा दाखला देतांना अशा इमारतीचे विकासक यांचेकडुन शुल्क आकारणी करणेबाबत धोरण निश्चित करुन इमारतीस भोगवटा देताना सदर शुल्काचा भरणा हा महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व मलनिस्सारण विभागाकडे करुन त्याबाबतचे नाहरकत घेणेबाबत मा.महासभेमध्ये निर्णय होणे उचित राहील.

(मा.आयुक्त सो.यांच्या मान्यतेने.)

(पु. म. शिंदे)
सहायक संचालक, नगररचना
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. ०६/०८/२०२६ वेळ दु. ३.३०वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. ५३ वर्ष २०२६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.१३/ ८ /२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्र. :- 02

विषय : मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकारीता आवश्यक औषध फवारणीकरीता भाडेतत्वावर 40 मिनी टेम्पो (जेट स्प्रे, वाहनचालक, पेट्रोल,डिझल, 1000 लीटर पाण्याची टाकी, गन, 100 मीटर पाईप, साहित्य व देखभाल दुरुस्तीसह) पुरवठा करणे कामाची पाच वर्षाकरीता निविदा मागविणेकरिता आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे अंदाजित ७९ चौ.किमी इतके विस्तृत आहे. महानगरपालिका क्षेत्राच्या तिन्ही बाजूने खाडी/समुद्र परिसर आहे. शहरात नागरी औद्योगिक वाहासातीतीतून सांडपाण्याचा निचरा, पक्के नाले व गटारातून खाडी समुद्र परिसरात होत असतो खाडी/समुद्रात सांडपाण्याचा निचरा होत असलेल्या ठिकाणी खाडीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात कांदळवणे आहेत. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा संथ गतीने होत असतो. शहरात मोकळ्या जागेत (ओपन प्लॉट) पावसाळ्या दरम्यान मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी जमा होऊन डबकी निर्माण होत असतात. त्याचप्रमाणे एकात्मिक नाले बांधणी अंतर्गत शहरामधील कच्चे नाले, पक्क्या नाल्याच्या स्वरूपात बांधणीकामी भुयारी गटार योजना, बांधकामे इत्यादी सुरू असल्याने ठीक ठिकाणी गटार, नाल्यातील सांडपाण्याचा प्रवाह अडवून कामे पूर्ण करण्यात येतात.

एकंदर शहराची भौगोलिक रचना पाहता तसेच शहरातील परिसर व परिस्थितीमुळे मोठ्याप्रमाणावर डासांची उत्पत्ती होऊन डासांचा प्रादुर्भाव होत असतो. सदरचा डासांचा प्रादुर्भाव रोखणे व नियंत्रण करणेकामी शहरात डासनाशकांची व अळीनाशकांची मोठ्या प्रमाणावर फवारणी करणे आवश्यक असते.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकरिता एकात्मिक डास निर्मूलन योजनेअंतर्गत क्षेत्रात किटकजन्य आजारावर नियंत्रण करण्यासाठी आवश्यकऔषध फवारणी करिता भाडे तत्वावर (५ वर्ष) कालावधी करिता १० मिनी टेम्पो, जेट स्प्रे मशिन, वाहन चालक, पेट्रोल, डिझेल, साहित्य व देखभाल दुरुस्तीसह उपलब्ध करून देणेकरीता मा. आयुक्त यांनी दि. २९.०९.२०२० रोजी मंजुरी दिली होती.

त्या अनुषंगाने दि.२३.०६.२०२० रोजी वृत्तपत्रात जाहीर फेरनिविदा सूचना प्रसिध्द करून ई-टेंडररिंगद्वारे दि.०२.०७.२०२० पर्यंत निविदा मागवण्यात आल्या होत्या. मा.महासभेने दि.२०.०४.२०२१ रोजी ठराव क्र. १६ अन्वये सदर कामास कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिली होती. तसेच दि १२.०२.२०२१ रोजी ठराव क्र. ४८ अन्वये मा. स्थायी समिती सभेने दर स्विकारणेस व आवश्यकतेनुसार टेम्पोच्या संख्येमध्ये वाढ करणेस मंजुरी दिली होती.

त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत २४ प्रभागात ४० मिनी टेम्पो (जेट स्प्रे मशिन, वाहनचालक, पेट्रोल, डीझल, १००० लिटर पाण्याची टाकी, गन, १०० मीटर पाईप, साहित्य व देखभाल दुरुस्तीसह) द्वारे शहरात औषध फवारणी केली जाते. सदर भाडेतत्वावरील मिनी टेंम्पो निविदेची मुदत दिनांक दि.०१.०८.२०२६ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सदरकामी नवीन निविदा मागविणे आवश्यक आहे. सदर प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दि.०५/०८/२०२६ रोजी मंजुरी दिली आहे.

औषध फवारणी करणेकरिता वापरण्यात येणाऱ्या औषधांमध्ये मोठ्या प्रमाणात केमिकल्स असल्याने टेम्पोना ६ ते ८ महिन्यामध्ये गंज पकडतो, तसेच केमिकल्समुळे फवारणी करीता वापरण्यात येणाऱ्या जेटस्प्रे मशीन देखील नेहमी नादुरुस्त होत असतात त्यामुळे वारंवार टेम्पोची व जेटस्प्रे मशीनची दुरुस्ती करावी लागते. त्यामुळे ५ वर्षाकरीता निविदा मागविल्यास जास्तीत जास्त निविदाकार भाग घेतील व स्पर्धात्मक दर येऊन महानगरपालिकेच्या खर्चात बचत होईल याकारणास्तव सदर निविदा ५ वर्षाकरीता मागविणे आवश्यक आहे असे विभागाचे मत आहे.

सबब, औषध फवारणीकरीता ४० मिनी टेम्पोकरिता वार्षिक रु. ३.१२ कोटी व ५ वर्षा करिता एकूण रु.१५.६० कोटी खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च एकात्मिक डास निर्मूलन योजना- औषध फवारणी वाहन, औषधे पुरवठा व ठेका कर्मचारी मानधन या लेखाशीर्षा मधील सन २०२६-२७ मधील मंजूर तरतुदीमधून करण्यात येईल.

तसेच, यापूर्वीच्या निविदेची मुदत दि. ०१/०८/२०२६ रोजी संपुष्टात आलेली आहे. परंतु सद्यस्थितीत पावसाळा सुरु असल्याने काम बंद केल्यास डेंग्यू, मलेरिया, चिकनगुन्या व इतर साथीचे आजार पसरण्याची शक्यता आहे. यामुळे मनुष्यहानी होण्याची शक्यता नाकरता येत नाही. सदरची सेवा Maharashtra Essential Services Maintenance Act २०२३ नुसार अत्यावश्यक सेवा/ Public Health Service असल्याने काम थांबविणे योग्य होणार नाही. असे विभागाचे मत आहे. त्यामुळे सदरकामी नवीन निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देईपर्यंत मे. कोकिळा टूअर्स ॲण्ड ट्राव्हल्स यांनाच चालु दराने काम करणेकरीता मुदत वाढ देणे आवश्यक आहे.

सदरकामी ५ वर्षाकरिता भाडेतत्वावरील ४० मिनी टेम्पोकरीता (जेट स्प्रे मशिन, वाहनचालक, पेट्रोल, डीझल, १००० लिटर पाण्याची टाकी, गन, १०० मीटर पाईप, साहित्य व देखभाल दुरुस्तीसह) निविदा मागवणे व नवीन निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देईपर्यंत सद्यस्थितीत मे. कोकिळा टूअर्स ॲण्ड ट्रॉव्हल्स यांना चालु दराने काम करणेस मुदत वाढ देणेकामीच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(कविता बोरकर)
उपायुक्त (सार्व. आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने

मा. महासभा / ~~स्थायी समिती सभा~~
गोषवारा प्राप्त दि. ५ / ८ /२०२८ वेळ सायं.५.५० वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. ५० दि. 2024/28

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. ३१/०८/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक (७३) मिरा भाईंदर महानगरपालिका जुने आरक्षण क्र.११५ भाईंदर (पुर्व) येथील महानगरपालिका शाळा इमारतीमधील जागा एन.एल. दालमिया शाळेला भाड्याने देण्याबाबत निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) येथे मौजे नवघर इंद्रलोक ३० मीटर रुंद रस्त्यालगत जुने आरक्षण क्र.११५ या जागेत समावेशक आरक्षणाच्या तरतूदीमधील शाळा इमारत बांधून महानगरपालिकेकडे हस्तांतर करण्यात आली आहे. सदर शाळा इमारतीत गोडदेव येथे असलेली महानगरपालिकेची शाळा स्थलांतर करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर शाळा इमारतीमधील दुसरा, तिसरा व चौथा मजला वापराविना पडून आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे मिरा येथील एन.एल. दालमिया हायस्कूलच्या इमारतीत नजिकच्या काळात लागलेल्या आगीत शाळेला पाचवा व सहावा मजल्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने सदर संस्थेने एक वर्ष कालावधीसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे २५-३० शाळा वर्ग उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे.

भाईंदर (पुर्व) येथील महानगरपालिकेच्या शाळेतील रिकामी असलेली २४ वर्ग एक वर्ष कालावधीसाठी उपलब्ध करुन देता येऊ शकतात. तसेच सदर शाळेच्या जागेचे एका वर्षासाठी चालू बाजारभावानुसार होणारे रु.१,४६,२६,४६१/- (रुपये एक कोटी सेहेचाळीस लाख सव्वीस हजार चारशे एकसष्ट मात्र) एवढे वार्षिक भाडे देखील महानगरपालिकेस मिळू शकेल. तरी सदर शाळेतील रिकामी वर्ग एन.एल. दालमिया या शाळेस एक वर्ष मुदतीसाठी भाड्याने देणेसाठी मान्यता देणेस शिफारस आहे.

DEEPAK BHASKAR KHAMBIT
Digitally signed by DEEPAK BHASKAR KHAMBIT
Date: 2026.08.06 14:52:00 +05'30'

(दिपक खांबित)
प्र. शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

मा.महासभा दि. 23/04 /2026

(गोषवारा)

प्रकरण क्र. 04 :- मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मध्ये बदल करणेबाबत. (फेरसादर)

मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 राज्य शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन दि.10/06/2019 रोजी प्रसिध्द झाले आहेत. सदरचे सेवा प्रवेश नियम राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना लागू करण्यात आलेले आहेत.

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. परंतु काही पदांचे सेवा प्रवेश नियम मंजूर नाहीत व काही पदांच्या सेवा प्रवेश नियमांमध्ये दुरुस्ती करणेबाबत मा.आमदार, पदाधिकारी, विभागप्रमुख व कामगार संघटना यांनी सदर सेवा प्रवेश नियमात बदल करणेकरीता कळविले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मध्ये आवश्यक दुरुस्ती करून नव्याने सेवा प्रवेश नियम तयार करणेकरीता दि.12/03/2026 रोजीच्या आदेशान्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार दि.16/03/2026, दि.09/04/2026 व दि.29/04/2026 रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत समितीने प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने पडताळणी करून शिफारशीसह अहवाल सादर केलेला आहे. समितीने सादर केलेल्या अहवालास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. (सोबत समितीचा अहवाल)

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मध्ये समितीने सुचविलेल्या व मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या सेवा प्रवेश नियमांमध्ये सुधारणाबाबत मा.महासभेच्या अवलोकनार्थ व निर्णयास्तव सादर.

(डॉ.सचिन सांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

//इतिवृत्तांत//

मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मध्ये बदल/दुरुस्ती करणेकरीता मा.श्री.नरेंद्र मेहता, आमदार, 145 मिरा भाईंदर विधानसभा क्षेत्र यांनी पत्रान्वये कळविले आहे. सेवा प्रवेश नियमामध्ये आवश्यक दुरुस्ती करून नव्याने सेवा प्रवेश नियम तयार करणेकरीता समिती गठीत करण्यात आलेली आहे.

त्यानुसार दि.16/03/2026 व दि.09/04/2026 रोजीच्या बैठकीत स्वच्छता निरीक्षक, सहाय्यक विधी अधिकारी, लेखा परीक्षा अधिकारी, लेखा अधिकारी व अग्निशामक या पदांबाबत समितीचा निर्णय खालीलप्रमाणे आहे.

पदनाम	मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा नियम (दि.28/05/2019)	मा.श्री.नरेंद्र मेहता, आमदार, 145 मिरा भाईंदर यांनी निर्देशित केलेले फेरबदल	समिती अभिप्राय
1.	2.	3.	4.
1. स्वच्छता निरीक्षक	**नामनिर्देशन/सरळसेवा-100%** अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी. ब) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण. क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक	नामनिर्देशन/सरळसेवा-50% अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी. ब) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण. क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक पदोन्नती-50% अ) बारावी उत्तीर्ण. ब) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण. क) महानगरपालिका आस्थापनेवरील घनकचरा व्यवस्थापन विभागात कार्यरत वर्ग-03 संवर्गातील कर्मचाऱ्यामधुन सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. ड) स्वच्छता निरीक्षक पदावर 03 वर्ष प्रभारी काम केल्याचा अनुभव.	नामनिर्देशन/सरळसेवा-50% अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी. ब) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण. क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक पदोन्नती-50% अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी. ब) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण. क) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मुकादम या पदावर किमान 3 वर्षाची नियमित सेवा पूर्ण केलेल्या व स्वच्छता निरीक्षक पदाची सरळ सेवेची अर्हता धारण करणाऱ्या व मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण करणाऱ्या पात्र कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेनुसार पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.
2. सहाय्यक विधी अधिकारी (श्रेणी - 3)	**मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा नियम (दि.02/02/2023)** नामनिर्देशन/सरळसेवा-100% अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी. ब) उच्च न्यायालय किंवा त्यांचे अधिपत्याखालील इतर न्यायालयांमध्ये किमान 05 वर्षे अधिवक्ता/वकील म्हणून किंवा शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेमधील संबंधित कामाचा किमान 05 वर्षांचा अनुभव आवश्यक.	पदोन्नती-100% अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी. ब) महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-3 मधील कर्मचारी (लिपिक अथवा संगणक चालक) यांना महानगरपालिकेच्या विधी विभागातील कामाचा किमान 03 वर्षांचा अनुभव.	दि.02/02/2023 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन पात्रता पाहता योग्य तथापि मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर.

	क)	महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण		क)	वरील अर्हता व अनुभव धारण करीत असलेल्या वर्ग-3 मधील कर्मचारी (लिपिक अथवा संगणक चालक) यांना कायमस्वरूपी संवर्ग बदल करून सदर पदावर नियुक्ती देता येईल	
	ड)	मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक		ड)	महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण.	
3.लेखा परीक्षा अधिकारी (श्रेणी-2)	**मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा नियम (दि.28/05/2019)** पदोन्नती-100%		पदोन्नती-100%			
	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लेखा परीक्षक या पदावर किमान 3 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.		पदोन्नती-100%	अ)	मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील लेखापाल/लेखा परीक्षक पदाचा 3 वर्ष अथवा लिपीक पदाचा 12 वर्षाचा अनुभव.	दि.28/05/2019 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन/पदोन्नती पात्रता पाहता योग्य तथापि मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर.
				ब)	वाणिज्य शाखेची पदवी उत्तीर्ण	
4.लेखा अधिकारी (गट-ब) (श्रेणी-2, लेखा सेवा)	पदोन्नती-100%		पदोन्नती-100%			
	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लेखापाल या पदावर किमान 3 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.		पदोन्नती-100%	अ)	मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील लेखापाल/लेखा परीक्षक पदाचा 3 वर्ष अथवा लिपीक पदाचा 12 वर्षाचा अनुभव.	दि.28/05/2019 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन/पदोन्नती पात्रता पाहता योग्य तथापि मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर.
				ब)	वाणिज्य शाखेची पदवी उत्तीर्ण	
5. अग्निशामक	**मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा नियम (दि.07/06/2023)** नामनिर्देशन/सरळसेवा-100%		नामनिर्देशन/सरळसेवा-100%			
	अ)	महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) उत्तीर्ण.	नामनिर्देशन/सरळसेवा-100%	अ)	महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) उत्तीर्ण.	दि.07/06/2023 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन पात्रता पाहता योग्य असुन या पदांच्या सेवा प्रवेश नियमामध्ये बदल करणे योग्य नाही.
	ब)	राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र/महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन, मुंबई/नागपूर किंवा ऑल इंडिया इंस्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट किंवा महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण महामंडळ यांच अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण.		ब)	राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र/महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन, मुंबई/नागपूर किंवा ऑल इंडिया इंस्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट किंवा महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण महामंडळ यांच अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण.	

	क)	मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक		क)	मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक	
	ड)	शारीरिक पात्रता :-		ड)	शारीरिक पात्रता :-	
		1. उंची किमान 165 सें.मी. (महिला उमेदवारांची उंची किमान 162 सें.मी.)			1. उंची किमान 165 सें.मी. (महिला उमेदवारांची उंची किमान 162 सें.मी.)	
		2. छाती-साधारण 81 सें.मी. फुगवून-5 सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागु नाही)			2. छाती-साधारण 81 सें.मी. फुगवून-5 सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागु नाही)	
		3. वजन-किमान 50 कि.ग्रॅ.			3. वजन-किमान 50 कि.ग्रॅ.	
		4.दृष्टी-चांगली			4.दृष्टी-चांगली	
	फ)	वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय 30 वर्षापेक्षा अधिक असू नये.		फ)	वयोमर्यादा :- खुला व अमागास प्रवर्गासाठी 38 वर्षे व मागासवर्गीय प्रवर्गासाठी 43 वर्षे.	

उपरोक्त नमुद स्तंभ क्र.04 मध्ये स्वच्छता निरीक्षक, सहाय्यक विधी अधिकारी, लेखा परीक्षा अधिकारी, लेखा अधिकारी व अग्निशामक या पदांबाबत सेवा प्रवेश नियमामध्ये सुधारणा करणेस शिफारस आहे.

(सुनिल यादव)
सहा.आयुक्त (सा.प्र.)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(दिपक खांबीत)
प्र.शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(प्रणाली घोंगे)
उपायुक्त (कर)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(कविता बोरकर)
उपायुक्त (सार्व.आरोग्य)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(डॉ.सचिन नागर)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(शिरीषकुमार धनवे)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(सुधीर नाकाडी)
मुख्यालेखापरीक्षक
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(डॉ.सभाजी पानपट्टे)
अतिरिक्त आयुक्त (1)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

- मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मध्ये आवश्यक दुरुस्ती करून नव्याने सेवा प्रवेश नियम तयार करणेकरीता दि.12/03/2026 रोजीच्या आदेशान्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार दि.16/03/2026, दि.09/04/2026 व दि.29/04/2026 रोजीच्या बैठकीत खालील पदांबाबत समितीचा निर्णय

मिरा भाईंदर महानगरपालिका (सुधारीत सेवा प्रवेश नियम)

अ. क्र.	पदनाम	मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा नियम, दि.28/05/2019		संघटनेमार्फत मागणी करण्यात आलेले बदल		समिती अभिप्राय
सामान्य प्रशासन विभाग						
1	2	3	4	5	6	7
1.	उप आयुक्त (श्रेणी-1, प्रशासकीय सेवा)	प्रतिनियुक्ती 50%	राज्य शासन / शासन स्वराज्य संस्थेच्या सेवेतील समकक्ष पद किमान 3 वर्षे धारण करणाऱ्या योग्य अधिकाऱ्याची शासनामार्फत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल.	प्रतिनियुक्ती 50%	राज्य शासन / शासन स्वराज्य संस्थेच्या सेवेतील समकक्ष पद किमान 3 वर्षे धारण करणाऱ्या योग्य अधिकाऱ्याची शासनामार्फत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल.	-
		पदोन्नती 50%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त या पदावर किमान 3 वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	पदोन्नती 50%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त किंवा सिस्टीम मॅनेजर या पदावर किमान 3 वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	दि.28/05/2019 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन/पदोन्नती पात्रता पाहता सेवा प्रवेश नियम योग्य आहे. तथापि मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर.
2.	सहाय्यक आयुक्त (श्रेणी-2, प्रशासकिय	प्रतिनियुक्ती 25%	राज्य शासन/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेतील समकक्ष पद किमान 3 वर्षे धारण करणाऱ्या योग्य अधिकायाची शासनामार्फत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल.	प्रतिनियुक्ती 25%	राज्य शासन/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेतील समकक्ष पद किमान 3 वर्षे धारण करणाऱ्या योग्य अधिकायाची शासनामार्फत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल.	-

	सेवा)	नामनिर्देशन / सरळसेवा - 25%	अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी. ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.	नामनिर्देशन/ सरळसेवा - 25%	अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी. ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.	-
		पदोन्नती 50%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रशासकिय अधिकारी या पदावर किमान 3 वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	पदोन्नती 50%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रशासकिय अधिकारी / कार्यालय अधिक्षक या पदावर किमान 3 वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांची किंवा वरील सवंर्गात पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसल्यास पद रिक्त असल्यास कार्यालय अधिक्षक पदाची वेतनश्रेणी लागु असलेल्या कर्मचारी यांचेमधून सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	दि.28/05/2019 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन/पदोन्नती पात्रता पाहता सेवा प्रवेश नियम योग्य आहे.
3.	प्रशासकिय अधिकारी (श्रेणी-2, प्रशासकिय सेवा)	पदोन्नती 100%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यालय अधिक्षक या पदावर किमान 3 वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	पदोन्नती 100%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यालय अधिक्षक या पदावर किमान 3 वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. किंवा वरील सवंर्गात पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसल्याने पद रिक्त असल्यास कार्यालय अधिक्षक पदाची वेतनश्रेणी लागु असलेल्या कर्मचारी यांचेमधून सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	दि.28/05/2019 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन/पदोन्नती पात्रता पाहता सेवा प्रवेश नियम योग्य आहे. तथापि मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर.
3	कार्यालय अधिक्षक (श्रेणी-3,	पदोन्नती 100%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक या पदावर किमान 3 वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या व	पदोन्नती 100%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक या पदावर किमान 3 वर्षाची सेवा झालेल्या कर्मचाऱ्याची किंवा वरील संवर्गात पुरेसे	दि.28/05/2019 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व

	प्रशासकिय सेवा)		विभागीय पीरक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.		कर्मचारी उपलब्ध नसल्यास कार्यालय अधिक्षक पदाची वेतनश्रेणी लागु असलेल्या कर्मचारी यांचेमधून सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. किंवा वरील संवर्गात पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसल्यास मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लिपीक या पदावर किमान 10 वर्षाची सेवा झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	टक्केवारी/नामनिर्देशन/पदोन्नती पात्रता पाहता सेवा प्रवेश नियम योग्य आहे. तथापि मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर.
4	उच्च श्रेणी लघुलेखक (मराठी/इंग्रजी) (श्रेणी-2, प्रशासकीय सेवा)	नामनिर्देशन / सरळसेवा- 50%	अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी. ब) मराठी अथवा इंग्रजी लघुलेखनाची गती 120 श.प्र.मि. तसेच मराठी टंकलेखनाची गती 30 श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखनाची गती 40 श.प्र.मि. (तत्संबंधी शासकीय परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक) क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.			दि.28/05/2019 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन/पदोन्नती पात्रता पाहता सेवा प्रवेश नियम योग्य आहे.
		पदोन्नती- 50%	मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील निम्न श्रेणी लघुलेखक (मराठी/इंग्रजी) या पदावर किमान 3 वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.			

2	निम्न श्रेणी लघुलेखक (मराठी/इंग्रजी) (श्रेणी-3, प्रशासकीय सेवा)	नामनिर्देशन / सरळसेवा- 50%	अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी. ब) मराठी अथवा इंग्रजी लघुलेखनाची गती 120 श.प्र.मि. तसेच मराठी टंकलेखनाची गती 30 श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखनाची गती 40 श.प्र.मि. (तत्संबंधी शासकीय परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक) क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.			दि.28/05/2019 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन/पदोन्नती पात्रता पाहता सेवा प्रवेश नियम योग्य आहे.
		पदोन्नती- 50%	मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील निम्न श्रेणी लघुलेखक टंकलेखक (मराठी/इंग्रजी) या पदावर किमान 3 वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.			
3	लघुलेखक	नामनिर्देशन / सरळसेवा- 100%	अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी. ब) मराठी अथवा इंग्रजी लघुलेखनाची गती 120 श.प्र.मि. तसेच मराठी टंकलेखनाची गती 30 श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखनाची गती 40 श.प्र.मि. (तत्संबंधी शासकीय परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक) क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.			दि.28/05/2019 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन/पदोन्नती पात्रता पाहता सेवा प्रवेश नियम योग्य आहे..

अभियांत्रिकी सेवा विभाग						
1	स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक श्रेणी-3		सदर पद आकृतीबंधात मंजुर नाही.	पदोन्नती 100%	अ) मान्यताप्राप्त विदयापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाचा कोर्स परिक्षा उत्तीर्ण. ब) महापालिका आस्थापनेवर मेस्त्री, फिटर, प्लंबर (समकक्ष वर्ग) / वर्ग-4 वरील कर्मचाऱ्यांचा बांधकाम विषयक कामाचा 03 वर्षाचा अनुभव असलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	सदर पद आकृतीबंधात मंजुर नाही. त्यामुळे सेवा प्रवेश नियम बदलाची आवश्यकता नाही.
2	फोरमन		सदर पद आकृतीबंधात मंजुर नाही.	पदोन्नती 100 %	1.अभियांत्रिकी सहाय्यक पदाचा कोर्स परिक्षा उत्तीर्ण 2. महानगरपालिका आस्थापनेवरील वर्षाचा मेस्त्री / फिटर / प्लंबर (समकक्ष संवर्ग) पदाचा 03 वर्षाचा अनुभव असलेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	सदर पद आकृतीबंधात मंजुर नाही. त्यामुळे सेवा प्रवेश नियम बदलाची आवश्यकता नाही.
3	मिस्त्री	नामनिर्देशित / सरळसेवा 75%	1. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (S.S.C.) उत्तीर्ण 2.शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा मिस्त्री व तत्सम अभ्यासक्रम उत्तीर्ण. 3.मिस्त्री कामाचा किमान 2 वर्षाचा अनुभव आवश्यक. 4.मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.	-	-	-

		पदोन्नती 25%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गवंडी या पदावर किमान 3 वर्षांची सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	पदोन्नती 100%	1. शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था एन.सी.सी.व्ही.टी. परिक्षा उत्तीर्ण 2. महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामध्ये किमान सलग 3 वर्ष फिटर/प्लंबर या पदावर सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	दि.28/05/2019 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन/पदोन्नती पात्रता पाहता सेवा प्रवेश नियम योग्य आहे. तथापि मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर.
4	फिटर	नामनिर्देशित / सरळसेवा 50%	1. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (S.S.C.) उत्तीर्ण. 2. शासनमान्य औद्यागिक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक. 3. संबंधित कामाचा किमान 3 वर्षाचा अनुभव आवश्यक. 4. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.	-	-	-

		पदोन्नती 50%	मिरा भाईंदर महानगरपालिकिच्या आस्थापनेवरील सहाय्यक नळ कारागीर या पदावर किमान 3 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	पदोन्नती 100%	1. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (S.S.C.) उत्तीर्ण. 2. शासकीय औद्यागिक प्रशिक्षण संस्था I.T.I. फिटर 02 वर्षाचा अभ्यासक्रम. 3. महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामध्ये किमान सलग 03 वर्ष प्लंबर पदावर सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	दि.28/05/2019 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन/पदोन्नती पात्रता पाहता सेवा प्रवेश नियम योग्य आहे. तथापि मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर.
5	प्लंबर	नामनिर्देशित / सरळसेवा 50%	1. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (S.S.C.) उत्तीर्ण. 2. शासनमान्य औद्यागिक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक. 3. संबंधित कामाचा किमान 3 वर्षाचा अनुभव आवश्यक. 4. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.	-	-	-

		पदोन्नती 50%	मिरा भाईंदर महानगरपालिकिच्या आस्थापनेवरील सहाय्यक नळ कारागीर या पदावर किमान 3 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	पदोन्नती - 100%	1. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (S.S.C.) उत्तीर्ण. 2. औद्यागिक प्रशिक्षण संस्था I.T.I. फिटर 02 वर्षाचा अभ्यासक्रम. 3. महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामध्ये किमान सलग 3 वर्ष सहाय्यक नळकारागीर सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	इतर महानगरपालिकाचे सेवा प्रवेश नियमाचे अवलोकन करता दि.28/05/2019 रोजीच्या शासन निर्णयातील सेवा प्रवेशासाठी विहित केलेली नेमणुकी पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन/पदोन्नती पात्रता पाहता सेवा प्रवेश नियम योग्य आहे. तथापि मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर.
6	वॉलमन		सदर पदाचे सेवा प्रवेश मंजुर नाहीत.	नामनिर्देशित / सरळसेवा 50%	महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामध्ये किमान सलग 5 वर्ष मजुर / सफाई कामगार या पदावर सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	इतर महानगरपालिकांचे सेवा प्रवेश नियमाचे अवलोकन करता खालीलप्रमाणे बदल करणे योग्य. अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उत्तीर्ण. ब) शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. (100% नामनिर्देशित/सरळसेवा)

				पदोन्नती 50%	शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील अभ्यासक्रम उत्तीर्ण माध्यमिक शाळांत परिक्षा उत्तीर्ण	-
6	मिटर वाचक		पद मंजुर नाही. तसेच सदर पदाचे सेवा प्रवेश मंजुर नाहीत.	नामनिर्देशित / सरळसेवा	महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत्त (इयत्ता 10 वी) प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण	सदर पद आकृतीबंधात मंजुर नाही. त्यामुळे सेवा प्रवेश नियम बदलाची आवश्यकता नाही.
अग्निशमन विभाग						
1	सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी (ASSISTANT FIRE STATION OFFICER)	नामनिर्देशन /सरळसेवा 25%	अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. ब) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपूर यांचेकडील Sub Officer पाठयक्रम उत्तीर्ण असावा. किंवा क) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपूर यांचेकडील Station Officer & Instructer पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) उत्तीर्ण असावा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा 1 वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पूर्ण	--	--	

